साप्ताहिक माणूस
१८ फेब्रुवारी ८४ | दिन रुपये

# गोष्ट विल्ये गावची कोकण विकासाची



साप्ताहिक

# माणूस

□

वर्ष : तेविसावे

अंक : अडतिसावा

□

१८ फेब्रुवारी १९८४

किंमत : दोन रुपये

□

संपादक

श्री. ग. माजगावकर

□

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

□

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

□

मुखपृष्ठ

संजय पवार

## सप्रेम नमस्कार,

□ वीजमंडळाचा आडमुठा कारभार प्रत्येक ग्राहकाला दैनंदिन अनुभवावयास मिळतो. सर्वसामान्यांना जेरीस आणणाऱ्या, दखल घेतली न जाणाऱ्या, उर्मट दुरुत्तरे ऐकावयास लागणाऱ्या किती तरी घटना वीजमंडळाच्या बाबतीत अनुभवायला येतात.

केलेले नियम हे पाळण्यासाठी नसतातच! पुन्हा हे असे का? असं विचारण्यातही अर्थ नसतो. कारण विचारणाऱ्याचे जर काम अडलेले असेल तर तो रखडला जातो. वरिष्ठांकडे तक्रार करण्यात अर्थ नसतो! कारण खालचा कधीच वरच्याला जुमानत नाही. कारण त्याला माहीत असते की तोही भ्रष्ट आहे.

श्री. विनय गुणे यांचा दि. ४।२।८४ च्या 'माणूस'मधील लेखाने यांच्या मनमानी कारभाराची दोन प्रकरणं उजेडात आली, ती तुम्ही प्रकाशित केलीत याबद्दल धन्यवाद.

तरीही या वीजमंडळाच्या कारभाराबद्दल प्रत्येक ग्राहकाच्या इतक्या तक्रारी आहेत की, नुसता हाच विषय आपणास कित्येक आठवडे पुरेल! खरं तर याचा असा पाठपुरावा करायलाच हवा. यांच्या कारभाराची प्रकरणं वेशीवर टांगायलाच हवी आहेत, 'माणूस'ने जरूर यांच्यामागे लागावे, आम्ही 'माणूस' बरोबर आहोत.

४ फेब्रुवारी ८४

सतोश देशमुख
संगमनेर

---

### वीजमंडळाचा छळवाद

---

□ 'माणूस' च्या दिनांक ४।२।८४ च्या अंकातील विनय गुणे यांचा महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने शेतकऱ्याच्या केलेल्या छळवादाचा रिपोर्ट वाचला. आवडला— मलाही एक ग्राहक या नात्याने विद्युतमंडळाचा असाच अनुभव आलेला असल्याने तो पटलाही.

मी संगमनेर शहरात एक प्रिंटिंग प्रेस चालवतो. दिवाळी हा माझ्या सीझनचा काळ. या दिवसांतच ३–४ दिवस लाइट गायब! त्यामुळे पर्यायाने काम बंद. कामाची तर बेसुमार गर्दी— म्हणून ३।११।८३ रोजी दुपारी २ वाजता तक्रार नोंदविण्यासाठी आणि लाइट केव्हा सुरू करणार याच्या चौकशीसाठी वीजमंडळात फोन केला. बी. एम. क्षीरसागर नावाचा मंडळाचा एक कर्मचारी समोरून बोलत होता— तक्रार सांगताच त्यांनी एकदम 'मी काही तुमच्या बापाचा नोकर नाही!' म्हणून एकदम शिव्या द्यायला सुरुवात केली. समोर आला तर जीवे मारण्याची धमकी दिली! जास्त वाद घालण्यात अर्थ नव्हता. मी फोन बंद केला आणि श्रीरामपूर कार्यालयात वरिष्ठांना फोन लावला. इंजिनिअर साहेब तिथे नव्हते. ९ तारखेपर्यंत भेटणार नाहीत असे समजले.

लगेच सत्य प्रकाराबद्दल एक लेखी तक्रार लिहून मी वीजमंडळाच्या कार्यालयात गेलो. तिथला इनवर्ड क्लार्क कोल्हे यांच्याकडे तक्रार-अर्ज दिला— त्यांनी वाचून पलीकडे ऑफिसबाहेर उन्हात उभ्या असलेल्या क्षीरसागरांना बोलावून 'दादा तुमच्या विरुद्ध तक्रार आहे' म्हणून सांगितले.

पुन्हा त्या क्षीरसागरांनी डोळे लाल करून शिव्यांची लाखोली दिली. तेव्हा कुठं मला त्यांच्या फोनवरच्या बोलण्याचा उलगडा झाला. क्षीरसागर दारू प्यायलेले होते. दरम्यान आणखी पाच–सहा कर्मचारी जमले. मला अक्षरशः धक्के मारून बाहेर काढले! संगमनेर सबस्टेशनचे इनचार्ज श्री. नेमाडे यांच्याकडे एका साइटवर गेलो. त्यांनी कार-

वाईचे आश्वासन दिले; पण हे आश्वासन फोल आहे, हे मला पूर्वानुभवावरून माहीत होतच– आणि 'आमच्या युनियनच्या माणसाचे साहेब काही वाकडे करू शकत नाही' ही कर्मचाऱ्यांची गुर्मीही ऐकली होतीच. म्हणून दि. ११।११।८३ ला कार्य. अभियता श्रीरामपूर याच्याकडे एक तक्रारअर्ज सादर केला. त्याच्या प्रती मंत्र्यापासून सर्व संबधिताना पाठविल्या– सर्व जणाची एवढी स्पष्ट नावानिशी तक्रार देऊनही जिल्हाधिकारी लखीना सोडले तर कोणीही दखल घेतली नाही. लखीनानी मात्र संगमनेर पोलीसस्टेशनला तातडीचे चौकशीचे आदेश दिले. त्यानुसार सगमनेरचे पी. एस. आय. पाटील यानी प्रकरणाची खातेचौकशी तातडीने करावी अशी सूचना अभियंत्याना दिली व मला पोलीससंरक्षण देऊ केले.

या घटनेला दोन महिने होऊन गेले. चौकशी होण्याची लक्षणे नाहीत. म्हणून मी पुन्हा पोलीससबइन्स्पेक्टर याचेकडे अर्ज करून या प्रकरणाच्या पोलीसचौकशीची मागणी केली आहे. कार्यवाहीची वाट पहात आहे.

या बेमुर्वतखोर कर्मचाऱ्याना कोणी तरी धडा शिकवायला हवा म्हणजे इतराचा त्रास सपेल असं नाही; पण जरा कमी तरी होईल. सघटित ताकदीच्या जोरावर अरेरावी करणाऱ्या याना लोक रस्त्यावर खेचल्याशिवाय खरोखर रहाणार नाहीत!

या लेखाने एका निकडीच्या प्रश्नाला व विषयाला तोड फोडलेत– धन्यवाद!

७ फेब्रुवारी, ८४ अजित ज. मणियार
संगमनेर

□ आपल्या सा. 'माणूस'च्या अकात (११–२–८४) चित्रपट या सदरात कै. सोहराब मोदी हे चित्रपटास राष्ट्रपती सुवर्णपदकाचा मान मिळवणारे पहिले निर्माते असा उल्लेख आहे

माझ्या आठवणीप्रमाणे हा मान प्रथम साहित्यसम्राट आचार्य अत्रे याच्या 'श्यामची आई' या चित्रपटास मिळाला आहे.

१२ फेब्रुवारी ८४ वसंत भालिंगे
भायखळा

□

# अलगता आणि अखंडता

श्री. ग. मा.

काँग्रेसइतकी देशाची नाडी! कोणालाच सापडलेली नाही, असे श्री. यशवंतराव मोहिते यानी नुकतेच एका प्रसंगी भाषण करताना सागितले. निम्म्याहून अधिक देशात सध्या काँग्रेसचे राज्यच नाही. तेव्हा काँग्रेसला नाडी सापडली असलीच तर ती सध्यातरी निम्म्या देशाची आहे असे समजावे लागेल. शिवाय दर दहा वर्षांनी एकदा तरी देशाची नाडी काँग्रेसच्या हातून सुटते असाही अनुभव आहे. सदुसष्ट साली काँग्रेसचा मोठ्या प्रमाणावर पराभव होऊन विरोधी पक्षीयाकडे, विशेषत: उत्तरेकडील राज्यात, सत्ता गेली. आणीबाणी काळात तर देशात, अगदी सर्वसामान्य माणसांच्या मनात, काँग्रेसबद्दल किती असंतोष खदखदतो आहे याचा, अगदी चतुर इंदिरा गांधीनाही अंदाजच आला नाही. याचा परिणाम म्हणून काँग्रेसचा धुव्वा उडाला व ७७ मध्ये दिल्लीची सत्ता विरोधकांकडे आली. राज्य कारभाराचा अनुभव नव्हता; भाडकुदळपणा फार होता. तरीही ही सत्ता २८ महिने विरोधकांकडे टिकली. इंदिरा गांधींच्या किंवा काँग्रेसच्या नाडी परीक्षेपेक्षा विरोधकांच्या अदूरदर्शीपणामुळेच जनता पक्षाची सत्ता कोसळली व इंदिरा गांधी–काँग्रेस पुन्हा सत्तारूढ झाली. तरीपण मोहिते म्हणतात यात थोडे फार तथ्य आहे. लोकमताचा अंदाज इतरांपेक्षा काँग्रेसनेत्यांना, विशेषत: इंदिरा गाधीना लवकर व अधिक अचूकपणे घेता येतो हे मान्य करावे लागेल. कै. रवीद्र म्हात्रे यांच्या खुनाची घटना हा याचा ताजा पुरावा. या खुनामुळे सारा देश हळहळला, संतापला. हा खून कोणी केला, का केला याबाबतचे सर्व धागेदोरे अद्याप उजेडात यावयाचे आहेत. कदाचित् बरेचसे धागेदोरे सापडणारही नाहीत; पण हाती आलेल्या माहितीवरून हा खून तथाकथित काश्मीर मुक्ती आघाडीच्या दहशतवाद्यांनी केला असण्याची शक्यताच खूप आहे. ही शक्यता गृहीत धरून या खुनाबाबत काही कणखर व कठोर प्रतिक्रिया तातडीने व्यक्त होणे अगदी आवश्यक होते. लोकाचे समाधान याशिवाय होणारे नव्हते. म्हात्रे कुटुंबियाचे सात्वन थोरामोठ्यांनी घरी जाऊन केले; म्हात्रे कुटुंबियांना आर्थिक साहाय्यही दिले; हे सगळे उपचार पाळले जाणे आवश्यकच होते; पण तेवढे पुरेसेही नव्हते. आपल्या परराष्ट्र सेवेतील म्हात्रे यांच्या सारखा एक कर्तबगार अधिकारी, इंग्लंडसारख्या सुशिक्षित व लोकशाही देशात, आपली सेवा बजावत असतानाच पळवला जातो, त्याची निर्घृणपणे हत्या केली जाते आणि भारत सरकार त्यांच्या कुटुबियांचे सात्वन करण्यापलीकडे, त्यांना लाखदोन लाख रुपयांचे साहाय्य करण्यापलीकडे काहीही करू शकत नाही, ही हतबलतेची, अवशतेची भावना देशात फैलावणे बरोबर नव्हते. पुरावे मिळ-


तील तेव्हा मिळतील; चौकशी पूर्ण होईल तेव्हा होईल; वाट न पाहता इंदिरा सरकारने काश्मीर मुक्ती आघाडीलाच या म्हात्रे–खुनाबद्दल जबाबदार धरले व खुन्यांनी केलेली काश्मीर मुक्ती आघाडीचा नेता मकबुल बट्ट याच्या सुटकेची मागणी केवळ फेटाळूनच लावली नाही; तर या बट्टला फासावरच चढवले. म्हात्रे यांच्या खुनानंतर आठवडाभरातच ही कारवाई झाली. अनेक वर्षे हा बट्ट भारत सरकारच्या ताब्यात होता. याला फाशीची शिक्षाही झालेली होती. राष्ट्रपतींकडे याचा दयेचा अर्जही पडून होता–सात वर्षे. पण म्हात्रे यांचा खून झाला आणि तावडतोब या अर्जावरची धूळ झटकली गेली. राष्ट्रपती दिल्लीत नव्हते, कलकत्यात होते. फेटाळणीवर त्यांची सही आणण्यासाठी खास माणूस कलकत्त्याला पाठवण्यात आला. तसाच एक माणूस काश्मिरला–जम्मूला गेला व फाशीपूर्वीच्या कागदपत्रांची परिपूर्तता करून घेऊन आला. सर्वोच्च न्यायालयानेही यावेळी विलंब लावला नाही. पाच फेब्रुवारी १९८४ ला इंग्लडमध्ये, बर्मिगहॅमला श्री. म्हात्रे यांचा खून झाला ११ फेब्रुवारीला मकबुल बट्ट दिल्लीच्या तिहार तुरुंगात फासावर लटकला जे दहा-पंधरा वर्षांत घडले नव्हते ते आठवड्यात घडले. इतकी वर्षे मकबुल बट्टच्या शिक्षेची अमल बजावणी का होत नव्हती हे कोणालाच सांगता येणार नाही; पण शेवटी वेळ निवडली गेली ती योग्य वेळ होती. लोकमताच्या नाडीवर बोट बरोबर ठेवले गेले म्हात्रे याचा खून हे एक अमानुष व नीच कृत्य आहे. ही केवळ वैयक्तिक व कौटुंबिक हानी नाही. हा राष्ट्राचा उपमर्द आहे असेच लोकांना वाटले. म्हात्रे यांचा खुनी सापडून, त्याला किंवा त्यांना कडक शिक्षा झाल्याशिवाय हा उपमर्दाचा घाव भरून येणे कठीण आहे; पण या गोष्टींना वेळ लागणार. शिवाय भारत सरकार आपल्या हल्ल्याला काहीच प्रत्युत्तर देत नाही असे पाहिल्यावर पुन्हा एखादा हल्ला होणे, आणखी एखादा खून पडणेही अशक्य नव्हते धाक बसावा अशी कृती, अशी कडक व कठोर प्रतिक्रिया भारत सरकारकडून व्यक्त होणे अपेक्षित होते. बट्ट याला तडकाफडकी फाशी देऊन भारत सरकारने ही अपेक्षा पूर्ण केली; हेच धोरण यापुढेही चालू राहिले तर हवे आहे.

## काश्मिरात भारत कुठे ?

कारण बट्टला फासावर चढवले किंवा म्हात्रे यांचे खुनी सापडून त्यानाही शिक्षा झाल्या म्हणजे काश्मीर प्रश्न संपला–सुटला असे होत नाही. तो आहे तेथेच आहे व राष्ट्रीय व आतरराष्ट्रीय पातळीवर तो उकरून काढणे हा पाकिस्तानचा खोडसाळ उद्योगही चालूच रहाणार आहे. आपण खूप म्हणतो की, पाकिस्तानव्याप्त काश्मिरचा भूभाग आपलाच आहे; पण जोवर हा भूभाग पाकिस्तानच्या ताब्यात आहे तोवर या म्हणण्याला तसा काही अर्थ नाही. तो वाटाघाटींनी आपल्याला मिळणे कदापीही शक्य नाही. शिवाय चीन–अमेरिका यानाही हा प्रश्न सुटावा असे वाटत नाही. कारण यामुळे भारतीय उपखंडात हस्तक्षेप करण्याचे, त्यावर दबाव ठेवण्याचे एक साधनच त्याना लाभलेले आहे. हे साधन, हा लाभ कोण सोडील ? तेव्हा काश्मीर प्रश्न सुटायचा तर युद्ध अटळ आहे. हा भूभाग भारतात आला तरी काश्मिरमधील प्रादेशिकतावाद हा धोका कायम आहेच. शेख अब्दुल्लाना काश्मीर हे नेपाळप्रमाणे स्वतंत्र व स्वायत्त राज्य ठेवायचे होते. त्याचे चिरंजीव डॉ. फरुक अब्दुल्ला यांनीही हे उद्दिष्ट दृष्टीआड केलेले नाही. डॉ. फरुक अब्दुल्ला हे आपण भारतीय आहोत, काश्मीर भारतातच आहे असे म्हणत असतात; पण काश्मीर जरी भारतात असले तरी काश्मिरात भारत कुठे दिसतो का ? काश्मिरचे स्वतंत्र अस्तित्व ठेवणारे घटनेचे ३७० वे कलम रद्द करण्याच्या मागणीला त्यांचा विरोध कशासाठी ? काश्मीर पुनर्वसन विधेयक ते आणू पाहत आहेत. पाकिस्तानात पूर्वी निघून गेलेल्या काश्मिरी नागरिकांना पुन्हा परत काश्मिरात बोलावून स्थायिक करण्याचा हा खटाटोप कशासाठी ? ही वाट काश्मिरच्या भारतीयकरणाकडे जाणारी नक्कीच नाही. दक्षिणेकडे, तेलगू देसम् हीही एक प्रादेशिक शक्ती आहे; पण रामारावांशी कितीही मतभेद असले तरी त्यांच्या भारतनिष्ठेविषयी कोणी शंका घेऊ शकत नाही. अशी निःशंकता डॉ. फरुक यांच्याविषयी वाटत नाही. शिवाय ज्या काश्मीर मुक्ती आघाडीच्या लोकांनी म्हात्रे यांचा खून पाडला त्या आघाडीशी डॉ. फरुक याचे पूर्वसंबंध होते अशीही माहिती उजेडात येत आहे. नुकत्याच पार पडलेल्या काश्मीर विधानसभा निवडणुकीत डॉ फरुक यानी शभर टक्के पाकिस्तानवादी शक्तीची मदत अगदी उघडपणे घेतलेली होती. श्रीनगर येथे खेळल्या गेलेल्या वेस्ट इंडिज विरुद्ध भारत क्रिकेट सामन्यात भारतीय खेळाडूंचा उपमर्द होतोच आहे. मैदानातच भारतविरोधी घोषणा दिल्या जातात. कलकत्त्यातही प्रेक्षक आपल्या खेळाडूंवर चिडले, त्यांनी आपल्या खेळाडूंची हुर्यो उड-

वली; पण श्रीनगरची घटना जशी अराष्ट्रीय वृत्तीची निदर्शक ठरली तशी कलकत्त्याची ठरली नाही. बिहारमध्ये पूर्व पाकिस्तानातून निर्वासित येत आहेत. याला आळा घातला नाही तर आसामसारखीच परिस्थिती बिहार-मध्ये उद्भवेल. असे असताना या निर्वासित घूसखोरांची बाजू घेऊन डॉ. फरुक अब्दुल्ला, बिहारच्या मंत्री-मंडळावर टीका करण्यासाठी का पुढे सरसावले? तेव्हा काश्मीर प्रश्न फक्त पाकिस्तानपुरताच मर्यादित नाही. अब्दुल्लांच्या प्रादेशिक काश्मिरी अहंकारामुळे तो राष्ट्रीय एकात्मतेचाही प्रश्न बनलेला आहे. म्हणून बट्टच्या फाशीमागील कठोर उपाययोजनेचे धोरण यापुढेही चालू राहिले पाहिजे. काश्मिरच्या अलगतावादाला मुळीच खतपाणी मिळता उपयोगी नाही. डॉ. फरुक अब्दुल्ला हे इंदिरा विरोधी संयुक्त आघाडीचे एक सदस्य आहेत. या आघाडीची एक बैठक श्रीनगरलाही झाली. सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्याच तर ही आघाडी अधिक व्यापक होण्याचीही शक्यता आहे; पण आघाडीच्या इतर सदस्यांनी अब्दुल्लांच्या अलगतावादावर नियंत्रण ठेवण्याची जागरूकता दाखवली नाही तर जनमताची नाडी इंदिरा गांधींच्या हाती पुन्हा जाणे अशक्य नाही. नुकत्याच पार पडलेल्या काश्मीरच्या विधानसभा निवडणुकात जम्मू भागातील सर्व हिंदूंनी भाजप किंवा इतर पक्षांना डावलून इंदिरा गांधींना मते का दिली? अब्दुल्लांच्या अलगतावादाविरुद्ध इंदिरा काँग्रेसपक्ष लढू शकेल असा तेथील लोकांना विश्वास वाटला, म्हणून. आसाममध्ये इंदिरा गांधी राष्ट्रविरोधी शक्तींना पाठीशी घालत असतील; पण इकडे काश्मिरात —पंजाबात त्यांनी अलगतावादविरोधी भूमिका घेतली. अलगतावाद आणि अखंडतावाद अशीच यापुढची लोकमताची विभागणी होणार असेल तर इंदिरा विरोधकांनी आपण कुठल्या बाजूस रहाणार आहोत हे आताच ठरवले पाहिजे. नाहीतर देशाची नाडी एकीकडे आणि विरोधक दुसरीकडे अशी स्थिती होईल. किरकोळ व स्थानिक प्रश्नांवर विरोधक आपली शक्ती वाया घालवत बसले तर देशाची नाडी त्यांच्या हाती येणार तरी कशी? □

---



## मुंबापुरी

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री भर हुतात्माचौकात मांडी घालून बसल्याचे तुम्ही कधी पाहिले आहे काय? आम्हाला हे मनोहर दृश्य गेल्या मंगळवारी पाहण्याचा योग आला!

पंजाबमध्ये अकाली दलाने घातला नसेल इतका गोंधळ वाहतूक उप—आयुक्त सरदार पसरीचा ह्यांनी केवळ हुतात्माचौकात घातला आहे. त्यांच्या नवीन वाहतूकव्यवस्थेमुळे पूर्वी पाच मिनिटे खोळंबणाऱ्या गाड्या आता हुतात्मा चौकात तब्बल पंचवीस मिनिटे अडकून पडतात आणि पादचारी जीव मुठीत धरून पसरीचांचे नाव घेत रस्ता ओलांडतात!

पसरीचांच्या ह्या करामतीमुळे वसंतदादांनी गेल्या मंगळवारी जातीने हुतात्मा—चौकात (ह्याला पूर्वी फ्लोराफाउंटन म्हणत असत) येऊन ह्या अवस्थेची (की व्यवस्थेची) पाहणी करायचे ठरविले.

दादा ठीक सहा वाजता लाल दिव्याच्या गाडीतून आले. आम्हाला वाटले एक फेरी मारून दादा लोकांचे निवेदन घेऊन परत जातील; पण दादांनी गाडी आत घेतली आणि बाहेर पडून भर चौकात बैठक मारली. त्यामुळे पब्लिक एकदम खूष!

दादा येणार म्हणून पसरीचांनी फाउंटनमधल्या सगळ्या फेरीवाल्यांना पळवून लावले. वरीचशी वाहतूक व्हीटीवरून वळविण्यात आली होती. पसरीचांच्या ट्रॅफिक-प्लॅन विरुद्ध निदर्शने करणाऱ्या लोकांनी ह्याची कागाळी दादांकडे केली. (पसरीचाचे असे म्हणणे पडले की, ह्या मुंबईच्या लोकांत काही खिलाडू वृत्ती नाही.) खरी व्यवस्था पाहण्यासाठी लोकांनी दादांना अचानक भेट द्यायला सांगितले.

दादा आता पसरीचांचा चक्रव्यूह बदलो न बदलो; पण त्यांनी चौकात बसकण मारताच लोकांनी उत्साहात वसंतदादा झिंदाबादच्या घोषणा सुरू केल्या. त्यामुळे क्षणभर दादांना अंतुले, बाबासाहेब भोसले, रामराव आदिक आणि शंकरराव चव्हाण यांचा विसर पडला असे आम्हाला आतल्या गोटांतून कळाले! दादा त्यांना 'प्रेमाने चांडाळकचौडी' असे म्हणतात असे कळते!

¤

बर्मिगहॅम येथे ज्यांचा खून झाला ते म्हात्रे मूळचे मुंबईचे. त्यामुळे गेल्या सोमवारी महापालिका प्रेसरूममध्ये आलेल्या काही नगरसेवकांना दुखवटा व्यक्त करण्यासाठी आज सभा तहकूब करणार का असा प्रश्न आम्ही विचारला. ह्यावर म्हात्रे कोण असा प्रतिप्रश्न त्यांनी आम्हाला केला! यात एक माजी महापौरही होते! त्यांच्यापुढे आम्ही संध्याकाळची वृत्तपत्रे ठेवली. ती वाचल्यानंतर त्यांनी महापालिका सभागृहात म्हात्रे यांच्या देशसेवेबद्दल अभ्यासपूर्ण भाषण केले.

ह्या नगरसेवकांची नावे आम्ही तुम्हाला

सागत नाही. उगाच विश्वासघाताचे पातक आमच्या माथी नको !

¤

गेल्या गुरुवारी महापालिकेची सभा चक्क डासाच्या प्रश्नावरून पाच मिनिटे तहकूब झाली. भारतीय जनता पार्टीच्या बाळ धारपांनी ही सूचना मांडली. ह्यावर सर्व पक्षांच्या नगरसेवकांनी महापालिका आयुक्त द. म. सुकथनकरांना ह्या डासाच्या प्रादुर्भावाला महापालिका प्रशासन कसे जबाबदार आहे हे पटवून दिले. निदान ह्या एका प्रश्नावर तरी महापालिकेतील सर्व पक्षाचे एकमत आहे हे पाहून आम्हाला आनंद वाटला !

तरीही भारतीय जनता पार्टीच्या प्राणनाथ सहेगल यांनी धारपांनी कासवछाप अगरबत्तीची जाहिरात करण्यासाठी ही तहकुबीची सूचना माडली असा मुद्दा उपस्थित केलाच !

## ग्यानीजी आणि नाटककंपन्या

राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग याना मुबईबद्दल अपार प्रेम वाटू लागलंयसं दिसतंय. ऊठ पाय मुबईला येतात अन जेव्हा जेव्हा त्याच विमान सांताक्रूज विमानतळावर येऊन ठेपतं तेव्हा तेव्हा या मुबापुरीच्या तमाम गोर–गरीब, तळागाळातल्या जनतेला अलोट खुशी होते. ग्यानी-जनाचा सहवास कोणाला बरे आवडणार नाही ?

काय त्याचा तो राजेशाही थाट, तो दिमाखदार जामानिमा, ती मुक्ताफळे, त्या शेरो–शायऱ्या, काय विचारता ! सगळा आनंदी–आनद ! सगळेच खुश. राष्ट्रपती खुश, मुख्यमंत्री पाटील खुश. अन तमाम पब्लिकही खुश !

भले राष्ट्रपतीजी रमणीय परिसरातल्या राजभवनात राहोत. काही हरकत नाही; परंतु तेरा हजार पडक्या, जीर्णशीर्ण चाळीत राहणाऱ्या मुबईकराना ग्यानीजी आपल्या शहरात असल्याचा कोण आनंद होतो ! ते आलीशान गाडीतन फिरतात म्हणून काय झालं ? दररोज कुबट लोकलमधून घामटघा निघेस्तवर उभ्याने प्रवास करणाऱ्या साडेचार लाख मुंबईकरांना तरीही राष्ट्रपतींविषयी अनंत आदर आहे !

अहो, असा राष्ट्रपती होणार नाही ! हा खरा पब्लिकचा राष्ट्रपती आहे, अन खास करून मुंबईच्या पब्लिकचा ! गेल्या सहा महिन्यात चागल्या डझनभर खेपा घातल्या मुबईला. सांगा, कोण इतके कष्ट घेईल ? कोण इतकी तसदी घेईल ? सागा...

दोन शिका काढा की, राष्ट्रपती मुबईत हजर ! कुठल्याही कार्यक्रमाला अगत्याने बोलवा की राष्ट्रपती कळकळीने हजर! आज काय सिंधी फेडरेशनचा सोहळा आहे, तर उद्या काय लायन्स क्लबचं फंक्शन आहे. जिकडे जिकडे म्हणून जाता येईल, तिकडे तिकडे ग्यानी झैलसिंग जातात. चार गोड शब्दांचे फवारे सोडतात अन् जातात !

आता तर आमचा दाट समज आहे की, उद्या फडकेवाडीतल्या गणपतीसमोर घागरी फुकण्याचा कार्यक्रम झाला तर त्यालाही राष्ट्रपती डुलत डुलत हजर राहतील. मुबईकरांच्या दृष्टीने एक बरं आहे. रस्ते नीट, स्वच्छ ठेवले जातात. कधी कुठून ग्यानी येतील कोण जाणे ?

राष्ट्रपतीना पुन्हा पुन्हा मुबईला यावंसं वाटतं याला एक महत्त्वाच कारण म्हणजे इथली नाटकं. महाराष्ट्राला संपन्न रंगभूमीची देणगी आहे ना !

सध्या महाराष्ट्रात ज्या नाटककपन्या गाजताहेत त्यात सर्वांत आघाडीवर आहे ती अब्दुल रहमान अंतुले याची नाटककंपनी. हा सगळा एकखांबी तंबू आहे. ही कपनी मुख्यत: एकपात्री प्रयोग करते. वा ! काय बहारदार वन–मॅन कार्यक्रम होतात. विचारू नका ! अंतुले सध्या कोकणात आपले प्रयोग करीत असतात.

दुसरी कंपनी ती राज्याची अधिकृत नाटककपनी. त्याचे पुढारी वसंतदादा पाटील. ही कंपनी तशी जुनी झाली आहे. यातले अनेक भिडू जेरीस आले आहेत. काही प्रकृतीने बेजार झाले आहेत. काहीजण काठी टेकत–टेकत चालतात; परंतु अद्याप वसंतदादा टिकून आहेत! त्यांचे काही प्रवेश सुंदर वठतात, फक्त भलत्या वेळी भलताच डायलॉग मारण्याची. या दादाची जुनी सवय आहे.

दादाच्याच कंपनीत स्त्रीभूमिका करणाऱ्या एक अष्टपैलू कलाकार आहेत. त्यांच्या अभिनयकौशल्याविषयी म्या पामराने काय लिहावे ?

ह्या बाई कधी मळवट भरून, पजाबी सलवार कमीज पेहरून, कानडी भाषेतले डायलॉग बोलतात, तर कधी दमदार आवाजात थेट पिटापर्यंत ऐकू जातील अशी पल्लेदार स्वगत बोलून समोरच्याला घायाळ करतात. एवढंच की, बाईंना अधून–मधून दम्याचा विकार बळावतो. वसंतदादा संगीत नाटकमंडळीची चलतीची दोन नाटकं म्हणजे 'नेकजात मराठा' आणि 'शूरवीर मराठा !'

दुसरी एक मातब्बर कंपनी म्हणजे रामराव आदिक संगीत कंपनी. 'एकच प्याला' हे या कपनीचं पेटंट, हातखंडा नाटक. या कंपनीत खुदाबक्ष, तळीराम वगैरे रोल अदा करणारे अनेक जुने–जाणिते नट आहेत !

खुद्द रामराव आदिक हे एक कसबी नट आहेत. भावनेच्या भवसागरात ते इतके बुडून जातात की, सकाळी त्यांचा एक 'मूड' असतो, दुपारी दुसरा अन सध्याकाळी एकदम वेगळा ! त्याच्या या अशा तरल भावस्थितीमुळे त्यांच्या सौगड्यांची मोठी पचाईत होते. आदिकांना एका नाटकातलं वाक्य दुसऱ्या नाटकात टाकण्याची सवय आहे. सध्या या कंपनीतर्फे 'सगीत खडाष्टक' च्या तालमी होताहेत; पण आदिकाचा 'मूड' फिरला तर 'साष्टाग नमस्कार' सुद्धा सादर होईल. सागता येत नाही !

बाबासाहेब भोसल्यांच्या वगातले इरसाल विनोद ऐकून खुद्द श्रीमती इंदिरा गाधी खुदकन् हसल्या होत्या म्हणतात. दोन गंभीर प्रवेशामध्ये भोसल्याचा एक गुगली दहा मिनिटांचा सीन खपून जातो; पण शेवटी ते विदुषकच असल्यामुळे त्याना सहसा कोणी सीरियसली घेत नाही !

# अनवट

## ☐ अरबी संस्कृतीरक्षक

'माणूस 'मधून मिरजेच्या अरबावर लेखमाला आली होती. ती सगळ्या शेखसाहेबांनी वाचली का काय नकळे! कारण आता अरब राष्ट्रामध्येच परदेशी मुलीशी अरब पुरुषांनी लग्न करू नये यासाठी जोरदार प्रयत्न चालू आहेत. सयुक्त अरब अमीरातीत यासबंधी एक कायदा करण्याचा विचार चालू आहे.

तिथल्या फेडरल नॅशनल कौन्सिलतर्फे यासंबंधी एक प्रस्ताव आला असून जे पुरुष आपल्याच देशातील मुलीशी विवाह करतील त्यांना २५ हजार डॉलर्स इतके 'अनुदान' (म्हणजे हुंडा!) दिला जावा, मात्र परदेशी मुलीशी लग्न केल्यास त्या पुरुषाने तितकीच रक्कम सरकारला (दड म्हणून) द्यावी अशी तरतूद आहे. या प्रस्तावाला अमीरातीच्या महिला-सघटनेकडून जोरदार पाठिंबा मिळालाय्! तेथल्या अध्यक्षाच्या पत्नी शेखा फातिमा यांनीसुद्धा या गोष्टीला पाठिंबा दिला आहे

परदेशातील मुलीशीच अरब पुरुष बहुधा विवाह करतात यासंबंधी सरकारतर्फे एक पाहणी करण्यात आली आहे. त्यात म्हटले आहे की, अमीरातीतील ५० टक्के पुरुष विवाहयोग्य आहेत; परंतु ते अरब मुलीशी लग्न करीत नसल्याने अरब महिला कुमारीकाच राहतात. तसेच अरबी संस्कृती, राहणी, आचारविचार, कुटुंबपद्धती यावर दुष्परिणाम होतात. परकी मुलीशी विवाह करणाऱ्या अरबामध्ये प्रौढ व वद्धाचाच जास्त भरणा आहे. साधारणत: ६० वर्षांचे 'नवरे' वीस वर्षाच्या मुलीबरोबर लग्न करतात.

अमीरातीबरोबर कातारमध्येसुद्धा यासबंधात विचार चालू आहे. कुवेत व इराक या देशात अरबानी अरबी मलीशीच विवाह करावा यासाठी मोठमोठ्या सवलती जाहीर करण्यात येत आहेत!

तेथ २२ वर्षांच्या आतल्या अरब मुलीशी लग्न केल्यास १५०० डॉलर्स अनुदान व १५०० डॉलर्सचे कर्ज देण्यात येते. लग्नानतरच्या प्रत्येक मुलाच्या जन्मानतर हे कर्ज हप्त्याहप्त्याने माफ केले जाते! विद्यार्थ्यांना तर याबाबत विशेष सवलत दिली जाते. त्यानी अरब मुलीशीच विवाह केल्यास २२५० डॉलर्स इनाम, तसेच कॉलेजशिक्षण सपेपर्यंत मोफत घर, मोफत वाहतूक व पुढे कायम निवासव्यवस्थेसाठी अग्रक्रम असा मामला आहे!

पण मुळात ही अरबमडळी परकीय मुलीशी लग्न करतातच का? तर अमीरातीतील सामाजिक कार्यकर्त्यांचे असे म्हणणे आहे की, अरब मुलीच्या पालकाकडून वायुमूल्य (मेहर) म्हणून जबरदस्त रक्कम मागितली जाते. ती १५०० ते ४५ हजार डॉलर्सपर्यंत जाते. शिवाय लग्नातली 'आवश्यक' उधळपट्टी ४० हजार डॉलर्सपर्यंत जाते. त्यामानाने परदेशातील मुली 'स्वस्त' पडतात!

एवढेच कारण आहे?

असो. एकदर अरबस्तानातलेही संस्कृतीरक्षक जागे आहेत!

## ☐ रशियाचा पेच

तिकडे पाकिस्तानात जनरल झियानी राजकीय हालचालीवर बंदी टाकली त्याचा परिणाम म्हणून राजकीय हालचालीना जोरच आला आहे. झियासाहेबांनीही आता मुलाखती, सभा, संदेश याचा धडाका लावला आहे. दोन आठवड्यांपूर्वी लडनमधील 'इंपॅक्ट' या साप्ताहिकाला दिलेल्या मुलाखतीत त्यानी काश्मीरसाठी आपले प्रयत्न चालूच राहतील असा निर्वाळा दिला.

भारताने आमच्या सरहद्दीवर एवढी मोठी सेना का ठेवावी असा प्रश्न विचारून झिया स्वत:च म्हणतात 'रशिया भारतावर हल्ला करण्याची शक्यता लक्षात घेता, वेळप्रसगी ते सैन्य रशियाच्या बाजूला नेता यावे यासाठी पाकसीमेवर भारताच्या १५ डिव्हिजन्स आहेत असे मला इंदिरा गाधी यांनी कळविले आहे!'

झियासाहेबांनी प्रामाणिकपणे ही माहिती दिली असेल तर याबाबत दूरदृष्टी दाखविल्याबद्दल पंतप्रधान इंदिराबाईंचे कौतुकच करायला हवे. मात्र भारत–रशिया दरम्यान चागल्या संबंधात तणाव निर्माण व्हावा या दृष्टीनेही झियांचे हे विधान असण्याची शक्यता आहे.

याच वेळी रशिया व पाकिस्तान यांच्यामधले संबध सुधारत–नव्हे वाढत चालले आहेत. नुकताच पाकिस्तानच्या १९८४-८८ या विकास योजनेला रशियाने मदत करण्यासबंधीचा करार संमत झाला आहे. पाकिस्तानला धरणबाधणी, विद्युतप्रकल्प याच्यासाठी रशिाची मदत आहे. मात्र याचबरोबर रशियाने स्वच्छ सागितले की सरकारने अफगाणिस्तानमधील इस्लामी बडखोराना पाठिंबा देऊन अफगाणिस्तानला धक्का लावल्यास अफगाण व रशिया यांच्यातर्फे 'जॉइंट ॲक्शन' घेतली जाईल!

मदत देत असतानाच दुसरीकडे हा बडगा रशिया दाखवीत आहे. पाक अधिकाऱ्यांना याची जाणीव आहेच. ते म्हणतात, 'आम्हाला मदत देताना रशिया आज ना उद्या अफगाणिस्तानविषयी पेच घालणारच. ते उगाच मदत देणार नाहीत.

¤

## ☐ एक हिरा गळाला

९ फेब्रुवारी रोजी 'भरतनाटयम्'च्या थोर कलाकार तंजावर बालासरस्वती (जन्म १३ मे १९१८) याचे निधन झाले. सध्या प्रत्येक मुलीला (व आईला) भरतनाटयम् शिकण्याची हौस असते. मात्र या शतकाच्या मध्यापर्यंत मंदीरातल्या देवदासीच भरतनाटयम् करायच्या. बालासरस्वती यानी या नृत्याला प्रतिष्ठा आणून दिली.

त्याच्या घराण्यात दोनशे वर्षापासून संगीताची परपरा होती. त्याचे वडील, आजोबा हे गायक व वैणिक (वीणावादक) होते.

तंजावर दरबारातील भरतनाटयम् प्रगत करणाऱ्याचे वंशज कडप्पा पिल्ले हे बालाचे गुरू होते.

बाल-सरस्वती याचे नृत्य अजोड होतेच. शिवाय त्यांनी 'भरतनाटयम्' हा ग्रंथ लिहिला. १९५५ मध्ये त्याना संगीत नाटक अकादमी पुरस्कार मिळाला. संगीतकलानिधी (१९७३) पद्मभूषण (१९५७) या त्यांच्या इतर उपाधी. सत्यजित रे यांनी त्यांच्यावर एक लघुपटही काढला आहे.

– संजय संगवई

# एम्प्लॉयमेंट एक्सचेंज-दैववाद नको; डोळस शिस्त पाहिजे

मेधा टेंगशे

माणूस एक वेळ मरून जाईल; पण तरी त्याला 'एम्प्लॉयमेंट-एक्स्चेंज'चा 'कॉल' यायचा नाही...'

'एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज' च्या कामामध्ये चुका होत असतील – नाही असे नाही–पण आम्ही म्हणतो, त्याची चागली बाजू बघा. मात्र, तसे मुळीच होत नाही. उलट असंतुष्ट लोक आमच्यावर केवळ टीका करतात...

सेवायोजनकार्यालयावर लेख लिहिण्याच्या निमित्ताने वरील चर्चांची जेव्हा मी मनाशी पुन्हा एकदा उजळणी केली तेव्हा एक गोष्ट पटकन् लक्षात आली– 'सेवायोजनकार्यालय' (पर्यायाने तेथे काम करणारे अधिकारी आणि इतर कर्मचारी) आणि तिथे नोकरीसाठी नोंदणी करण्यास येणारे उमेदवार याच्यातील 'सवाद' च नाहीसा झाला आहे. त्यामुळे परस्पराबाबत एकमेकांच्या मनात गैरसमज–अढी निर्माण झाल्यासारखी वाटते.

या साऱ्या पार्श्वभूमीवर सेवायोजन-कार्यालयाच्या कार्यपद्धतीचे निःपक्षपाती मूल्यमापन करावे, त्यातील त्रुटींचा शोध घ्यावा, जमल्यास या त्रुटी दूर करण्यासाठी काही मार्ग सुचवावेत आणि मुख्य म्हणजे या साऱ्यातून सेवायोजनकार्यालय व सामान्य जनता यांच्यात 'संवादा'चा, परस्पर सहकार्याचा पूल तयार करावा असा प्रयत्न या लेखाच्या लिखाणामागे आहे.

सुरुवातीस या कार्यालयाच्या निर्मितिसदर्भात थोडक्यात माहिती द्यायला हवी. १९४५ साली सेवायोजनकार्यालयाची स्थापना झाली १९४६ सालपर्यंत ती माजी सैनिकांच्या नोंदणीपुरतीच मर्यादित होती. १९४६ साली मात्र त्यात सर्वांचीच नोंदणी होऊ लागली. या कार्यालयाचे कामकाज १९५६ सालापर्यंत केंद्रसरकारच्या अखत्यारीत होते; परंतु त्यानंतर दैनंदिन कामकाजाच्या सोयीसाठी ते राज्यसरकारकडे सोपविण्यात आले. महाराष्ट्रापुरते सागायचे झाल्यास जवळजवळ ४४ सेवायोजन–कार्यालयांची केंद्रे आहेत.

सदर लेख प्रामुख्याने पुण्यातील सेवायोजन–कार्यालयाशी निगडीत आहे.

पुणे शहरात एकूण तीन सेवायोजन–कार्यालयांत उमेदवाराची विनामूल्य नोंदणी केली जाते. ती कार्यालये पुढीलप्रमाणे–

१. उपप्रादेशिक सेवायोजन–कार्यालय, सरदार मुदलियार रोड, पुणे ११.
२. विद्यापीठ सेवायोजन माहिती व मार्गदर्शनकेंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे ७.
३. उपप्रादेशिक सेवायोजन–कार्यालय, पिंपरी, पुणे १७.

या कार्यालयात नाव नोंदविलेल्या उमेदवारांना कुशल–अकुशल अशा दोन्ही क्षेत्रातील नोकऱ्या मिळण्याची शक्यता असते. त्यात नवशिके उमेदवार जशी आपली नाव नोंदवितात तसेच एकीकडे नोकरी करताना आहे त्या नोकरीहून अधिक चागली नोकरी मिळावी, या उद्देशाने नाव नोंदविणारे उमेदवारही आढळले.

सेवायोजनकार्यालयाच्या कामकाजाचे स्वरूप पाहण्यासाठी उमेदवारांच्या नावनोंदणीसंबंधी थोडक्यात सागणे आवश्यक वाटते.

## नाव–नोंदणी

प्रत्येक सेवायोजन–कार्यालयाची कार्यकक्षा ठरलेली आहे. सेवायोजन-कार्यालयाच्या कार्यकक्षेच्या विभागात राहणाऱ्या उमेदवाराना संबंधित कार्यालयात आपल्या नावाची नोंद करता येते. ही नोंद दोन प्रकारे करता येते– १) प्रत्यक्ष कार्यालयामध्ये जाऊन किंवा २) पोस्टाद्वारे. ज्या उमेदवारांना पोस्टाद्वारे आपल्या नावाची नोंदणी करावयाची असेल त्यांनी क्ष–२६ क्रमाकाचा विहित नमुना/अर्ज भरून तो प्रमाणपत्रांच्या, सही-शिक्क्यांच्या खऱ्या प्रती (true–copies) सोबत जोडून पोस्टाने पाठविल्यास त्याची नोंदणी होऊ शकते. मात्र स्थानिक उमेदवारांनी नोंदणीसाठी स्वत: यावे लागते. तसेच शैक्षणिक अर्हता, पूर्वानुभव इत्यादीचे प्रमाणपत्र तर उमेदवारांना सादर करावे लागतेच; पण जातीचा दाखला (वर्गीकृत जाती, वर्गीकृत जमाती, भटक्या जाती आणि इतर मागासलेल्या वर्गातील उमेदवारासाठी ही अट आहे.) सैन्यातून मुक्त झालेल्या व्यक्तीसाठी विमुक्ति प्रमाणपत्र, स्वातंत्र्य–सैनिक अगर त्यांच्यावर अवलंबून असलेले उमेदवार, कमी केलेला शासकीय नोकरवर्ग आदी उमेदवारानाही प्रमाणपत्रे सादर करावी लागतात.

या प्रक्रियेनतर गुणवत्तेनुसार सामान्यपणे एका रिकाम्या पदासाठी दहा उमेदवारांची शिफारस केली जाते. रिक्त पदाची संख्या अधिक असेल तर हे प्रमाण कमी असते. प्रत्येक उमेदवाराची शिफारस ही किती वेळा करावी, याबाबत नियम आढळला नाही. परंतु काही व्यवसायांच्या बाबतीत जागांच्या मानाने नावनोंदणीचे प्रमाण बरेच मोठे असते. अशा व्यवसायातील जागासाठी ३ ते ५ वेळा पाठवण्यात आलेल्या उमेदवाराची शिफारस शेवटच्या शिफारशीपासून ६ महिने पर्यंत स्थगित ठेवण्यात येते व त्याच्या नंतरच्या उमेदवारांना सधी दिली जाते.

उमेदवारांच्या नोंदणीची मुदत एक वर्षाची असते. नोकरी मिळेपर्यंत नोंदणीचे नूतनीकरण मुदत संपण्याच्या आत करून घेणे अत्यावश्यक आहे. नोंदणीचे नूतनीकरण प्रत्येक वर्षी नोंदणी अगर नूतनीकरण ज्या महिन्यात केले असेल त्या महिन्यात कधीही करता येते. विशेष म्हणजे जोडकार्ड पाठवून हे नूतनीकरण पोस्टाद्वारेही करता येते.

सेवायोजन कार्यालयाची एकूण कार्यपद्धती पाहिल्यावर स्वत:ची नावे नव्याने नोंदवण्यास आलेले किंवा स्वत:च्या नावनोंदणीचे अनेक वर्षे नूतनीकरण करत असलेल्या स्त्री–पुरुष उमेदवारांशी मी बोलले. त्यातून या कार्यालयाच्या कामातील त्रुटी जाणवल्या. त्या त्रुटींसंबंधी खुलासा मिळावा स्पष्टता यावी म्हणून मी सेवायोजन अधि-

कामगारांशी चर्चा केली. या सान्यातून पुढील चित्र उभे राहिले.

' सेवायोजन कार्यालया 'त उमेदवारांची नावनोंदणी जितक्या संख्येने होते त्या तुलनेत त्याना नोकरी मिळण्याचे प्रमाण कमी आहे. याबाबत सर्व अधिकारी वर्गाचे एकमत दिसले. विशेष म्हणजे, 'याचे कारण नोकऱ्यांची अनुपलब्धी आणि वाढती लोकसंख्या', अशी ढोबळ उत्तरे कुणीच दिली नाहीत !...

सेवायोजन कार्यालयाच्या कामकाजाला येणारी मर्यादा दोन कारणामुळे निर्माण होते असे वाटले. एक म्हणजे त्या कार्यालयाच्या कामकाजामागचे धोरण; दुसरे म्हणजे त्या धोरणांची अंमलबजावणी करताना निर्माण होणाऱ्या विसंगती.

सुरुवातीस या कार्यालयांच्या धोरणातील विसगतीचा विचार करावयास हवा. सेवायोजन कार्यालय ही सरकारी यंत्रणा आहे. त्याद्वारे सर्वसामान्य नागरिकाना नोकरी मिळवण्याची संधी सरकारने उपलब्ध केली आहे. परतु त्याचवेळी महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ, महाराष्ट्र विद्युत मंडळ इत्यादी निमसरकारी संस्थांमध्ये जाहिरातीद्वारा उमेदवारांची निवड केली जाते. राष्ट्रीयकृत बँकांमध्येही नोकरीसाठी हाच मार्ग अवलंबिला जातो. अशावेळी सेवायोजन कार्यालयाला त्या निवडीमध्ये कोणतेच स्थान नसते. त्यामुळे सरकारच्याच अशा परस्पर विसगत धोरणामुळे सेवायोजन कार्यालय कुचकामी ठरते आहे !... स्पर्धात्मक परीक्षाच्या बाबतीत जाहिरातीद्वारा (पर्यायाने परीक्षा व मुलाखती) उमेदवारांची निवड करण्याची गरज समजू शकते. परंतु इतर सरकारी व निमसरकारी क्षेत्रात जाहिरातीचा मार्ग का अवलंबिला जावा हा प्रश्न खरोखरच विचार करण्याजोगा आहे. (तसेच एकीकडे सेवायोजन कार्यालयात नोकरी मिळवण्यासाठी नाव–नोंदणीची विनामूल्य व्यवस्था ठेवायची आणि दुसरीकडे इतर सरकारी क्षेत्रात नोकरीसाठी अर्ज स्वीकारासाठी त्याच बेकार उमेदवारांकडून विशिष्ट प्रवेश मूल्य घ्यायचे! सरकारी धोरणातील या विसंगतीचीही इथे नोंद करायला हवी.)

सेवायोजन—कार्यालयाच्या धोरणातील आणखी एका विसगतीवर बोट ठेवायला हवे. ही विसगती अकुशल कामगारांच्या सदर्भातील आहे. १९५९ च्या 'Employment Exchange of compulsory notification of vecancies act'

या कायद्यानुसार 'प्रायव्हेट सेक्टर' आणि 'पब्लिक सेक्टर' या दोन्ही क्षेत्रातील नोकऱ्यांबाबत काही विशिष्ट नियम आहेत. ज्या ठिकाणी २५ किंवा त्याहून अधिक कामगार नोकरीस असतील, तिथे हा नियम लागू आहे. त्यांना दर तिमाहीला नोकराची सख्या किती, त्यातील भरलेल्या जागा कोणत्या यंत्रणेमार्फत भरल्या आणि रिकाम्या जागा किती आहेत. इत्यादी माहिती 'त्रैमासिक विवरण पत्र' या सरकारी पत्रकासाठी कळवाव्या लागतात. त्याचबरोबर नवीन जागा भरतीसाठी ज्या मुलाखती घेतल्या जातात त्याची तारीखही सेवायोजन कार्यालयाला कळवावी लागते. परंतु यातील गोम अशी आहे की, अकुशल कामगाराबाबत मात्र जागेच्या भरतीसंबंधी अगर मुलाखतीच्या तारखेसबंधी कळविले पाहिजे, अशी अट नाही. त्यामुळेच अल्पशिक्षित आणि कुठलीही कारागिरी फारशी अवगत नसलेल्या अकुशल उमेदवारांच्याबाबतीत सेवायोजन कार्यालय ही यत्रणा अधिकच कुचकामी ठरली आहे. यामुळे आपल्या रोजगाराबाबत (घटनेने 'मूलभूत हक्क' म्हणून दिलेली) जबाबदारी या कायद्यातील त्रुटीमुळे सरकार आपोआप टाळू शकते, याचे भान नसलेला हा अकुशल कामगाराचा वर्ग अधिकच हतबल झालेला दिसला. कारण ह्या लेखाच्या निमित्ताने मी जेव्हा रास्तापेठेच्या सेवायोजनकार्यालयात गेले होते तेव्हा त्याच्या प्रातिनिधिक मुलाखतीतून त्याच्या अगतिकतेचे निरनिराळ्या स्वरुपात प्रत्यंतर आले.

मला आठवतय— ती दुपारी अडीचची वेळ होती. रास्तापेठ सेवायोजन कार्यालयाच्या बाहेर १८ ते ३५ या वयोगटातील तरुण मुले बसली होती. मी त्याच्याशी बोलण्यास सुरुवात केली. एक उमेदवार म्हणाला 'बाई, मी सव्वीस वर्षाचा. दहावी पास आहे. नाव नोंदवून चार वर्षं झाली. अजून एकदाही 'कॉल' आलेला नाही. आता आई-वडिलाबरोबर शेतमजूरी करतोय. मला नाही वाटत आता 'कॉल' येईल. त्यासाठी नशीब पाहिजे'...

तितक्यात एक उमेदवार माझ्याजवळ आला आणि म्हणाला—

'बाई, सगळा वशिल्याचा मामला आहे. मी नववी शिकलेला. ७९ साली नांव घातलय आणि एकदाही 'कॉल' नाही आणि माझ्यावरोबरच नाव नोंदवलेल्या पोराला ५–६ कॉल आले. हे असं का?.. ..

## नुसती आगपाखड !

त्या दोघाच्याही प्रतिक्रिया परस्परभिन्न आणि दोन टोकाच्या असल्या तरी त्यामागची हतबलता सारखीच होती. मी याहून काही वेगळे ऐकण्यास मिळते का, म्हणून तेथील जवळजवळ सर्व उमेदवाराशी बोलले. बहुतेक अकुशल असलेल्या उमेदवारानी भिन्न–भिन्न शब्दात वरील स्वरूपाची प्रतिक्रिया व्यक्त केली.

अकुशल उमेदवाराहून वेगळी अशी परिस्थिती कुशल उमेदवाराबाबत आहे का, याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. याबाबत सेवायोजन–अधिकाऱ्याशी चर्चा केली असता, आणखी एक मुद्दा सापडला. काही वर्षांपूर्वी झालेल्या राज्यकर्मचाऱ्याच्या संपात ज्या लोकानी पर्यायी कर्मचारी म्हणून काम केले त्याना आता सरकारी नोकरीमध्ये प्राधान्य दिले जाते. त्यांची सख्या जवळजवळ ४९००० असून गेल्या वर्षापर्यंत फक्त १००० लोकाना सामावून घेता आले आहे. याचाच अर्थ असा की, याना सामावून घेतल्याशिवाय इतर उमेदवाराचा फारसा विचार होणार नाही. याचा अर्थातच कुशल उमेदवारावर (ज्यांनी सपकाळात 'पर्यायी कर्मचारी' म्हणून काम केले नाही) निश्चितच अटळ परिणाम होणार आहे.

शिवाय आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, सेवायोजनकार्यालय ही उपलब्ध असलेल्या जागाची माहिती देणारी यंत्रणा आहे. ती स्वत: नोकऱ्याची उपलब्धी अगर निर्मिती करीत नाही. त्याच्या या भूमिकेमुळे ही यंत्रणा उमेदवाराना नोकरी मिळवून देण्याबाबत तुलनेने असमर्थ ठरते.

सेवायोजन–कार्यालयाच्या कामकाजाला अंमलबजावणी करताना आलेल्या मर्यादाही नोंदवायला हव्यात. काही बाबतीत तर

उमेदवाराचे असहकार्यही या मर्यादाना हातभार लावते. याबाबतीत श्रीमती विजया तेरे या स्त्री–उमेदवाराचा अनुभव लक्षणीय आहे. त्या म्हणाल्या–

### नव्या सूचना

'मी डी. एड्. प्रथम वर्गात उत्तीर्ण झाले आहे. मला नाव नोंदवून २ वर्षे झाली. माझ्याबरोबर आणखी ५–६ मुलींनी नावं नोंदविली. त्यातील एक मागासवर्गीय मुलगी होती. तिला ५–६ वेळा 'कॉल' आला. तिला दर वेळेला नोकरी मिळत गेली; पण 'पहिल्या नोकरीपेक्षा दुसरी चागली' या विचाराने तिने दोन वर्षांत ६ नोकऱ्या बदलल्या! त्यासाठी आपल्याला पहिली नोकरी मिळाल्यानंतर तिने नावच रद्द केले नाही आणि असा फायदा घेतला. मला मात्र दोन वर्षांत एकदाच 'कॉल' आला. त्या नोकरीसाठी मी काही अडचणीमुळे जाऊ शकले नाही. तसे मी ताबडतोब कार्यालयाला कळवले....आमच्या दोघीच्या अनुभवावरून मला असे वाटते की, ज्या उमेदवाराला 'सेवायोजन कार्यालया'तर्फे नोकरी लागेल त्याने तसे कार्यालयाला कळवून आपले नाव रद्द करावे म्हणजे इतर नोकऱ्यांबाबतची 'कॉल'ची संधी दुसऱ्यांना घेता येईल...' खरं म्हणजे, सेवायोजन कार्यालयाची या संदर्भात एक अट मुळात आहेच. ती अशी की, 'उमेदवाराने स्वप्रयत्नाने अथवा सेवायोजन कार्यालयाकडून सहाय्य घेऊन नोकरी मिळविली असेल अथवा या कार्यालयाच्या मदतीची त्याला आवश्यकता राहिलेली नसेल त्या वेळी ओळखपत्र विनाविलंब सेवायोजन कार्यालयाकडे पोस्टाने परत पाठविले पाहिजे.' असे असताना, उमेदवार सेवायोजन कार्यालयाच्या सहकार्याचा दुरुपयोग कसा काय करू शकतात? या अनुभवावरून आणखी एक विचार सुचला की, ज्या संस्थेत ( अगर मालकाकडे ) उमेदवार सेवायोजन कार्यालया'तर्फे नोकरीस लागेल त्या संस्थेने (अगर मालकाने) त्या उमेदवारांची नावे सेवायोजन कार्यालयाला ताबडतोब सक्तीने कळवावीत. या सक्तीमुळे त्या संस्थेने सेवायोजना कार्यालयातर्फे आलेल्या किती उमेदवाराना घेतले हे तर कळेलच; पण त्याचबरोबर कुठलाही उमेदवार सेवायोजन कार्यालयाचा वरीलप्रमाणे गैरफायदा घेऊ शकणार नाही.

सेवायोजन कार्यालयाच्या क्षमतेबाबत अनेक शंका, गैरसमज पसरले आहेत. ते गैरसमज दूर करण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या युवा आघाडीने सुचवलेला मार्ग स्वागतार्ह आहे. तिची मागणी अशी आहे की, 'टेलिफोन एक्चेंज'प्रमाणे सेवायोजन कार्यालयात प्रतीक्षकांची यादी (waiting list) वरचेवर जाहीर करावी– त्याचप्रमाणे विशिष्ट कालावधीत किती उमेदवारांना नोकरी मिळाली, हेही स्पष्टपणे जाहीर करावे. यात सेवायोजन कार्यालयाच्या कामासबंधीचे गैरसमज तर दूर होतीलच; परंतु उमेदवाराची यादी जाहीर करण्याच्या या पद्धतीमुळे भ्रष्टाचाराला, वशिलेबाजीला निश्चितच आळा बसेल. मुख्य म्हणजे सेवायोजन कार्यालयातील कर्मचारी, अधिकारी आणि उमेदवार – पर्यायाने सर्वसामान्य जनतेत खुला संवाद होईल.

सध्या बेकारीच्या प्रश्नाची तीव्रता अनेक राजकीय पक्षांना जाणवल्याने त्यांनी त्याबाबत निरनिराळ्या भूमिका घेतलेल्या दिसतात. ही घटना निश्चितच आनंददायी आहे; परंतु या संदर्भात एक महत्त्वाची गोष्ट अशी वाटते की, केवळ सेवायोजन कार्यालयाच्या कामकाजावर दोषारोप करून थांबू नये. कारण आपल्याकडे नेहमीच धोरणाची अमलबजावणी करणाऱ्या नोकरशाहीकडे बोट दाखवून सत्ताधारी पक्ष आपली सुटका करून घेताना तरी दिसतो किंवा विशिष्ट पक्ष राज्यकर्ता असल्याने बेकारीचा प्रश्न सुटत नाही. आपला पक्ष हा प्रश्न सोडवू शकेल' अशा 'निवडणुकीय धोरणा'तून विरोधी पक्षाकडून हा प्रश्न मांडला जातो; परंतु अशा दोन्ही भूमिका टाळून हा प्रश्न विचारात घ्यायला हवा व मांडायला हवा.

त्यामुळेच मग सेवायोजन कार्यालयाच्या सध्याच्या स्वरूपात, कामकाजात अनुकूल बदल घडून येईल. सध्या चालू असलेले स्वयंरोजगार, बेकारभत्ता, रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम (या योजनेखाली सेवायोजन कार्यालय (पर्यायाने सरकार) उमेदवाराला सहा महिने वेतन देते आणि त्यात त्या उमेदवाराने विशिष्ट संस्थेत काम करावयाचे व नंतर त्या संस्थेने उमेदवाराला आपल्या संस्थेत कायमचे सामावून घ्यावयाचे) इत्यादी उपक्रम सर्व गरजू लोकापर्यंत पोहोचतील आणि त्याचबरोबर – ( अ ) सेवायोजन कार्यालयातर्फे 'तात्पुरती' नोकरी लाभणाऱ्या उमेदवाराचे प्रश्न सोडविणे. ( ब ) निवड होण्यासाठी ज्या मुलाखती घेतल्या जातात त्या मुलाखतीचे प्रशिक्षण देण्यासाठी सेवायोजन कार्यालयातर्फे एक प्रशिक्षण विभाग चालविणे. ( क ) स्वयंरोजगारासाठी प्रयत्नशील असणाऱ्या उमेदवाराच्या मार्गात निर्माण होणाऱ्या अडथळ्यांविरुद्ध पाऊल उचलणे इत्यादी नवीन योजना आखता येतील.

सेवायोजन कार्यालयावरील हा लेख पूर्ण करताना एक गोष्ट मात्र ठामपणे मांडता येईल ती म्हणजे या यंत्रणेच्या सध्याच्या कार्यपद्धतीबाबत निराश होऊन केवळ दैववादी बनून जसे चालणार नाही तसेच तिच्यावर नुसती आग पाखडण्यानेही काही होणार नाही! त्यासाठी शिस्तबद्ध, डोळस असे सामूहिक प्रयत्नच करायला हवेत. □

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे
प्रेरणादायी चरित्र

**एक होता कार्व्हर**

**लेखिका : सौ. वीणा गवाणकर**
दुसरी आवृत्ती
मूल्य : तीस रुपये
**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पुणे ३०

कथा

# लेकीचा बाप

शाम देशमुख

रात्रीचे अकरा वाजून गेले होते; पण तिला अजून झोप येत नव्हती. नवरा अजून आला नव्हता म्हणून नव्हे, कारण नवऱ्याजवळ घराची लॅच की होती आणि त्याचे हे असे उशिरा येणेही नवे नव्हते; पण सकाळी लेकीने जे सांगितले, ते ऐकून ती दडपल्यासारखी झाली होती.

नवऱ्याच्या गाडीचा ओळखीचा हॉर्न ऐकून ती उठली आणि बेडरूमच्या खिडकीशी लाइट न लावता उभी राहिली. गाडी गॅरेजमध्ये न आणता त्याने बाहेरच फाटकाजवळ उभी केली, तेव्हा ओळखायचं ते तिने ओळखलं. रात्री 'जास्त झाली' आणि सरळरेषेत ड्राइव्ह करून गॅरेजमध्ये गाडी आणू शकू याची खात्री नसली की, तो मोटार बाहेरच ठेवी. तिला मनातल्या मनात वाटे, एवढी तरी शुद्ध राहते, हे नशीब!

नवरा तिच्या अगावरून कपडे बदलायला गेला तेव्हा दारूच्या भपकाऱ्याबरोबरच त्यात मिसळलेला नवाच जनानी सेंटही तिला जाणवला. नवी मैत्रीण की जुन्याच मैत्रिणीला दिलेल्या नव्या सेंटची भेट? पण अशा प्रश्नाभोवती आताशा तिचे मन गुरफटत नसे. लग्नाला चौदा वर्षे होऊन दोन सुरेख मुले आणि इतर सारी सुखे हात जोडून उभी असताना चोरवाटेने आलेला हा पराभव तिने आता मुकाट्याने मानला होता; पण आज... लेकीने ते सांगितल्यावर......

सकाळचे लेकीशी झालेले ते संभाषण, तिला समजावून सांगितलेले बोलणे तिला आठवले आणि तिला विलक्षण उदास, एकाकी वाटू लागले. कशा पार पाडणार आपण मुलाच्या, संसाराच्या जबाबदाऱ्या? ह्या जबाबदाऱ्या एकटीच्या जिवावर कशा पेलणार? बाहेर अष्टमीचे मलूल चांदणे पसरले होते, त्याकडे पाहता, पाहता तिचा एकाकीपणा वाढत चालला. आपण एका उंच कड्याच्या अगदी टोकावर उभ्या आहोत, आपल्याला त्या धोकादायक टोकापासून मागे ओढणारेही कुणी नाही आणि खालच्या दरीत कोसळून मेल्यावर आपल्यासाठी रडणारेही कुणी नाही, अशी भावना तिचे मन व्यापू लागली.

स्वतःच्या मनाला सावरत ती नेहमीप्रमाणे मुलाच्या खोलीत त्यांच्या अंगावरची पांघरुणे सारखी करायला गेली. पोरीकडे पहात तिने ठरवलं, उद्या नवऱ्याला हे सांगायचंच. त्याला नको का कळायला?

सकाळी उठल्याबरोबर त्याच्या कानावर हे घालायचं, असं ठरवून ती अंथरुणावर पडली. त्या निश्चयाने तिला हळूहळू झोप आली.

रात्रीचा नाइट-गाउन बदलून, साडी नेसून चहाच्या ट्रेसह ती बेडरूममध्ये आली; तेव्हा नवरा ब्रश करून, परत अंथरुणावर पसरला होता. त्याच्या स्वभावातल्या अनेक विरोधाभासांपैकी हा एक. बेड-टी लागे; पण दात ब्रश केल्याखेरीज तो घेत नसे.

न बोलता तिने करून दिलेल्या चहाचे तो घुटके घेत होता, मजेत आणि चवीचवीने. आणि ती त्याच्याकडे पहात होती. मनात अनेकदा येऊन गेलेलेच विचार परत येत होते.

कसा बदलला हा! आपल्याला कळलेसुद्धा नाही. चांगला ब्राह्मण घरातला, वडील मोठ्या शाळेचे मुख्याध्यापक, आई शिक्षिका. घरात नेहमी चांगले वातावरण, चांगले संस्कार! इंग्लंडहून एम. बी. ए. करून आल्यावर लग्न झालं. तेव्हा कसा आपल्या भोवती असायचा. आपल्या दाट, लांबसटक काळ्याभोर केसांशी खेळायचा, तऱ्हेतऱ्हेच्या वेण्या घालायचा, आपल्या डोक्यात विविध रंगांची फुलं माळायचा! मग थोरली झाली. किती लाडकी त्यांची! अजूनही आहे. मग ही नोकरी लागली. दोनदा अमेरिकेला जाऊन आला. लहान वयात जनरल मॅनेजर झाला. कंपनीचा व्यापार खूप वाढला म्हणून कंपनीने त्याला सर्व facilities दिल्या. मग मुलगा झाला!

आणि मग यायला लागल्या कानावर एक-एक गोष्टी. अगदी पहिल्यादा, मुलाच्या वेळी ती बाळंत होती, तेव्हा त्याच्या ऑफिसात आलेली नवी गोवानीज स्टेनो. उफाचाचे तरुण शरीर आणि घट्ट, आखूड झगे! प्रथम तिने स्वतःची समजूत घातली, आपण बाळंतपणामुळे सहा महिने दूर होतो, म्हणून हॉटेलचे अन्न भुकेपोटी खावे, तसा गेला असेल तो तिच्याजवळ!

पण त्या गोष्टीची, बाहेरच्या रंगेलपणाची त्याला चटकच लागली का? प्रायव्हेट कंपनीतली मोठ्या पगाराची नोकरी, सत्ता, कर्तबगारीच्या चढत गेलेल्या एकेक पायऱ्या. त्याच्या कंपनीने मोठमोठी पचताराकित हॉटेल्स चालवण्याचा नवाच बिझिनेस काढला आणि त्याला त्या विभागाचा प्रमुख नेमले. बघता बघता त्याने तो व्याप भलताच यशस्वी आणि फायदेशीर करून दाखवला.

भरपूर काळा पैसा असलेल्या घरातल्या आधुनिक बायका ह्या हॉटेलात चालवायला फॅशनेबल कपड्याची, दागिन्यांची, शोभेच्या वस्तूंची दुकानं अफाट भाड्याने घेत. ह्या निमित्ताने त्याच्याशी ह्या स्त्रियांची गाठ पडे. नेलपॉलिशपासून कपड्यापर्यंत सर्व काही इंपोर्टेड वापरणाऱ्या, स्वतःच्या दोन-दोन गाड्या असणाऱ्या आणि जिद्दीने तरुणपण टिकवणाऱ्या त्या स्त्रियांना त्याचा मर्दानी देखणेपणा, चाळिशी आल्यावरही अजून आकर्षक असलेले व्यक्तिमत्त्व, दाट काळे केस, परदेशप्रवासाने आलेली वागण्यातली सफाईदार ऐट! सारेच कुणालाही आवडण्यासारखेच होते.

'बघा हो हा इंपोरटेड सेंट कसा आहे तो' असं म्हणत आणि पदर पाडत त्याच्या मानगळ्यावर धुंद करणाऱ्या नव्या सेंटचा फव्वारा टाकणारी बघता बघता त्याच्या मिठीत येई. त्याच्याबरोबर कुठेही यायला तय्यार होई.

जीवनाचे एक नवेच दालन या स्त्रियांच्या रूपाने त्याच्या पुढे उघडले गेले. त्याचा अहकार भलताच सुखवला गेला. नोकरीतली कर्तबगारी वाढत होतीच. त्यात बायको केव्हा मागे पडली, तिलाच कळले नाही.

तिने पहिल्यांदा खूप विरोध केला, रडली, वचनं घेतली आणि तेव्हाच्या त्याच्या पवित्र्याने तीच चकीत झाली. तो तिच्याशी वाद घालत नसे, तिचा अपमान करत नसे, ओरडत नसे आणि दिलेला शब्द पाळतही नसे. अमकी-तमकीला भेटू नका असे तिने

सांगितले की तो हसून 'बर' म्हणे; पण भेटी थाबवतही नसे.

मोठमोठ्या आवाजात भांडण करणं, जाब विचारणं, हे तिच्या स्वभावात बसत नव्हतं. नोकरासमोर, मुलांसमोर असं भांडणं तिला भयकर कमीपणाचं वाटे, अपमानाच वाटे, म्हणून अशा गोष्टी स्वत: बद केल्याशिवाय दुसऱ्याच्या सागण्यावरून बद होत नाहीत, हे मनोमन ओळखून ती गप्प बसत होती आणि मनातल्या मनात खचत होती. तिचा एकाकीपणा वाढत होता, त्या अबोल दु:खाला वाटसापडत नव्हती. आता मात्र...

तिला विचारात गढलेली पाहून तो म्हणाला, 'कुठे रमली आहेस ? दुसरा कप दे ना चहाचा ?'

'रमते कुठली' असं म्हणत तिने चहाचा दुसरा कप करायला सुरुवात केली आणि निश्चयाने म्हणाली, 'काल परत किती उशीरा आलात आणि गाडी पण बाहेर ठेवलीत.'

तो चहाचा कप घेत म्हणाला, 'त्यात नवीन काय वाटलय तुला आता ?'

त्याच्या थंडपणाने ती जास्तच अगतिक झाली आणि कळवळून म्हणाली, 'अहो, मला नसेल नवीन काही; पण मुलांचा विचार कराल की नाही ? आता मोठी होत चाललीत ती. हे तुमच उशीरा येणं, आंघोळीच्या आधी येणारा हा दारूचा नि सेंटचा वास, गाडीत सापडणाऱ्या पिना, बाहेरचे लेडीज हातरुमाल—

'अहो, पोरं सिनेमा पाहतात, मासिकं वाचतात, त्यांना कळतं सगळं. आणि आता तर....'

तो गप्पच !

सगळं अवसान गोळा करून ती म्हणाली, 'काल तुमची लेक वयात आली याचा तरी काही विचार कराल की नाही ?'

त्याने एकदम डोळे विस्फारले. चहाचा अर्धा भरलेला कप ट्रेमध्ये ठेवत तो म्हणाला, 'अग, सांगतेस काय ? किती लहान आहे चांदु अजून.'

'लहान तुम्हाला ! जगाला आणि निसर्गाला नाही. साडेबारा वर्षं पूर्ण झालीत तिला. निसर्गाने आपल काम सुरू केलं आहे. आता कसली लहान–लहान करता तिला !'

न बोलता तो उठून बाथरूममध्ये दाढी आंघोळीसाठी गेला. चहाचा दुसरा कप अर्धाच टाकून. असं कधी आतापर्यंत झालं नव्हतं.

सकाळची आन्हिक आटपून तो ब्रेकफास्टसाठी डायनिंग टेबलवर बसला. तशी लेकीने पाठीमागून त्याच्या गळ्यात दोन्ही हात टाकत मागणी केली. 'डॅडी, मला ५० रु. हवेत. आमच्या शाळेत बालमेळा आहे ना, तेव्हा मला on-the-spot painting competition मध्ये भाग घ्यायला नवीन पेंटिंगचं सामान आणायचंय.'

काही न बोलता तो कोटातून पैशाचं पाकीट काढू लागला तशी बोर्नव्हिटाचे ग्लास तयार करत बसलेली बायको रागावून म्हणाली, 'अहो, लगेच काय पैसे काढून देता ! लहान पोरीच्या हातात ५० रु. काय देता लगेच !'

तो गोंधळून बायकोकडे पहात राहिला. सकाळीच तर सांगत होती ना ही की लेक मोठी झाली म्हणून ! आणि आता म्हणते लहान !

'आई पण अशी आहे ! डॅडी चागले तरी होते तर...' लेकीची फुणफुण झाली सुरू.

'हे बघ, तुला पेंटिंगचं नवीन सामानच हवं आहे ना ? मी देते तुला आणून आणि उरलेले पैसे पण देते. मग तर झालं ? पण ५० रु. अंगावर घेऊन नाही जायचं शाळेत. चल बैस ब्रेकफास्टला.'

आईच्या बोलण्यावर लेकीचे समाधान झाले आणि ती बापासमोर बसली. तो कौतुकाने तिच्याकडे पहात तिची बडबड ऐकू लागला. हौसेने त्याने तिचे नाव चादणी ठेवले होते. शुक्राच्या चांदणीसारखीच कोमल, स्निग्ध तेजाने, यौवनाच्या चाहुलीने पोर तेजाळली होती. हिला कुठे तरी लपवून ठेवावी, जगासमोर काढूच नये, हा विचार त्याच्या मनात चमकून गेला आणि परत परत येत राहिला.

मग ऑफिसमध्ये गेल्यावर किती तरी वेळ त्याच्या डोळ्यांसमोर लेकीची जन्मल्यापासूनची अनेक गोजिरवाणी रूपे येत राहिली. लहानपणापासूनच ती तब्येतीने उत्तम निरोगी होती. त्यातून रूपवान आई–बापाकडून चागल्याच गोष्टी घेऊन आलेली. तिचा गुलाबी रंग, निळसर डोळे, पिंगट केस, सारेच कसे चित्रासारखे होते. ते सारे त्याला आठवत राहिले अगदी ऑफिसातल्या आपल्या केबीनमध्ये जाऊन टेबलाशी बसेपर्यंत ! आणि त्याला वाटले ही आपली चांदणी, जिला आपण चादू, बेबडी आणि काय काय म्हणतो, ती वयात आली ?

म्हणजे...म्हणजे...काय ? कळीचे हळूहळू फुलात रूपांतर व्हावे तसे तिचे रूपांतर


शुभेच्छा

उत्कृष्ट व अद्यावत पादत्राणांसाठी भेट द्या.

**'चर्मशिल्प' फुटवेअर**

मोठ्या तळ्यावर, चर्मकारलाईन

शॉप नं. ६, इचलकरंजी



**भवानी वीव्हिंग मिल्स**

इचलकरंजी ग्रे मलमल व केम्ब्रिकचे उत्पादक

शांतीनगर, इचलकरंजी

एका तरुण स्त्रीमध्ये होणार ? मग लोकांच्या नजरा परत परत तिच्याकडे वळणार, तिच्यावर खिळणार आणि मग लग्न होऊन ती सासरी जाणार? कसे असेल तिचे सासर, तिचा नवरा ? कशी राहील ही पोर नवऱ्याच्या घरी ?

तिच्या आईसारखी ? ह्या विचाराने तो चमकला आणि हादरला ! त्याच्या डोळ्यांसमोर तरुण रूपातली चांदणी उभी राहिली. खिडकीपाशी अंधारात नवऱ्याची वाट पाहणारी, मूकपणे अश्रू ढाळणारी, असह्य, एकाकी, मनात कुढणारी.

ह्या विचाराने त्याच्या पोटात तुटून आले, गलबलून आले. छे ! छे ! असे होता कामा नये ! असे मुलीचे होता कामा नये. ह्या विचाराने तो झपाटून गेला. ते खोलवर दुखवणारे विचार मनाआड करण्यासाठी तो झटून कामाला लागला.

चांगले दीड–दोन तास त्याने असे मन लावून काम केले. एक फाइल खाली मान घालून वाचण्यात गढला असताना दार उघडलेले त्याच्या लक्षात आलेच नाही. लक्षात आला तो एकदम आलेला सुगंधाचा लोळ. विजेच्या लोळासारखा !

त्याने चमकून वर पाहिले...मैत्रिण नं. १. त्याने बसायला सांगायची वाट न पाहता त्याच्या समोरच्या खुर्चीवर ऐसपैस बसत ती म्हणाली, 'काय बाई कामात गढणं हे ! मी दार उघडून आत आलेली पाहिलं सुद्धा नाही एका माणसानी !' काही न बोलता तो तिच्याकडे बघत राहिला. ही पुण्यातल्या एका नामांकित उद्योगपतीची बायको ! पावसाळ्यातले निसर्गसौंदर्य आणि मुंबईतल्या बेघर लोकांची पावसाळ्यात होणारी तारांबळ पाहण्यासाठी काहीही काम नसताना पुण्याहून मुंबईला येणारी, मुंबईच्या सगळ्यात महागड्या हॉटेलात रूम घेऊन त्याची वाट पाहणारी, 'काय बाई मुंबईची हवा तरी ! पावसाळ्यात हे असं उकडणं !'

असे म्हणत पदर काढून तिने गळ्यावरचा घाम रुमालाने टिपला. घाम नव्हताच, हे सारे कौतुक मोठ्या गळ्याचे नवीन ब्लाऊज त्याला दाखवण्यासाठी हे, त्याने ओळखले. एरव्हीचा असता तर ह्या भुलव्याने तो खुललाच असता; पण आता, 'आज मध्येच मुंबईला ?' कॉफीची आर्डर देण्याचं कटाक्षाने टाळत त्याने रुक्षपणे विचारले.

'आज साड्या खरेदी करण्याचा मूड आला ! पहानं कशा झाल्यात माझ्या साड्या.' अंगावरच्या साडीकडे हात केलेली व मांड्यांची सहेतुक हालचाल ! साडी अगदी छान होती तिला काहीसुद्धा झाले नव्हते.

'तुमची पसंती किती छान असते ! म्हणून आजच्या साड्यांची पसंती तुमच्या कडून ! चला न कलानिकेतनमध्ये नवीन स्टॉक आला आहे म्हणे.'

त्याला आठवले त्याने एकदा तिला 'तू साडी नेसल्यावर दिसतेस त्यापेक्षा साडी नेसतानाच जास्त सुंदर दिसतेस' हे नाटककार खाडिलकराचे वाक्य शालूच्या जागी साडी हा शब्द वापरून स्वतःचेच असल्यासारखे ऐकवले होते. तेव्हापासून ती त्याच्या रसिकपणावर बेहद्द खूष झाली होती.

'आज नाही जमणार पण मला ! किती काम पडलंय.' मघाच्याच रुक्षपणाने त्याने सांगितले. 'हे हो काय ? काम आहेच नेहमी ! आम्ही काय नेहमी नेहमी येतो तुमच्या मुंबईला !' गाल फुगवून खोट्या रुसव्याने म्हटलेले हे वाक्य...एरव्ही ह्या लाघवीपणाने तो केव्हाच खलास झाला असता !

खोलवर आतून जणु कुणी तरी त्याच्या मनात कुजबुजले हाच तो क्षण ! ज्या प्रहाराने ही आडवळणाची वाट कायमची बंद झाली असती, तो प्रहार देण्याचा क्षण ! 'मिस्टरांना जा ना कलानिकेतनमध्ये घेऊन.' क्षणभर तिचा कानावर विश्वास बसेना. कुणी तरी राख फासल्यासारखा तिचा चेहरा पांढरा झाला. दुसऱ्याच क्षणी 'ते तुम्ही नको सांगायला' असे सापाने फुत्कार टाकल्यासारखे म्हणून त्याच्याकडे न पाहता ती केबीनबाहेर ताड ताड पावलं टाकीत गेली. त्यांच्या खेळातला सगळ्यात मोठा पण अलिखीत नियम त्याने मोडला होता. एक सुस्कारा सोडून त्याने एकट्यासाठी सँडविच मागवली आणि ती खाऊन झाल्यावर जवळच्याच बिल्डिंगमधल्या एका दुसऱ्या सहकाऱ्याला भेटायला गेला. दीड–दोन तासानी परत आला तेव्हा त्याला खूप मोकळे वाटत होते. तो केबिनमध्ये आला आणि लगेच फोन वाजू लागला. रिसीव्हर हातात घेताच त्याच्या P. A. ने लाइन दिली आणि त्याने हॅलो म्हणताच त्याच्या कानावर आला एक नजाकतदार शेर–

'किस तरह भूलेगा दिल उनका खयाल आया हुआ, जाता नहीं कभी शीशेसे एकबार बल आया हुआ !' (एकदा का काचेला तडा गेला की तो कधी जात नाही.)


शुभेच्छा

**स्वर-सुधा साऊंड सर्व्हिस**

**आणि**

**प्रसाद वॉच कंपनी**

गांधी पुतळा, मेन रोड, इचलकरंजी

**श्री कन्स्ट्रक्शन**

प्रो. प्रा. निवृत्ती शिवराम सुतार

बिल्डिंग कॉंट्रॅक्टर,

९।६६८, शांतीनगर, इचलकरंजी

जिल्हा कोल्हापूर

पाठोपाठ अगदी मुलायम शब्द. 'हुजुर, *कहाँ थे आप ?' मैत्रिण नं. २. लखनौहून* मुंबईला पार्श्वगायिका होण्यासाठी आलेली उदयोन्मुख गायिका! त्याच्या एका हॉटेलच्या उद्घाटनाच्या वेळी ठेवलेल्या एका गझल कार्यक्रमात झालेली ओळख दोघानी चतुरपणे फुलवत ठेवलेली. काही काम निघाल्याने तिचा जलसा होऊन गेल्यावर तो हॉलमध्ये आला. मोजकेच निमंत्रित २००–२५० लोक होते, उच्चभ्रू! नवश्रीमंत! मूठभर लाह्या खिशातून बाहेर काढाव्या तशा पन्नासाच्या शंभराच्या नोटा खिशातून काढणारे आणि त्यांना आपल्या गजलांनी, नखऱ्यानी खुलवणारी ती नवी गायिका!

स्टेज सोडून बाकीचे दिवे मालवले होते. अंधारात तिच्याकडे बघत पहिल्या रांगेतल्या आपल्या राखीव खुर्चीकडे जाताना तो धडपडला, थोडीशी खसखस पिकली तशी आपल्या हनुवटीवर बोट ठेवून हसणाऱ्या लोकाना हलकेच दटावत ती लयीत म्हणाली,

'क्यू हंसते हो इनको ?'

कसूर उनका नही, उनकी जवानीका है।'

भल्या मैफलीत आपल्या जवानीचे झालेले कौतुक *त्याला सुखावून गेले. मग झाली* ओळख. तिचे ते मुलायम बोलणे, त्यात पेरलेले 'हुजूर' 'जनाब' 'मेरे सरकार' असे अजिजीचे, अदबीचे शब्द, केवळ नायकिणीलाच जमू शकेल असे वागण्यातले लाघवीपण. चतुरपणे लक्षात ठेवलेल्या त्याच्या आवडी-निवडी आणि तसे वागणे– बघता बघता तिच्या ओढणीत तो बांधला गेला. वर्तमानपत्रात तिच्या कार्यक्रमाची वर्णने येत. तेव्हा हळूहळू त्याच्या नियमित उपस्थितीचाही उल्लेख होऊ लागला. गोंजारल्यासारख्या आवाजात ही त्याला म्हणे, 'तुमच्याशिवाय माझी गाणी रंगत नाहीत. गजला फिक्या पडतात' असे म्हणून वर 'मोहे लागे सारा जग फिका फिका' असे जुन्या काळचे एक प्रसिद्ध गाणेही तिने त्याला म्हणून दाखवले होते.

तिच्या मैत्रीचा हा सारा चित्रपट त्याच्या मनात झटकन् तरळून गेला. आता ती त्याला फोनवर विचारत होती, 'माझ्या टी. व्ही. वरच्या कार्यक्रमाचं आज चित्रण आहे. तुम्ही याल ना? तुम्ही यायलाच हवं माझ्याबरोबर.'

इकडे त्याच्या मनाच्या टी. व्ही. वर दुसरीच फिल्म सुरू झाली होती. मघाशी दडपलेल्या प्रश्नांची फिल्म! मोठी झाल्यावर, सासरी गेल्यावर आपली लेक कशी असेल त्याची फिल्म! त्यात आधी दिसे बायको– त्याने फसवल्याच्या दुःखाने काळवंडून दोन–दोन दिवस उपाशी राहणारी, सुंदर असूनही उदासपणाने कशी तरीच राहणारी; अबोल दुःखाने खचलेली आणि तरीही धैर्याने मुलाकडे पूर्ण लक्षदेणारी– या साऱ्या चित्रात मध्येच त्याला बायकोच्या जागी चांदणी दिसू लागे आणि कुणी तरी चटके दिल्यासारखी त्याची अवस्था होई.

'हुजूर, कहाँ खो गये आप ?' फोनवरून येणाऱ्या आवाजाने तो भानावर आला.

'नही जमेगा।' त्याने आपल्या राकट हिंदीत उत्तर दिले आणि तिला पुढे बोलूच न देता तो म्हणाला, 'इसके बाद हमारा मिलना भी कभी नही होगा.'

'मेरा कसूर तो बताईये ? क्यों इतनी बडी सजा सरकार मुझे दे रहे है ?'

झाले तिचे लाघवी चेटूक सुरू.

'हा रस्ताच कधी ना कधी बंद होणार होता. तो अलगच करायला हवा. मला काहीच सांगायचं नाही. Wish you all the suscesc in your singing carreer. आता मी फक्त घरचा उरणार आहे.' एवढं बोलून त्याने रिसिव्हर खाली ठेवला. त्याच्या एकदम लक्षात आले, स्वतःच्याच केबीनमध्ये तो उध्यानेच फोनवर बोलत होता. खुर्चीत बसण्यासाठी तो पाठमोरा वळला आणि एकदम ती दृष्टीस पडली, त्याच्यामागेच ती उभी होती बहुतेक.

मैत्रिण नं. ३. मुबईतली प्रख्यात लेडी–डॉक्टर. परदेशी उच्च शिक्षण घेवून आलेली. भरपूर पैसा मिळवणारी, अत्यंत बुद्धिमान, रसिक. साहित्य, नाटक, संगीत–चित्रपट सगळ्यात रुची असलेली. उत्तमपैकी ब्रीज खेळाडू, स्मार्ट पण विधवा, अनेक पुरुष मित्र असूनही हळवेपणाने त्याच्यावर जीव जडवणारी. त्याच्या सगळ्या मैत्रिणी माहीत असलेली आणि तरी दर वेळी त्याच्यापासून दूर होताना, 'तू मला विधवा होण्याचाच अनुभव परत परत देत असतोस.' असे म्हणणारी.

आज तिचे डोळे वेगळेच दिसत होते. सगळे काही समजल्यासारखे. थोडक्यात पण रेखीव, बोलण्याची तिची सवय त्याला आवडे. 'ऐकलं मी सगळं. विशेषतः शेवटलं. तू मलाही तेच सांगणार. 'Play is over. Go home. Now we shall meet only for tea and sympathy.'

विलियम फॉकनरच्या एका प्रसिद्ध नाटकातल्या ओळी ती म्हणत होती; पण तिला अडवून तो म्हणाला, 'No, we shall not meet even for that.'

आता बोलण्यासारखे काहीच उरले नव्हते. त्याला क्षणभर वाटले, 'आतापर्यंतच्या मैत्रीच्या आठवणीखातर अजची संध्याकाळ एकत्र घालवू या!' असले काही आचरट ती म्हणते की काय! पण तसा तिचा स्वभाव नव्हता. Sensitive असूनही भावनांचा फापटपसारा तिला मान्य नसे. 'You are sensitive but not emotional.' असे एकदा तो तिला म्हणाला होता, त्याची त्याला आठवण झाली. तिलाही त्याचे ते विधान पटले होते आणि त्याच्या ह्या सूक्ष्म बुद्धीमुळेच तो तिला प्रिय झाला होता. 'इथवरच्या प्रवासाबद्दल many thanks.' असं म्हणून तिने निरोप घेण्याचे हस्तादोलन करण्यासाठी हात पुढे केला.

तिच्याशी न बोलता शेकहॅन्ड करून तो खुर्चीत बसला. ती न बोलता निघाली; पण दाराजवळ रेंगाळली आणि तिथूनच म्हणाली 'पण एक सांग, काय झालं एवढं एकदम घराकडे वळायला ?'

त्याला क्षणभर काय उत्तर द्यावे ते कळेना. चांदणीमधला बदल तिला सांगणं शक्यच नव्हतं. तिच्यासारख्या डॉक्टरी पेशातल्या स्त्रीला त्यात नवल काय वाटणार होतं? तो हलकेच म्हणाला,

'आपल्या समाजातला अगदी गरीबातला गरीब, अगदी निर्धन मजूरसुद्धा आपल्या बायकोला 'लक्ष्मी' म्हणतो नाही? लक्ष्मी म्हणजे नुसती पैशाची देवी नव्हे. Not only goddess of wealth. पण यश, गौरव, धर्माने मिळवलेला पैसा, मानसन्मान, प्रतिष्ठा या साऱ्यांची अधिष्ठात्री... माझी पोरगी चंद्राच्या कोरीसारखी रोज मोठी होतेय... एक दिवस ती आपल्या नवऱ्याच्या घरी जाईल... तिथे ती त्या घरची 'लक्ष्मी' म्हणून राहावयाला हवी असेल, तर मी तिच्या आईला... माझ्या बायकोला तिचे ते स्थान द्यायला नको का...?'

डॉक्टर मैत्रिणीने आपली मान किंचित हलवली. तो जे म्हणत होता, ते अगदी त्याच्या मनाच्या तळातून येत होते असे उघडच दिसत होते. तिथे आपण कधीच पोचलो नव्हतो, पोचणारही नाही, याची तिला टोकदार जाणीव झाली आणि न बोलता ती जायला निघाली आणि गेलीही.

ऑफिस सुटायला अजून अर्धा–पाऊण तास होता; पण त्याने आज लवकरच घरी जायचे ठरवले. हलकेच शीळ घालणार तोच आपण ऑफिसात आहोत ही त्याला जाणीव झाली. स्वतःशीच हसत तो आपल्यालाच म्हणाला, 'Play is over. Go home.' □

# गोष्ट विल्ये गावची, गोष्ट कोकण विकासाची !

लेे. प्रा. वैजनाथ कळसे

मित्रहो, प्रथम मी माझी थोडक्यात ओळख करून देतो. कारण मी तुम्हाला जी गोष्ट सांगणार आहे त्या गोष्टीशी माझा फार जवळचा संबंध आहे. ती गोष्ट आम्हीच निर्माण केली म्हणा ना ! म्हणून गोष्ट समजण्यापूर्वी माझी तुम्हाला ओळख होणेही गोष्टी-इतकेच आवश्यक आहे.

मी मराठवाड्यातील एका लहानशा खेड्यात म्हणजे दोनशे घराच्या वस्तीत जन्मलो. त्या खेड्याचं नाव आहे 'रावणकोळ.' रावणकोळ खेडं, ता. मुखेड, जिल्हा नांदेड.

मी जेव्हा लहान होतो ना, तेव्हा आमच्या लहानशा खेड्यात फक्त तिसरीपर्यंतच शाळा होती. म्हणजे तिसरी पास होताच मी आठ वर्षांचा असतानाच शिक्षणासाठी गाव सोडले. चौथी ते दहावी-पर्यंतच शिक्षण आमच्या मामाच्या गावी. म्हणजे आमच्या खेड्या-पेक्षा थोड मोठं असलेल्या वन्नर, ता. देगलूर या गावी झालं. त्यानंतर पुढचं कॉलेजचं शिक्षण देगलूर महाविद्यालयात झालं. देगलूर महा-विद्यालयाचे प्राचार्य श्री. हेमचंद्र धर्माधिकारीसाहेब होते. त्यांनी गोरगरिबाच्या मुलाना शिक्षण घेता यावे म्हणून 'कमवा, म्हणजे काम करा, कष्ट करा आणि शिक्षण घ्या' अशी योजना महाविद्या-लयात सुरू केली होती. जेवण अन् रहाणं फुकट मिळाल्यानं त्याच्या या योजनेमुळं गोरगरिबांची शेकडो मुलं बी. ए., एम. ए. होऊन आज मोठमोठ्या सरकारी पदावर आहेत. त्यातलाच मी एक आहे. आमचे प्राचार्य धर्माधिकारीसाहेब म्हणजे मराठवाड्याचे महात्मा फुले म्हणूनच आज ओळखले जात आहेत. तर त्याच्याच मार्गदर्श-नाने व मदतीने पुणे विद्यापीठातून एम. ए. झालो अन् आता रत्नागिरीच्या गोगटे-जोगळेकर महाविद्यालयात मी 'ग्रामीण विकास' हा विषय कॉलेजमधील विद्यार्थ्यांना शिकवण्याचं काम करतो आहे.

केवळ शिकवतच नाही, तर शिकवता शिकवता ग्रामीण विकासा-साठी प्रयत्नही करतो आहे. काम करण्यासाठी देखील वेळ उपलब्ध करून घेतो. या ग्रामीण विकासाच्या प्रयत्नातूनच विल्ये गावाची गोष्ट निर्माण झालेली आहे. ती तुम्हाला थोडक्यात पुढीलप्रमाणे सागतो आहे.

मित्रहो, तुम्हाला माहीतच आहे की, आपल्या भारतदेशात साडे-पाच लाख खेडी आहेत. त्या साडेपाच लाख खेड्यातलं विल्ये हे एक लहानसं म्हणजे ५०० लोकवस्तीच खेडं आहे. विल्ये हे गाव रत्ना-गिरी ते गणपतीपुळे या रस्त्यावर जाकादेवी स्थानकापासून चार मैल आत डोंगर-खोऱ्याच्या कपारीत वसलेले. हे खेडं तस दुर्लक्षित. मागासलेल्या पंचक्रोशीत वसलेले असे हे खेडे. विकासाचा कोण-त्याही प्रकारचा स्पर्श न झालेले. आतापर्यंत एकाही योजनेचे हात या गावाला पोहोचलेले नाहीत. धरणे, पाटबंधारे नाहीत. वैद्यकीय सोयी नाहीत की एखादे साधे किराणा-भुसाराचे दुकानही नाही. गावात कोणी आजारी पडले तर आजारी माणसाला डोलीत घालून एक दरी उतरत एक डोंगर चढत ४ मैलावरील डॉक्टरकडे घेऊन जावे लागते.

गावातल्या एकूण ५०० लोकवस्तीपैकी निम्मी म्हणजे सगळीच कर्ती माणसे मुबईत. काम करू शकणारी मंडळी गावात जेमतेम ७५ ते १००. तेही म्हातारे पुरुष आणि सारी बायका-मुलेच. सारा गाव मनिऑर्डरवर जगणारा ! पर्यायाने रेशनिंग दुकानाच्या धान्यावर जगणारा. जमीन एकूण १५०० एकर. त्यातील २० टक्के लागवडी-खाली. बाकी गवत, पडरान, पड किंवा पोटखरावा. सारी जंगले नष्ट झालेली. सर्व जमीन वैराण. जनावरेही जवळजवळ सारी भाकडच. चुकून एखादा कार्यक्षम तरुण गावात राहातो. तो खेडं सुधारण्याचे म्हणालाच तर सबंध गाव त्यास गाढवात काढते. एवढेच काय त्याला लग्नाला पोरगी मिळायची पंचाईत ! गेल्या तीन पिढ्यातील माणसे इथें राहून भिकेस लागली असा सर्वांचा दावा !

मित्रहो, हे चित्र कोकणातल्या १५५० खेड्यातच काय, महा-राष्ट्रातल्या हजारो आणि आपल्या देशातल्या लाखो खेड्याचेदेखील यापेक्षा वेगळे नाही.

कोकणातील ग्रामीण विकासासाठी धडपडणाऱ्या बोटावर मोजण्या-इतक्या ज्या सेवाभावी सस्था आहेत, त्यातली एक सेवाभावी संस्था म्हणजेच 'गोकुळ प्रकल्प प्रतिष्ठान' होय. ह्या प्रतिष्ठानचे अध्यक्ष आहेत श्री वसंतराव गंगावणे. हे आय. आय. टी. गोल्ड मेडॅलिस्ट असून अमेरिकेसारख्या समृद्ध देशात उच्च पदावर ते अधिकारी होते. स्वतःच्या सर्व सुखावर पाणी सोडून कोकण विकासा-साठी त्यानी स्वतःला वाहून घेतलेलं आहे. गोकुळ प्रकल्प-प्रतिष्ठान ही सस्था पिंगुळी, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग येथे आहे. या संस्थेचेच पिंगुळी येथे कोकणातील लोककलेचं मनोहारी असे कलासंग्रहालय आहे. या संस्थेचे कार्य केवळ सिंधुदुर्ग जिल्ह्यापुरतेच मर्यादित राहिलेले नाही, तर संपूर्ण कोकणात अनेकविध पद्धतीने ही सेवा-भावी सस्था काम करते आहे. पिंगुळी, ता. कुडाळ येथे भटक्या विमुक्त जाती-जमातीचे छोटेसे वसतिगृह ही संस्था चालवते. त्याच-प्रमाणे कुवे. ता. लाजा, जि. रत्नागिरी येथेही पहिल्या वर्गापासून ते आठव्या वर्गापर्यंतची, भटक्या विमुक्त जाती-जमातोसाठी आश्रम-शाळा ही संस्था चालवते. एवढेच नव्हे तर सिंधुदुर्ग जिल्ह्यात या सस्थेद्वारेच प्रौढ साक्षरतेचे तीस वर्ग ही संस्था चालवते आणि आता विल्ये गावात एक कोटीच्या आसपास 'पाणलोट आधारित जमिनी-चाच नव्हे तर गावाचा सर्वांगीण विकास' साधणाऱ्या कार्यक्रमाची घोडदौड या गोकुळ प्रकल्प प्रतिष्ठानद्वारेच सुरू आहे. श्री. वसंतराव गंगावणेबरोबरच सावलीप्रमाणे असणारे बाळकृष्ण देसाई, शाम चौगुले, माजी आमदार व भूविकास बँक रत्नागिरीचे माजी संचालक श्री. शिवाजीराव सावंत आणि माझ्यासारखी बरीच मडळी एकत्र येऊन या विल्याच्या ग्रामीण विकासाला गती मिळाली.

ग्रामीण विकासाबाबत आम्ही मंडळींनी अनेक खेड्यातून त्या

ग्रामस्थाच्या वारंवार सभा घेतल्या. त्या सभेत त्यांचे झालेले वाद–विवाद. ग्रामस्थानी मांडलेल्या समस्या, गावविकासाबद्दलच्या ग्रामस्थाच्याच कल्पना, या सर्व अनुभवांच्या मंथनातून एवढं मात्र लक्षात आलं की, हे ग्रामीण विकासाचं काम वाटतं एवढं सोपं नाही. कोणाही येरा गबाळ्याला करता येण्यासारखं निश्चितच नाही. तसं सोपं असतं तर आपल्या या खेडे–जीवनात एवढी अवकळा आलीच नसती. ग्रामीण विकास होण्यासाठी, खेड्यांच्या समस्या सोडविण्यासाठी या देशातील सामान्य माणसालाच नव्हे तर विद्वानाना देखील वेडं होऊन निष्ठेने काम करण्याशिवाय आज तरी पर्याय नाही. म्हणून आमचे वसंतराव गंगावणेंना परदेशातल्या मोठ्या नोकरीवर पाणी सोडून खेड्यापाड्यात दिवस-दिवस पोटाला चिमटा काढत फिरायची वेळ आलेली आहे आणि ते फिरत असतातच. अधून–मधून आम्हा कार्यकर्त्यांचीही साथ असतेच.

आपलं आरोग्य जेव्हा बिघडत तेव्हा आपण डॉक्टरकडे जात असतो. काही काही वेळा आरोग्य बिघडण्याअगोदरदेखील शरीर तपासण्यासाठी आपण डॉक्टरकडे जात असतो. डॉक्टर प्रथम स्टेथॉस्कोप लावून हृदयाचे ठोके तपासतात. रक्तदाब तपासतात. तोंड उघडून जीभ बाहेर काढावयास सांगतात. डोळे तपासतात. आवश्यक वाटल्यास रक्त, लघवी, थुंकी तपासतात, वजनही करून घेतात. हे सर्व काही तपासल्याशिवाय डॉक्टराना तुम्हाला कोणता रोग झालेला आहे हे कळणार कसे ? त्याशिवाय उपचार तरी डॉक्टर कसे करणार ? म्हणजे डॉक्टरमंडळी प्रथम वस्तुस्थिती काय आहे हे पहातात. म्हणजे अभ्यासाशिवाय ते ट्रीटमेंट देऊच शकत नाहीत.

ग्रामीण विकासाचं देखील यापेक्षा वेगळं असं काहीच नाही. खेड्याच्या समृद्धीला, विकासाला सुरुवात करण्यापूर्वी खेड्याचा अभ्यास होणे आवश्यक आहे. खेड्याची सद्य:स्थिती काय आहे ते पहावे लागते, समजून घ्यावे लागते. मगच समृद्धी कोठे आणि कशी करता येईल याचा आराखडा तयार करता येईल. जसं सगळ्याच माणसांना सारखेच रोग होत नसतात तसच कोणत्याही भागाचा वा खेड्याचा एकाच पद्धतीने वा मार्गाने विकास होत नाही. हा, एखाद्या गावात एखाद्या विशिष्ट रोगाची साथ असेल तर मात्र त्या गावातील माणसाना एकच रोग होऊ शकतो. अशा साथीप्रमाणे अनेक खेड्याना एकच समस्या सारखी भेडसावू शकेलही; परंतु


शुभेच्छा

**श्री समर्थ वॉच कंपनी**

मेनरोड, इचलकरंजी ४१६ ११५

जिल्हा कोल्हापूर ( महाराष्ट्र )

आणि

**श्री मुद्रणालय**

इचलकरंजी


तत्पूर्वी त्या खेड्यांचा सर्वांगीण अभ्यास होणे आवश्यक आहे.

या आमच्या कार्यक्रमाला गती आली ती रत्नागिरीच्या भू-विकास बँकेचे माजी संचालक व माजी आमदार श्री. शिवाजीराव सावंतांच्यामुळे. आमच्या भटकण्यात सामील होऊन, आमच्याबरोबर तेही रात्री–अपरात्री बँकेची जीपगाडी जिथपर्यंत जाईल तिथपर्यंत गाडीत बसून ग्रामीण विकासावर, खेड्यातील ग्रामस्थाशी गप्पा; पुढे गाडीला रस्ता नसेल तर पायीच अंधारात दिसणाऱ्या पायवाटेने तीन–तीन मैल ठेचाळत, तरीही ग्रामीण समस्यांचं चर्चासत्र पुढे चालूच ठेवीत ! ग्रामस्थांच्या रात्रीच्या बैठकीनंतर त्याच अंधारी वाटेन ठेचाळत... ठेचाळत परत रत्नागिरीस...!

या अनेक खेड्यांतील ग्रामस्थाच्या बैठकातून बोटावर मोजण्याइतकेच लोक असे आढळले की, त्यांची अक्षरांशी केवळ तोंडओळख असण्यापुरत शिक्षण झालेलं आहे; परंतु गावच्या समस्यांचा डोळसपणे अभ्यास, गावच्या प्रश्नाची जाण आणि त्या सोडवणे किती आवश्यक आहे हे पोटतिडकीने मांडणारे काही ग्रामीण जाणकार भेटले. त्यापैकी विल्यातील ८० वर्षे गाठलेले विष्णुअण्णा, साठी ओलांडलेले महादेव देसाई, पंचावन्नी ओलांडलेले जगन्नाथराव देसाई, डोळ्यांच्या पापण्या पांढरे झालेले श्री. किसनराव कावळे ही ती मंडळी होत.

८० वर्षे गाठलेले अण्णा म्हणतात, 'मी लहान असताना साजपार व्हताच, घरच्या उंबरठ्याबाहेर माणूस निघायची हिम्मत न्हवती. दाट भिल्ल झाडी–झुडपातून वाघाच्या डरकाळ्या आयकून हामी पोरं मदल्या घरात जाऊन बापाम्हाग लपून बसायचो. परीक आता हे उघडं–बोडकं झालेल माळ हामाला बगवत न्हाय. सगळा ह्यो डोंगर हिरव्या गर्द झाडा–झुडपानी कव्वा डुलल मनून डोळे आसुसलेले हाईत !'

श्री. शाम चौगुले हे शेतकीशास्त्रात पदव्युत्तर शिक्षण घेतलेले तरुण ! श्री. अरबाड हे देखील शेतकीशास्त्रात पदवीधर असून ते विविध कार्यक्रम-निमित्ताने भारतभर फिरलेले. त्या दोघांनाही महिना दोन हजार रुपये पंख्याखाली बसून व सरकारी गाडीत फिरून सहज मिळवता आले असते; परतु त्याचं डोकं तिकडं न चालता कोकणातल्या खेड्यापाड्यात फिरून कंपोस्ट खतापासून ते इथं गव्हा–हरभऱ्यांचे, इतर भाजीपाल्याचे पीक घेणं कसं शक्य आहे, त्याचं ते तंत्र ग्रामस्थाना पोटतिडकीनं समजावून देतात. एवढंच नव्हे तर कोकणात उन्हाळी भुईमूग कसा घेता येतो याचं प्रात्यक्षिकच विल्ये गावच्या पंचक्रोशीत त्यांनी दाखवून दिलेलं आहे.

आर्थिक कार्यक्रम आखत असतानाच सामाजिक परिवर्तनासाठीदेखील कार्यक्रम आखावे लागले. या ५०० वस्तीच्या गावात दहा–बारा घरे असलेली बौद्धवाडी. तीन–चारच घरे असलेली गुरववाडी. दहा–पंधरा कुणब्यांची घरे असलेली सितपवाडी तर दोन–तीनच घरं असलेली चाभारवाडीही आहे या प्रत्येक वाडीचा एक–एक नेतादेखील आहे. कोणत्याही कामाची सुरुवात करायची म्हणजे ही सर्व नेतेमंडळी एकत्र आल्याशिवाय कार्याला गतीच येत नाही. हे विल्ये गावातले श्री. सितपगुरुजी, श्री. जगन्नाथराव देसाई आणि ८० वर्षांचे विष्णुअण्णा याना गावात काही तरी चांगले घडावे, गावातली अवकळा संपावी, मुबईस गेलेली कर्ती माणसे परत विल्यात यावीत,

आपल्या पडत चाललेल्या घरांची डागडुजी करून गुण्यागोविंदाने नांदावीत ही त्याची मनोमन इच्छा !

कोकणातल्या खेड्यातील कोणत्याही पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या तरुणास कोकणविकास, पर्यायाने खेड्याचा विकास कसा होईल हे सागता येणार नाही; परतु विल्ये, नारसिंगे, माजरा, पोचरी येथील काही बोटावर मोजण्याइतके जे शहाणे आहेत; परंतु त्यांना अक्षर-ओळखीपलीकडं शिक्षणातल काहीच माहीत नाही, अशा माणसानी आपल्या मोडक्या-तोडक्या ग्रामीण भाषेत ग्रामीण विकासाचे अनेक ठोस कार्यक्रम त्यांनी स्वत.च आमच्यासमोर माडले.

ग्रामीण विकासाच्या संदर्भात श्री शिवाजीराव सावत आग्रहान व वारवार जे मत माडतात ते म्हणजे ज्याप्रमाणे अंड्यातलं पिलु आतून चोच मारून वर येण्याचा प्रयत्न करतं, तसंच या ग्रामीण समाजाच्या विकासाबाबत आहे, हा निष्कर्ष त्यानी आजपर्यंत जे काही सामाजिक आणि राजकीय कार्यकर्ता म्हणून केलेले काम आहे, त्याचाच तो अर्थ आहे. कारण आजपर्यंत सरकारने जे अनेक कायदे केले, शेतीव्यवसायाला कर्ज उपलब्ध व्हाव म्हणून संबधित भूविकास बँकासारख्या बँका काढल्या; परतु हे एवढे सारे करूनही स्वातंत्र्या-पूर्वी आपली ग्रामीण जनता ज्या पातळीवर जीवन जगत होती. त्याच्याही खाली गेलेली दिसते. लोकाची कल्पना अशी झालेली आहे की, सरकारच आमचा विकास करणार आहे. सरकारनेदेखील विकासासाठी सरकारी पातळीवरून शॉर्टकटने विकास घडवून आण-ण्याचा प्रयत्न केला; परतु आपल्या खेड्यातील जीवनात फरक असा काही पडलाच नाही. आज गरज याचीच आहे की, ग्रामीण जनतेने एकत्र येऊन आपल्या विकासासाठी स्वत:च योजना आखल्या पाहिजेत. ग्रामीण विकासाच्या बाबतीत सरकार–दप्तरी अनेक योजना धूळ खात पडलेल्या आहेत. त्या योजनांचा कोणीही उपयोग करून घेत नाही.

विकास ही प्रक्रिया दीर्घकाळ चालणारी आहे. तिचे स्वरूप साखळीसारखे आहे. एकातून दुसरी, दुसरीतून तिसरी विकास–प्रक्रिया चालूच असते. ती कधीच न सपणारी साखळी आहे. तिला शॉर्टकट असूच शकत नाही. या विकासप्रक्रियेत जितक्या जास्तीत जास्त सख्येने लोक सहभागी होतील तितकी त्या प्रक्रियेची व्याप्ती आणि यशस्वितेची शक्यता वाढणारी असते. आमच्यासारखे धडपड-णारे कार्यकर्ते फक्त मार्गदर्शनच करू शकतात. यासाठी ग्रामीण जनतेनेच पुढाकार घेऊन आपल्या गावची साधनसपत्ती काय, किती व कोणत्या प्रमाणात, हे पहावे लागते. आपल्या गरजा काय आहेत हेदेखील ठरवावे लागते कारण खेड्यातील ग्रामस्थांच्या गरजा त्याच्या त्याना जितक्या चांगल्या समजू शकतात, तितक्या त्या बाहे-रून आलेल्या राजकीय पुढाऱ्याला वा सरकारी अधिकाऱ्याला समज-णार नाहीत. जेव्हा जेव्हा जनतेने स्वप्रयत्नाने व स्वखर्चाने स्थानिक नेतृत्वाखाली आपल्या समस्या सोडविण्याचे प्रयत्न केले तेव्हा-तेव्हाच विकास वा ही प्रगती शाश्वत स्वरूपाचे वरदान ठरलेली आहे.

ग्रामीण विकासात उच्च राहणीमान साध्य करण्यासाठी लोक-शाही तंत्राशी सुसगत असे स्वप्रयत्न, स्वयंनिर्णय, स्वयंप्रेरणा, स्थानिक नेतृत्व, सहकार इ. बाबीच आवश्यक आहेत.

आपला ग्रामीण समाज हा जातिव्यवस्थेवर आधारित आहे. त्यामुळे ग्रामीण विकासाला उत्तेजित वा प्रेरित करणे अवघड जाते. म्हणून ग्रामीण जीवनातल्या दारिद्र्याचे निर्मूलन करावयाचे तर त्या समाजाच्या आर्थिक व सामाजिक रचनेत मूलभूत बदल करणे अपरि-हार्य आहे.

## मुंबईकरांच्या विकास–कल्पना

आजचा कोकणातील सुशिक्षित ग्रामीण तरुण शहरात प्रामुख्याने मुबईत नोकरीनिमित्त रहातो वा काम–धंद्यानिमित्त मुबईस रहातो. त्या सर्वांच्या आपल्या खेडेगावच्या विकासाबाबतची कल्पना पुढील-प्रमाणे असल्याचे दिसते.

ही सारी तरुण अन् सुशिक्षित मडळी शहरात एकत्र येतात. गावात काय झाले पाहिजे याचा मुबईच्या चष्म्यातून वर्षानुवर्षे विचार करतात

गावाला रस्ता म्हणजे मुबईकराना डायरेक्ट एस. टी. प्रवासाची सोय. घरून आव्या-फणसाची गाठोडी बाधून मुबईस येण्यासाठी किंवा मुबईहून पोर–बाळ विनासायास गावी उतरण्यासाठी एस. टी. मार्गाशिवाय पर्याय नाही म्हणून ही तरुण मंडळी गावाला रस्ते झालेच पाहिजेत असा आग्रह धरतात गावातली शाळा म्हणजे गावी ठेवलेल्या मुलीबाळीची शिक्षणाची सोय. म्हणून तर ग्रामोद्धार-मडळातर्फे मुबईत निधी गोळा करून आपल्या गावी शाळा बाधतात. गावातले जीर्णोद्धाराचे काम म्हणजे उत्सवाच्या निमित्ताने एकत्र येण्याचे साधन. खेडेगावचा, पर्यायाने कोकणच्या विकासाच्या या शहरी मंडळीच्या कल्पना याच गोष्टीभोवती घुटमळतात. त्यातून चवीच्या पालटासाठी कधी विद्युतीकरण तर कधी गावातल्या पिण्याचे पाणी, असाच एखादा विषय. यापलीकडे खेडेगावच्या विकासाची शहरी कल्पना फारशी झेप घेऊ शकली नाही.

ग्रामीण विकास घडवून आणायचा असेल तर खालील गोष्टीची पूर्तता त्वरित होणे आवश्यक आहे. पडिक जमीन लागवडीखाली आणणे, शेतीला पाणीपुरवठा, ग्रामीण विद्युतीकरण, खतांचा पुर-वठा, सुधारित शेतीचा प्रचार व वापर, जनावराचे आरोग्यकेंद्र, सुधारित बी-बियाणांचा पुरवठा, शेतकी विपणन, वनसंवर्धन व संर-क्षण, दळणवळणाची सोय, शिक्षणाची सोय, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय, वैद्यकीय मदत, मनोरंजनाची व्यवस्था, कुटीरोद्यो-गांची वाढ इ. इ.


**मे. के. पी. पाटील**

होलसेल गूळ, नारळ, पोहे

व

साखरेचे व्यापारी

मेनरोड, गांधी कँप ९१४९

इचलकरंजी

*मित्रहो, वरील सर्वच्या सर्व गोष्टी ग्रामीण जीवनात प्रत्यक्ष* उतरत नाहीत तोपर्यंत खेड्याचा विकास होणे शक्य नाही किंवा वरील एक–एक सुटी क्रिया वा गोष्ट त्या खेड्यात उपलब्ध करून दिल्यासही विकास होणार नाही. तर वरील सर्वच्या सर्व बाबी एखाद्या खेड्यात *व्यावयाच्या असतील तर ग्रामीण पातळीवर वा* खेड्यात असे सामाजिक व आर्थिक कार्यक्रम सुरू झाले पाहिजेत की, ज्यात वरील सर्व बाबींनी त्या प्रकल्पात मूर्तरूप धारण केलेले असेल.

विकासाची प्रक्रिया ही आपोआपच निर्माण होत नाही. जाणीवपूर्वक, सूत्रबद्ध पद्धतीने एखाद्या प्रकल्पाची आखणी करून व प्रकल्पाचे नियोजन करूनच ते शक्य आहे आणि ही योजना त्या एखाद्या खेड्यावर लादण्याऐवजी त्या प्रकल्पाची उभारणी लोकाच्याच सहकार्यावर होणे आवश्यक आहे. आखलेली योजना आपली आहे, आपलं कल्याण करणारी आहे, हे तेथील खेड्यातील लोकांना वाटणार नाही तोपर्यंत त्या प्रकल्पाला वा योजनेला यश मिळणे शक्य नाही. सरकारी अधिकारी वा आमच्यासारखे सामाजिक कार्यकर्ते केवळ मार्गदर्शनापलीकडे काहीच करू शकत नाहीत, ही वास्तवता नाकारता येणारच नाही !

## विकासाचा केंद्रबिंदू–माणूस

मु. विल्ये, ता. जि. रत्नागिरी येथे ६ सप्टेंबर १९८१ ला तेथील गावकऱ्यांची आणि कार्यकर्त्यांची एक सभा झाली. या सभेत भूविकास बँक रत्नागिरीच्या सहकार्याने एकत्रित आबाकलम लागवड करण्याचे निश्चित झाले. *त्या वेळी महाराष्ट्र शासनाचा असा जी. आर.* होता की, सर्व शेतकऱ्याना ५० टक्के सबसिडी मिळेल. त्या प्रकल्पाचे उद्घाटन १६ सप्टेंबर १९८१ ला त्या वेळचे रत्नागिरीचे कलेक्टर श्री. अजित वर्टी यांच्या हस्ते झाले. या दरम्यान म्हणजे ८ सप्टेंबर १९८१ ला पाणलोटासंबंधी जी. आर. निघाला.

या जी. आर. ची शेतकऱ्यांना वा कार्यकर्त्यांना कसलीच कल्पना नव्हती. १६ सप्टेंबरच्या सभेत कलेक्टर श्री. अजित वर्टींनी विल्ये या गावाचे क्षेत्र पाणलोटक्षेत्राच्या योजनेखाली घेता येईल असे सूचित केले. कलेक्टर श्री. अजित वर्टींशिवाय इतर कोणालाही या पाणलोटाची कल्पना नव्हती. भू–विकास बँकेची प्रकरणे पूर्ण होईपर्यंत महाराष्ट्र शासनाचा जी. आर. बदलला. नवीन जी. आर.प्रमाणे शेतकऱ्यांनी लागवड केलेल्या कलमक्षेत्रापैकी फक्त ५ एकर जमिनीलाच ५० टक्के सबसिडी लागू होती. बाकी जमिनीच्या क्षेत्राला कर्जदेखील भू–विकास बँकेकडून मिळणार नव्हते. म्हणून विल्ये *गावच्या एकत्रित आबाकलम–लागवडीला यामुळे सुरुंगच लागला.* त्यामुळे विल्ये गावच्या शेतकऱ्यांना व कार्यकर्त्यांना पर्याय शोधणे भाग पडले. पाणलोटचा जी. आर. कलेक्टरकडून समजल्याने त्याचा पाठपुरावा आम्हा कार्यकर्त्यांना व शेतकऱ्यांना करण्याशिवाय गत्यंतरच उरले नाही.

माणूस हा विकासाचा केंद्रबिंदू धरून त्याचा गावउभारणीत सहभाग, त्याची जमीन. त्याचेच श्रम व कौशल्य याचा वापर यावर विचार होऊन, शासनाच्या ज्या काही गावविकासाच्या योजना आहेत त्या सर्व विल्ये गावासाठी राबविण्याचे आम्ही सर्व मंडळींनी ठरविले. गेली अडीच–तीन वर्षे पूर्व तयारी म्हणून लोकशिक्षण करीत असताना श्री. शिवाजीराव सावंत आणि श्री. वसंत गंगावणे कृत्याची कोकण कृषि विद्यापीठ, जिल्हा परिषद, मृद्संधारण व इतर शासकीय खात्यांशी संबंध राखून होते. याच कालावधीत एक शासकीय ठराव 'पाणलोट आधारित सर्वंकष योजना' म्हणून जाहीर झाला होता. तसा प्रकल्प विल्ये गावचा व्हावा. म्हणून आम्ही पाठपुरावा केला. कारण ती गावच्या सर्वंकष शेतीसुधारणेचीच योजना आहे.

## पाणलोटाचे सूत्र

*'पाणलोट म्हणजे ज्या क्षेत्रात* पावसाचे पडणारे पाणी जमा होऊन एकत्र येते व त्याचा नाला, ओहळ, नदी बनते ते क्षेत्र.' या पाणलोटासंबंधीचा पूर्ण अभ्यास करण्यात आला. अभ्यासाअंती कोकण विकासाचे हे एक मूलभूत साधन असल्याचे प्रकर्षाने जाणवले. पाणलोट या शब्दाला सन १९०७ पासूनचा इतिहास आहे. 'माती नि पाणी वाचवले तर आपण वाचू' हा त्यात मूलतः विचार आहे व त्यातूनच सन १९४२ साली मुंबई जमीन सुधारणा कायदा व त्यातील जमीन सुधारणा तरतुदी व सन १९७७ चा महाराष्ट्र रोजगार-हमी योजना कायदा, ८ सप्टेंबर १९८१ व २० जुलै १९८१ चा कायदा याचा समन्वय साधून लाखो बेरोजगाराना काम मिळण्याजोगी परिस्थिती निर्माण करण्यात आली व लाखो एकर पडीक जमीन लागवडीखाली आणणे शक्य झाले. एवढेच नव्हे तर प्रत्येक कुटुंबाला दर डोई अर्धा एकर क्षेत्राला पाणी देण्याची योजना आखल्यामुळे शेतजमीनसुधारणा करण्यासाठी योग्य ती वातावरणनिर्मिती होऊन, शेतकऱ्याला हवी ती सुधारणा मिळून लागवड करण्याची त्याला मुभाही देण्यात आली.

या योजनेचे कागदपत्र तयार करताना रत्नागिरी जिल्ह्याचे रोजगार हमीवरील उपजिल्हाधिकारी श्री. तोडणकरसाहेब यानी अविश्रांत श्रम गेली अडीच वर्षे घेतले. ग्रामस्थांचे मौलिक सहकार्य, *आम्हा सर्वांचा सतत पाठपुरावा, त्यामुळे झालेली शासकीय अधि*काऱ्यांची मदत यातूनच या गावची एक कोटी रुपयांच्या आसपासची योजना पूर्ण होऊन प्रत्यक्ष कामालाही सुरुवात झाली आहे. या योजनेत पुढील स्वरूपाची कामे आहेत. नवीन आबा–कलम–लागवड,


**प्रगती क्लॉथ स्टोअर्स**

नारायण पेठ, इचलकरंजी

सर्व प्रकारचे फॅन्सी कापड मिळणेचे ठिकाण

नवीन काजू-लागवड, नवीन मजगी घालणे, नवीन वर्गीकरण. पाझर तलाव (कोकणटाइप बंधारा) नालाट्रेनिंग. नवीन विहिरी, जुन्या विहिरींची दुरुस्ती, वैरणविकास इ. इ.

अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही जी सार्वजनिक स्वरूपाची वा खाजगी स्वरूपाची कामे आहेत त्या सर्व कामांचा खर्च शासनच करते. म्हणजेच १०० टक्के शासकीय खर्चानेच शेतकऱ्यांचे कल्याण करणारी ही योजना आहे.

उत्पादककार्यासाठी संरक्षित गुंतवणूक करण्याचा शासनाचा निर्धार आहे. मृद्संधारण, पाण्याचा साठा या बाबीवर खाजगी व सार्वजनिक क्षेत्रात करावयाच्या या सुधारणा संपूर्ण शासकीय खर्चाने रोजगार हमीखाली करावयाच्या आहेत. त्या सुधारणा संपूर्ण पाणलोटक्षेत्राचा प्रकल्प–आराखडा तयार करून त्यात करावयाच्या कामाचे पूर्वनियोजित वेळापत्रक आखून, त्या त्या भागाला काम करणाऱ्या सेवाभावी संस्थांच्या वतीने, लोकांच्या सहभागाने पार पाडावयाच्या आहेत. हे झाले पाणलोटाचे सूत्र.

## गावाची संमती

पाणलोट–प्रकल्पाची पहिली पायरी म्हणजे गावाची संमती. गावातील एकूण शेतकऱ्यांपैकी कमीत कमी ६५% शेतकऱ्यांनी लेखी संमतीपत्रक देणे आवश्यक किंवा गावच्या एकूण जमिनीच्या ६५% जमीनमालकांची समती मिळवणे आवश्यक असते. या कार्यक्रमासाठी आम्ही कार्यकर्त्यांनी विल्ये गावातील शेतकऱ्यांची संमती मिळवली. त्यानंतर शासनाने प्रकल्प–आराखडा तयार करावयाचा. हा आराखडा तयार करताना त्या त्या विभागाशी वा शासकीय संबंधित खात्याचे अधिकारी पाणलोट क्षेत्रावर प्रत्यक्ष जाऊन आखणी करणे क्रमप्राप्त होते. या सबंध कामाचे सूत्रीकरण मृद्संधारणखात्याकडे असते.

गेल्या दोन–अडीच वर्षात विल्ये गावची कागदपत्रे तयार करण्यासाठी, गावच्या तलाठ्यापासून ते तहशीलदार कार्यालयातील अधिकाऱ्यापर्यंत सर्व लोक ठाण माडून बसलेले आहेत. एवढेच नव्हे तर वारंवार जंगलखाते, फळबागायतखाते, भूजल सर्वेक्षण विभागाचे, दुग्धव्यवसायाचे अधिकारी, रोजगार हमी योजनेचे अधिकारी इत्यादी नाना अधिकाऱ्यांना आपल्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांसकट विल्ये गावी मुक्काम करावे लागले.

साहजिकच आलेल्या एवढ्या अधिकारीवर्गाची आणि कर्मचारीवर्गाची, गावातील लोकांना चहा–जेवणाची सोय करावी लागे. हे असे काम गेले दोन वर्षे तेथील शेतकरी वर्गणी गोळा करून आलेल्या अधिकाऱ्याची सोय करतात. गेल्या दोन वर्षांत असा एकही आठवडा विल्ये गावात गेला नाही की, बाहेरून आलेली १०० तरी माणसे जेवली नाहीत! हे अव्याहतपणे चालूच आहे. त्यात अनेक स्त्रियांनी अपरंपार कष्ट घेतले. त्यातल्या त्यात श्री. जगन्नाथराव देसाई यांच्या पत्नीचे श्रम आणि बाळकृष्ण देसाई यांच्या कुटुंबियातील स्त्रियांनी जे श्रम घेतले त्याला खरोखरच तोड नाही! नाही तर आम्हा सरकारी नोकरी करणाऱ्यांच्या स्त्रिया एखादा पाहुणा चहासाठी जरी घरी आला तर त्यांच्या कपाळाला दहा आठ्या पडणार!

## पाणलोट–प्रकल्पाचे नियोजन तसे सोपेच!

या प्रकल्पाचे प्रत्यक्ष नियोजन हे तसे सोपेच आहे. एक म्हणजे वरून पडून वाहून जाणाऱ्या पावसाच्या पाण्याचा साठा व वापरासाठी पाझर तलाव व त्यासाठी पाहणी. दुसरे म्हणजे जमिनीचा वापर व मृद्संधारण. जमिनी डोंगराळ व उतार असल्याने झाडांची लागवड करणे.

## कोकणासाठी वरदान

विल्ये प्रकल्प हा 'पाणलोट आधारित जमिनीचाच नव्हे तर संपूर्ण गावाचाच, सर्वांगीण विकास' करण्याबाबतचा आहे. कोकणातला तरी हा पहिलाच नमुना प्रकल्प आहे. विल्ये हे काही कोकणातले वेगळे असे खेडे नाही. त्यामुळे कोकणातील कोणत्याही गावात थोड्याफार फरकाने पाणलोट–प्रकल्पाची आखणी करणे सहज शक्य आहे, हे तेथे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना जाणवले. त्यातल्या त्यात मोठा अडथळा म्हणजे लोकांचा सहभाग मिळणे. कार्यकर्त्यांच्या प्रयत्नानी मोठ्या प्रमाणात इतर आसपासच्या गावांनासुद्धा या प्रकल्पाचा प्रचंड फायदा पटवून देता आला. आज २५ हून अधिक गावांनी या प्रकल्पाची मागणी कलेक्टरकडे केलेली आहे.

कोकणात भांडवली गुंतवणुकीस वाव नाही हा समज. शेतीत तर नाहीच नाही. म्हणून कारखानदारीकडे वळायचे. तिथं अपयश आलं की सगळाच विकास ठप्प!

पाणलोट-प्रकल्पानं दाखवून दिलं की, कोकणात मोठ्या प्रमाणात व तेही शेतीक्षेत्रात भांडवलगुंतवणूक होऊ शकते.

आज विल्ये गावात ग्राम-रचना केंद्राची स्थापना होऊन गावातले २५ कार्यकर्ते श्री. जगन्नाथराव देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत आहेत. यातून विकासाची पुढील त्रिसूत्री पक्की वरण्यात आली–(१) गावातील संपूर्ण जमीन लागवडीखाली आणणे. (२) जास्तीत जास्त कामे स्वतः, वैयक्तिक, सामुदायिक करणे. (३) शासनाच्या सर्व योजना समजावून घेऊन स्थानिक उपयुक्ततेनुसार त्याची अमलबजावणी करणे.

## गेल्या दोन वर्षांतील उभारणी

विल्ये गावात प्रथम जनजागृतीचे काम हाती घेतले गेले. १९ मे १९८२ ला ही जागृती एका छोटयाशा 'श्रमसंस्कारशिबिरा'-तून झाली. हे शिबिर विल्ये गावी १९ मे १९८३ ते २९ मे १९८३ असे दहा दिवस चालले. या शिबिरात विल्ये पंचक्रोशीतले पंचावन्न तरुण सामील झाले होते. हे सर्व शिबिरार्थी वेगवेगळ्या जातीधर्मांचे होते. शिबिरात सर्वांच्या जेवणा–रहाण्याची एकत्रच सोय होती. दररोज विविध विषयांवर बाहेरील पाहुण्यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. खेळ, मनोरंजन इत्यादींमधून सर्व ग्रामस्थ, तरुण एकत्र आले. दहा दिवसाच्या कालावधीत शाळेला मोठे मैदान श्रमदानातून उभे राहिले. (अंदाजे किंमत ३ ते ४ हजार रुपये सहज होऊ शकेल.) खाजगी क्षेत्रात १'×१' ५ हजार खड्डे वृक्ष–लागवडीसाठी श्रमदानातून पाडण्यात आले. पावसाळ्यात जंगलखात्यातून सुबाभुळची रोपे मिळताच त्या खड्ड्यात ती रोपे

लावण्यात आली. आज विल्यात प्रवेश करताच सुवाभुळीची झाडें आकाशाला भिडण्याची स्पर्धा करताना दिसतात. गावात जायला जिथे पाऊलवाट नव्हती तिथे बस जाण्यासारखी सडक झालेली आहे. रॉकेल आणण्यासाठी चार मैलाचा डोंगर तुडवून जाकादेवीला जाव लागायचं. आज वीज आली आहे. बारमाही खळखळ वाहणारे दऱ्याखोऱ्यातले झरे; परंतु एखादा हुडा बुडवून पाणी आणावं म्हटलं तर तशी सोय नव्हती; पण आज एक छोटेसे धरण बाधून तयार झाले. दोन पाझरतलावांची पूर्वतयारी झालेली आहे. ह्या १९८३ च्या एका वर्षात या लहानशा गावात १० हजार कलमाची लागवड झालेली आहे. हा कोकणातला आजवरचा उच्चांक आहे ! प्रकल्पाची पुढील कार्यवाहीदेखील यथावकाश होत आहेच.

### अशी जगवली कलमे

या प्रकल्पाच्या कागदपत्र–तयारीला दोन वर्षांचा कालावधी लागला. लोकांचा उत्साह वाढवण्यासाठी, टिकवण्यासाठी आर्थिक म्हणजेच पैशाची कामे सुरू होणे आवश्यक होते. भाषणे किंवा व्याख्याने असा दीर्घ उत्साह टिकवून ठेवू शकत नाहीत, याची जाणीव आम्हाला होती. विल्ये गावातील तरुणाचे हात कामासाठी आसुसलेले होते. मग आम्ही कार्यकर्त्यांनी भू–विकास बँकेचे सचालक श्री. शिवाजीराव सावत याचे मार्गदर्शन व सहकार्य घेतले. गेल्या वर्षी म्हणजे ८३ सालात भू–विकास बँकेच्या सहकार्याने दीड हजाराच्या वर शेतकऱ्यांच्या खाजगी क्षेत्रात आंबाकलम–लागवड केली.

तुम्हाला कल्पना आहेच, कोकणातील प्रत्येक खेडे हे कड्याकपारीत, डोंगरात वसलेले. सपाट अशी जमीन चुकूनही नजरेस पडणार नाही. पावसाळा सोडला तर पिण्याच्या पाण्यासाठी मैल–मैल भटकावे लागते आणि तेही टेकड्याच्या पायथ्याशीच मिळेल. एवढी शेकडो कलम पाण्यानं शिंपणार कशी ? हा प्रश्न निर्माण झाला. बरे, ही दीड हजार कलम काही एका ठिकाणीच नव्हती. २०० कलमं गावच्या वरच्या बाजूला. ५०० गावच्या खालच्या शिवेवर तर ५०० गावच्या दक्षिणेला. कलम लावलेल्या ठिकाणी माणसाला पायी जाणं अवघड, तर तिथे एखादं वाहन कसं नेणार ? बरे, पाणी तर जवळ असायला पाहिजे होते, तर त्याचाही पत्ता नाही. जिथं बारमाही म्हणजे उन्हाळ्यातदेखील पाणी असेल असं ठिकाण कलमापासून दोन ते तीन मैल अंतरावर. एकेकट्या शेतकऱ्याच्या कुटुंबियानी आपापली झाडं शिंपावी म्हटलं तरी दोन घागरी न्यायलाच दिवस मावळणार ! जिथं रिकाम्या माणसाला वाटेनं चालता येत नाही तिथं घागर घेऊन रस्ता कसा चढणार ?

बैलगाडीची सोय करावी म्हटलं तर लाकडी बैलगाडी दोन महिन्यात मोडून जाणार. बैल सहा महिन्यात म्हातारी होणार. हे सगळं असूनही आपला उघडा, बोडका, ओसाड माळ हापूस आंब्याच्या झाडानी हिरवा गर्द, पिवळा, लालजर्द रसाळ करायचाच होता.

विल्ये गावातील पंधरा–वीस तरुण हे काम अंगावर घेण्यास तयार झाले. संस्थेने अर्धवट जुना, साधीला पडलेला पॉवर टिलर आणला. कारण नवा घ्यायला संस्थेकडे पैसा कुठला ? पॉवर टिलर कलमाच्या जास्त जवळ नेण्यासाठी आमच्या तरुणानी रस्ता तयार केला. पॉवर टिलर चालवणारे श्री. सुरेश गगावणे आणि त्याच्या बरोबर काम करणारे चदू आझाद, जगन्नाथराव, माधवराव यानी कमरा कसून संपूर्ण वर्षभर दीड हजार कलमाना पाणी पुरवण्याचं अवघड काम अव्याहतपणे केलेले आहे. पाणी शिंपता–शिंपताच प्रत्येक कलमावर सावली रहावी, ऊन लागू नये म्हणून छतही त्यानी बाधलं. कलमाला घातलेल पाणी चटकन वाळून जाऊ नये म्हणून कलमाच्या बुडाला भाताचा पेंढा त्यांनी पसरून ठेवलेला आहे. ह्या वर्षाचा पाऊस होताच खताचे डोसही दिलेत कलमांना लहान मुलाच्या हातासारखी लुसलुशीत कोवळी कोवळी पानं फुटत आहेत. तर आमच्या तरुणांना रोजगार मिळाला म्हणून तेही खुशीतच आहेत.

पॉवर टिलर जुनाच असल्यानं तो नेहमी बंद पडायचा; परंतु त्या बद पडण्यातून आमची खेड्यातली मुलं तो पॉवर टिलर हळूहळू दुरुस्तही करण्यास शिकत आहेत. पॉवर टिलर कुठे बिघडला ते पटकन ओळखत आहेत. ज्या मुलांनी कधी सायकल बघितलेली नाही, सायकलचं पंक्चर कस काढावं हे ज्यांना माहीत नव्हतं, ती आता पॉवर टिलरच्या ट्यूबचं पंक्चर शोधून, जोडूनही घेतात.

### काम करणाऱ्याकडेच पुढारीपण

कोकणातील आमदार, खासदार जसे मुबईला अन् दिल्लीलाच असतात, तसेच कोकणातील खेड्याचे पुढारीदेखील मुबईतच असतात. हे पुढारी मुबईत बसूनच गावचा कारभार पहात असतात. कधी गणपतीला तर कधी शिमग्याला येऊन गावची देखभाल करतात. गावात काय व्हायला पाहिजे ते ठरवत असतात. ही मडळी मुंबईत ग्रामस्थ मंडळाच्या निमित्ताने एकत्र येतात. जुन्या आठवणीना उजळा देत–देत मुंबईच्या चष्म्यातून आपल्या गावचा विकास कसा होईल याचा विचार करतात. यातूनच गावविकासाबाबत बैठका, सभा, परिषदा यांचे मुंबईत पेव फुटते. कोकणविकासाचे पर्यायाने गाव विकासाबाबतचे अनेक ठराव पास होतात.

गावी राहून पोट भरत नाही, या भावनेनेच कोकणातील हरहुन्नरी माणूस मुबईकडे धाव घेतो. प्रतिष्ठेची, चांगल्या कमाईची


## श्री. रामलिंग वीव्हिंग वर्क्स

वॉर्ड नं. ९ घर न. ७५ गाधीकॅम्प,
इचलकरंजी

फॅन्सी पातळे, धोती, मलमल, केंब्रिकचे उत्पादक.

प्रोप्रा. अण्णासाहेब रामलिंग कबाडे

नोकरी वा कामधंदा असलेली माणसे जेमतेमच. बहुतेक पोटासाठी पडेल त्या कामात गुतलेली; परतु त्याच्या तुटपुज्या कमाईवरच गावाकडचे कुटुब अवलंबून असते. कुटुंबातला एखादाच माणूस गावी घर पहातो. वडिलोपार्जित जो काही जमीनजुमला असेल तेवढे तरी शाबूत राखावे म्हणून. कूळकायद्याच्या कचाट्यातून इतर भाई-बंदाच्या अतिक्रमणातून तो वाचवावा एवढीच इच्छा. गावी असलेल्या माणसाने काही जास्त उत्पन्न शेतीतून काढावे अशी अपेक्षाच मुबईकराची नसते. त्या मागे राहिलेल्या माणसाने काही निर्णय घ्यावे असे म्हटले तर सारेच बिघडते. उदा– नवीन प्रकारची शेती, त्यासाठी खते, अवजारे, शेतीसाठी लागणारे भांडवल कर्जरूपाने त्याने उभे करावे म्हटले तर मुबईत असलेल्या माणसाच्या पोटात गोळाच उठतो. पर्यायाने इथे असलेला माणूस हा कर्तृत्वशून्यच असतो. कर्ज काढले तर सगळी जमीनच गहाण पडेल व कर्ज मुबईकरांनाच फेडावे लागेल म्हणून इथे राहिलेला माणूस तसे काहीच करणार नाही याचा पूर्ण बदोबस्त मुबईकर करतात.

गावाकडची जमीन ही बहुधा मुबईकराच्याच नावावर असते. ती कशीबशी झाकून घेणे ह्याव्यतिरिक्त फारसे काही राहिलेला माणूस करू शकत नाही. म्हणूनच शेतातून काय उत्पन्न येते, काय खर्च होतो याचा हिशोब करण्याच्या भानगडीत ग्रामस्थ पडत नाही.

पावसावर, दैवावर भरवसा ठेवून जे काही पिकेल ते उत्पन्न असे गृहीत धरून तो चालतो. शेतातून आलेले उत्पन्न कुटुबाला चार ते सहा महिनेदेखील पुरत नाही. मग मुबईकराच्या मनिऑर्डरची प्रतीक्षा सुरू होते. गावी राहिलेल्या कुटुबाच्या मीठमिरची व अंगावरच्या वस्त्राचीदेखील बेगमी मुंबईकराना करावी लागते. या सर्व प्रकाराने मुबईकर वैतागलेला असतो. मग आपण सेवामुक्त झाल्यानंतर गावी जाऊन शेती कशी भरभराटीस आणू याचे मनोराज्य तो उभे करतो. या मनोराज्यातूनच उद्भवतात कोकण विकासाच्या खेड्याच्या विकास परिषदा, नंदनवनाचे मनसुबे आणि ही मंडळी जेव्हा मुबईच्या सेवेतून मुक्त होऊन गावी येतात ते छातीवर हात ठेवून खोकलत...खोकलत... !

हे ग्रामस्थ मुंबईकर पुढारी केवळ सागकामेच आहेत. मुंबईत राहून अमक्या ठिकाणी अमुक झाले पाहिजे, तमक्या ठिकाणी तमुक झाले पाहिजे, अशी कामे सागत फिरतात. यातली बरीच कामे अमक्याची बदली करा वा स्थगित करा, तमक्याच्या मुलाला नोकरी द्या. अमुक गावचा रस्ता करा, त्या कच्च्या रस्त्यावर खडी घाला, याच स्वरूपाची या पुढाऱ्याची कामे असतात.

ही सारी मुबईकर पुढारी मंडळी आणि ग्रामस्थ मंडळी कोकणातील खेड्याच्या विकासमार्गात धोंड होऊन बसलेली आहेत. एक म्हणजे त्याना काही करायचे नसते. कारण प्रत्यक्ष काम म्हटले की, त्याच्या अंगावर काटा येत असतो आणि दुसऱ्यानं करायचं म्हटलं तर त्याला करू द्यायचं नसतं.

आम्ही सर्व कार्यकर्त्यांनी विल्ये गावातील जुन्या–नव्या कार्यकर्त्यांना या कार्यक्रमाचे सहभागी करण्याचा वा करून घेण्याचा आटोकाट प्रयत्न केला; पण त्यात एक पथ्य पाळलं. जे या कार्यक्रमात सामील झाले नाहीत, त्यांनी सहकार्य दिलं नाही, अशांना आम्ही अजिबात दुखवलं नाही ज्यांच्या नेतृत्वाला आव्हान न देता बाजून वळसा घालत घालतच आमच्या कार्यक्रमाची दिशा आखत गेलो. त्यात ८० वर्षांचे विष्णुअण्णा, ६० वर्षांचे महादेवराव तर वीस वर्षांचा चदू आणि पंचवीस वर्षांचा आझाद तर चाळिशी ओलाडलेले श्री. शितपगुरुजी ही मडळी हिरीरीने या प्रकल्पात सामील होऊन गावसमृद्धीसाठी झटत आहेत.

पाणलोटप्रकल्प खेड्याच्या विकासासाठी कसा योग्य आहे, हे भोवतालच्या पचक्रोशीत पटवण्याचा विडाच श्री. जगन्नाथराव देसाईंनी उचललेला आहे.

या सर्व चळवळीत विल्ये गावाचे नाव कोकणातच नव्हे तर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात गेलं. आकाशवाणीने या कार्यक्रमाची दखल तर घेतलीच; पण भारतातील नामवत अशा इग्रजी मासिकांनीदेखील या कार्यक्रमाची दखल घेऊन प्रसिद्धी दिलेली आहे.

वरील सर्व कारणांमुळे विल्ये हे एक दुर्लक्षित, माहीत नसलेले लहानसे खेडे; परतु प्रकल्यामुळं प्रसिद्धीस येताच शासनाने २० कलमी कार्यक्रमाखाली हे खेडे दत्तक घेतले आहे. विविध उपक्रम शासनातर्फे राबवले जात आहेत. आतरराष्ट्रीय आरोग्यसंघटनेने म्हणजेच युनिसेफनेदेखील या गावावर लक्ष केंद्रित केले. युनिसेफने गावकऱ्यासाठी तीस संडास बांधून दिले. संकरित गाईसाठी ५० लोकानी बँकेकडे कर्जासाठी अर्ज केलेला आहे.

शाळेचे माजी मुख्याध्यापक श्री. वसंतराव देसाई आणि कानडेगुरुजी याच्या सहकार्याने. दि. २ ऑक्टोबर ८३ रोजी गोगटे–जोगळेकर महाविद्यालयातील प्रा. नारायणराव पाटसकर याच्या हस्ते 'ग्रामरचना वाचनालयाचे' उद्घाटन झाले.

सर्व कार्यकर्त्यांच्या धडपडीतूनच एका अवगळीत पडलेल्या खेड्यात आज एका रचनात्मक कार्याने आकार घेतला आहे. त्यामुळे कोकणातल्या वेगवेगळ्या तालुक्यातून या योजनेविषयी उत्सुकता निर्माण केलेली आहे. विल्ये परिसरात ते खेळू लागलेले आहे.

हे सारं कशामुळं घडलं ? त्याला एकच मुख्य कारण. ते म्हणजे विल्ये गावातील जनतेत स्वतःच्या गा विकासासंबधीची इच्छा ! त्यासाठी त्याची एकजूट ! अहोरात्र परिश्रम. मग गाव करील ते राव काय करणार ??

□


**मातृभूमी स्वीट मार्ट**

इचलकरंजी ४१६ ११५

□

फोन : ३३९३

□

पार्टी व समारंभाच्या ऑर्डरींसाठी

## पुस्तके

# शेतकरी संघटनेमागील विचारधारा

एकोणिसशेऐंशी सालच्या नाशिक आंदोलनानंतर शेतकरी संघटनेचे नाव सर्वतोमुखी झाले आणि नंतर उण्यापुऱ्या तीनच वर्षांमध्ये संघटना व तिचे प्रमुख प्रवर्तक श्री. शरद जोशी याना अखिल भारतीय पातळीवर प्रसिद्धी व मान्यताही मिळाली.

शेतकरी संघटनेचे कार्य त्याआधीही काही वर्षे चालूच होते; परंतु परदेशस्थ नोकरीतील आपले चागले जमलेले बस्तान मोडून शरद जोशी नावाचा एक सुशिक्षित (आणि म्हणून पाढरपेशा) गृहस्थ सरळ मायदेशी परत येतो, एवढेच नव्हे तर शेतकऱ्यामध्ये ठाण मांडून बसतो व माधवराव मोटे, प्रल्हादराव पाटील, भास्करराव बोरावके यासारखी अनेक नेते आणि कार्यकर्ती मंडळी आपले पक्षभेद गुंडाळून ठेवून त्याच्याभोवती जमा होतात ही गोष्टच सहज प्रवृत्तीविरुद्ध जगावेगळी ठरते.

शरद जोशी या (एरवी कोणतेही खास वैशिष्ट्य नसलेल्या) पाढरपेशा नावाभोवती महाराष्ट्रातील सधन, निर्धन शेतकरी, मजूर, सर्वच शेतकरी मडळी जमा होतात, एवढेच नव्हे तर त्यानी हाक देताच अक्षरशः हजारोच्या संख्येने आंदोलनात स्वतःला झोकून देतात, यामागे केवळ राजकारण, अर्थकारणापलीकडचे असे काही तरी निश्चित असले पाहिजे.

शेतकरी सघटना या शब्दाचा प्रस्थापितांनी आणि सरकारने (मग ते अंतुल्यांचे असो, महाराजांच्या वशातील बाबासाहेब भोसल्याचे असो वा. वसंतदादा पाटलाचे असो) इतका धसका घेतला आहे की, शेतकरी संघटना, त्यांच्या मागण्या व आंदोलने ही जणू काही देशविरोधी बंडे आहेत अशाच तऱ्हेने सरकार त्यांचा 'बंदोबस्त' करू पाहते. नोव्हेंबर ८० मधील नाशिकचे ऊस-आंदोलन ते अगदी मे ८३ मधील धुळ्याचे दूधआंदोलन यांच्या 'सरकारी' स्वागताकडे पाहता याची खात्री पटते.

मग समोर प्रश्न असा उभा राहतो की, ज्यासाठी हजारो शेतकरी शेतमजुरानी हातामधील प्रत्येक काम सोडून देऊन पोलिसाच्या लाठ्या आणि गोळ्या खाण्यासाठी स्वेच्छेने रस्त्यावर यावे असे नेमके शरद जोशींच्या आणि शेतकरी सघटनेच्या तत्त्वज्ञानामध्ये काय आहे ?

शेतकरी संघटनेमागील विचार आणि संघटनेची कार्यपद्धती यांची ओळख करून देणारी तीन पुस्तके शेतकरी प्रकाशनतर्फे प्रसिद्ध करण्यात आली आहेत. अर्थात ही पुस्तके म्हणजे काही एकादा प्रबोधनपर लेखांचा, निबंधाचा संग्रह नव्हे की कोणती एक तत्वधारा मांडणारा प्रकाड प्रबंधही नव्हे.

शेतकरी सघटनेचे नेते श्री. शरद जोशी यानी आपल्या संघटना-प्रचाराच्या निमित्ताने व कार्यकर्त्यांच्या शिबिरांमध्ये दिलेल्या व्याख्यानांचा, केलेल्या शंकानिरसनांचा हा सग्रह आहे. त्याचप्रमाणे नोव्हेंबर १९८० पासून सुमारे वर्ष–दीड वर्ष चाललेल्या 'वारकरी' या साप्ताहिकामधील विचार यात उद्धृत केलेले आहेत.

शेतकरी संघटना आणि शेतकरी आंदोलन या निमित्ताने विविध प्रकाशने, साप्ताहिके, दैनिके आणि नियतकालिके यामधून आलेले लेख, स्फुटे, वृत्तात यांचाही या तीन पुस्तकामध्ये आधार घेतला आहे.

या मालेतील पहिले पुस्तक 'शेतकरी संघटना; विचार आणि कार्यपद्धती' (पृष्ठे १७०, मूल्य पंचवीस रुपये) यामध्ये शरद जोशी याच्या रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यातील भाषणाच्या व आबाजोगाई येथील कार्यकर्ता प्रशिक्षण–शिबिरातील मार्गदर्शनपर व्याख्यानांच्या नोंदीवरून व कॅसेटसवरून प्रा. सुरेशचंद्र म्हात्रे यानी सिद्ध केलेली लेखमाला आहे.

'प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश' या प्रकाशनक्रमांक दोन (पृष्ठे ७५, मूल्य पधरा रुपये) मध्ये वारकरीमधील व इतर लेखांतील विचाराचा सग्रह आहे तर 'भारतीय शेतीची पराधीनता' या तिसऱ्या पुस्तकामध्ये (पृष्ठे ४०, मूल्य सहा रुपये) वर्धा येथे १ जानेवारी १९८१ रोजी भरलेल्या शेतकरी संघटना कार्यकर्त्यांच्या शिबिरामध्ये शरद जोशी यांनी केलेल्या मार्गदर्शनाचे व तेथील चर्चेचे प्रा. सुरेश घाटे यानी केलेले शब्दाकन आहे.

ही तिन्ही प्रकाशने, पुस्तके एकत्र समोर ठेवून वाचताना त्यामधून शेतकरी संघटनेच्या कार्यामागील शरद जोशींच्या चळवळीमागील एक निश्चित विचाररेखा दृग्गोचर होते, जाणवू लागते.

### हतबल वर्ग

'भारतीय संस्कृती ही प्रामुख्याने कृषिप्रधान असून भारतीय समाजजीवन हे शेतीशी निगडित आहे. भारतीय सांस्कृतिक जीवनात कृषी–शेतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे' हे आपण सर्वच जण लहानपणापासून ऐकत आलो. आजही सुमारे दोनतृतीयांश जनता शेतीवर जगते आणि एकतृतीयांश राष्ट्रीय उत्पन्न शेतीतूनच आम्हाला मिळते हे आम्ही पाठ्यापुस्तकातून शिकतो, रोज वाचतो आणि तितक्याच तत्परतेने विसरूनही जातो.

आपल्या रोजच्या व्यवहारातील खाद्यपदार्थ, जीवनोपयोगी (व उपभोग्यही) वस्तू कशा येतात, कोठून मिळतात यावर आपण फारसे लक्ष दवडीत नाही आणि त्या वस्तू तयार करणाऱ्याकडे तर ढुंकूनही पाहत नाही. सिनेमा, नाटक, वीज, पेट्रोल, वाहतूक प्रत्येक क्षेत्रातील दरवाढ आपण निमूटपणे सहन करतो. कारण त्यापुढे आपला इलाज नसतो; पण गहू, तांदूळ यांचे भाव काही पैशांनी जरी वाढले तर आपल्याला ते चालत नाही. कारण ते पैसे शेतकऱ्याला मिळतात आणि तो समाजातील सर्वांत असघटित दुर्बल (नव्हे हतबल) वर्ग आहे.

सर्वसाधारण शेतकऱ्याला भारताइतक्या हालअपेष्टा जगात कुठेही सहन कराव्या लागत नसतील. जेमतेम तीनशे वर्षे अस्तित्वात असणाऱ्या अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष–

जिमी कार्टर–शेतकरी असूनही जगातील सर्वांत 'ताकदवान' नागरिक बनू शकतो. हजारो वर्षांची प्राचीन (व प्रगल्भ) परंपरा सांगणाऱ्या भारतात मात्र शेतीशी जवळीक सांगणारा व्यवसाय करणाऱ्या 'दैवी' श्रीकृष्णाशिवाय (आणि ससदेला एकदाही तोंड न दाखविणाऱ्या चरणसिंगाविना) कोणाही शेतऱ्याला सर्वोच्चपदी विराजमान होता येत नाही, (मग राज्यपद्धती कोणतीही असो), हे एक कटुसत्य आहे. कारण एकच ! कोट्यवधींचे पोट भरणाऱ्या या व्यवसायास समाजात अजूनही प्रतिष्ठा नाही.

समाजाच्या नेमक्या या वैगुण्यावर बोट ठेवून ते दूर करण्याचा शेतकरी संघटनेचा प्रयत्न ही पुस्तके उलगडून दाखवितात. केवळ भारताच्याच जागतिक इतिहासामध्येही शेतकरी मोठ्या प्रमाणावर एकत्र आल्याची उदाहरणे जवळजवळ नाहीतच. भारतामधील विविध भाषा, धर्म, विचार आणि अठरापगड जाती लक्षात घेता हे काम अशक्यच होऊन बसते.

आर्थिक व सामाजिक उतरंडीमध्ये वेगवेगळ्या पातळीवर असणाऱ्या बहुसंख्य अशिक्षित आणि दरिद्री कृषीवल समाजाला एकत्र आणण्यासाठी त्यांना तितकेच बळकट तत्त्वज्ञान द्यावे लागते तेही सोप्या भाषेमध्ये.

शतकानुशतकांची भीती, गैरसमज, अविश्वास काही एका रात्रीमध्ये दूर होत नाहीत. त्याला जसा थोडा–फार वेळ द्यावा लागतो त्याचप्रमाणे मुख्य महत्त्वाच्या मुद्द्यांची सोप्या, नेहमीच्या भाषेमध्ये पुन:पुन: उजळणी करावी लागते.

ही तीनही पुस्तके नेमके हेच काम करतात, शेतकऱ्यावर होत असलेला अन्याय, त्यांची पिळवणूक याची जाणीव करून देऊन प्रथम त्यांना संघटित करण्याचे आणि मग त्याला अर्थशास्त्रीय विचाराची जोड देऊन एका पक्षातील विशाल चळवळ उभी करण्याचे.

संघटनेने अंगीकारलेल्या एकमेवाद्वितीय कार्यामुळे आपल्या विषयाच्या प्रचंड व्याप्तीबरोबरच त्याच्या मर्यादाही लक्षात घेऊन पुढे जावे लागते. भारतीय शेतकरी अशिक्षित आहे, गांजलेला आहे; परंतु निर्बुद्ध नाही. पिढ्यान पिढ्या जीवनातील दु:खे, अत्याचार याना तोंड देणाऱ्या या शेतकऱ्याला त्यातील राजकारण, अर्थकारणही कळू शकते. आपली ही स्थिती का झाली यामागील योग्य कारणमीमांसा त्याला जाणवून दिल्यास ही स्थिती बदलण्याचे मार्ग आत्मसात करण्यास वेळ मुळीच लागणार नाही.

शरद जोशी नेमके हेच करण्याचा प्रयत्न या पुस्तकांमधून करत आहेत. उत्पादनखर्च, प्रचलित वर्गविग्रह, शोषण, उद्योगनीती आदि शब्दांची व त्याचबरोबर शेतीच्या अर्थकारणाची शेतकऱ्याला जाणीव करून देत असतानाच ते भारतीय (परपरागत वसाहतवादी) अर्थव्यवस्थेतील विविध घटकांवर व शोषक–शोषित परंपरेवर नेमके बोट ठेवतात.

ब्रिटिश गेले, सत्ता बदलली; परंतु सत्तास्थाने बदलली नाहीत, भारतातील असंघटित शेतकरी–शेतमजुराचे शोषण आता परकीयाऐवजी त्यांचा वारसा सांगणारे संघटित भारतीयच करत असल्याची जाणीव ते करून देतात. भारतीय अर्थव्यवस्थेच्या या दोन वर्गांनाच ते 'भारत' आणि 'इंडिया' असे नामाभिधान देतात व 'इंडिया'चे वर्चस्व झुगारून देण्याचे आवाहन 'भारताला' करतात.

याच्या फळस्वरूपी ते संघटनेचा एककलमी कार्यक्रम पुढे मांडतात, स्वातंत्र्य प्राप्तीनंतर जवळजवळ सर्व वस्तू, सेवांचे भाव पन्नास ते साडेतीनशे टक्क्यापर्यंत वाढल्याचे नमूद करून ते शेतमालाच्या भावात मात्र जवळजवळ कोणतीच वाढ झाली नसल्याचे निदर्शनास आणून देतात.

## ग्रामीण दारिद्र्य हे मूळ

'तीस वर्षांपूर्वी आमच्या घरात जी परिस्थिती होती त्यापेक्षा आज चांगली परिस्थिती आहे' असे म्हणणारा केवळ शेती हाच एकमेव व्यवसाय करणारा एकतरी शेतकरी आज आहे काय ?' असा सवाल करून ते दोन गोष्टी पुढे मांडतात, पहिली म्हणजे ग्रामीण भागातील (म्हणजे एकाप्रकारे संपूर्ण देशातीलच) दारिद्र्याच मूळ कोरडवाहू शेतीमध्ये आहे आणि दुसरे म्हणजे शहरी भागातील दारिद्र्य हे ग्रामीण भागातील दारिद्र्याचाच परिणाम आहे.

म्हणूनच ते म्हणतात; 'हे दारिद्र्य हटविणे हे शेतकरी आंदोलनाचे अंतिम उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट साधण्यासाठी शेती किफायतशीर केली पाहिजे. म्हणजे शेतीमालाचा उत्पादनखर्च भरून निघाला पाहिजे.

हे सर्व इतक्या स्पष्ट व सरळ रीतीने वाचल्यावर मग समोर प्रश्न उभा राहतो की भारतीय दारिद्र्याच्या आणि तदनुषंगाने राष्ट्रीय विकासाच्या समस्येवरचा उपाय इतका साधा व सोपा आहे काय ? आणि मग असे असेल तर आपले राज्यकर्ते, नियोजक त्याचा अवलंब का करत नाहीत ?

या प्रश्नाचे उत्तर 'होय' आणि 'नाही असे दोन्हीही असू शकते. अनेक विषयांची गल्लत व सरमिसळ करण्याची व प्रत्येक गोष्टीत राजकारण आणण्याची आपली परंपराच आहे. भाषावार प्रांतरचना, जात–धर्म यांचे राजकारण यांच्याप्रमाणेच आपल्या अर्थकारणातही राजकारण फार मोठ्या प्रमाणावर गुंतले आहे. परिणामी प्रत्येक गोष्ट अधिकाधिक अवघड, क्लिष्ट करण्याच्या आपल्या सवयीची झळ याही प्रश्नाला (त्याच्या सोडवणुकीला) लागत आहे.

राजकारण बाजूला ठेवून केवळ अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून या पुस्तकातील तत्त्वे तपासून पाहण्याचा प्रयत्न केल्यास काय दिसते ? प्रख्यात अर्थतज्ज्ञ आणि पुण्याच्या गोखले अर्थशास्त्रसंस्थेचे माजी संचालक प्रा. वि. म. दाडेकर यांनी वीस फेब्रुवारीला या तीन पुस्तकांच्या प्रकाशनप्रसंगी आपले विचार व्यक्त करताना पुढील गोष्टी समोर मांडल्या.

'देशाच्या नव्वद हजार कोटी रुपये राष्ट्रीय उत्पन्नापैकी एकतृतीयांश हिस्सा सत्तर टक्के शेती व्यावसायिकाचा आहे. तर दोनतृतीयांश हिस्सा तीस टक्के बिगरशेतीव्यावसायिकांचा आहे. म्हणजेच शेतीतील लोकसंख्येचे वार्षिक उत्पन्न केवळ सहाशे रुपये तर बिगरशेतीव्यावसायिकांचे वार्षिक उत्पन्न (स्थूलमानाने) तीन हजार रुपये आहे आणि हीच तफावत हानीकारक असून ती दूर करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत,'

'शेतीमालाचे भाव वाढवून देऊन ही तफावत दूर करता येते का हा मुख्य प्रश्न आहे. आर्थिक समतेचा विचार करता ज्यांच्याकडे जास्त आहे त्यांच्या खिशातून

काढून कमी असणारांना जे ते देणे हे महत्त्वाचे आहे. शेतीमालाचे भाव वाढविले तर विषमता काही प्रमाणात दूर होऊ शकेल मात्र त्यासाठी बिगरशेतीमालाचे भाव मात्र स्थिर रहावयास हवेत.'

'हे संघर्ष शहरी–ग्रामीण, बिगरशेती–शेती, संघटित–असंघटित असे आहेत. यासाठी आपला संघर्ष नेमका कुणाशी हे कार्यकर्त्यांनी, संघटनेने तपासून घेतले पाहिजे. शासन हे संघटितांचाच आधार घेऊन (सत्तेवर) बसलेले आहे. त्यांना (संघटितांना) ते हलवत नाही. हा संघर्ष आहे हे लक्षात ठेवून जाणून पुढे जाणे आवश्यक आहे.'

'शेतमालाचे भाव हेतुपुरस्सर दाबून ठेवण्याचे शासनाचे सामर्थ्य नाही. मात्र जर सहकार, सरकार किंवा व्यापारी–दलाल यापैकी काहीच नको असेल तर शेतकऱ्यांना रास्त भाव मिळवून देण्याची आपली (पर्यायी) यंत्रणा काय आहे यासंबंधीची आपली कल्पना शरद जोशी यांनी स्पष्टपणे मांडणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सरकारकडून नक्की काय अपेक्षा आहेत हे स्पष्ट करणेही जरुरीचे आहे.'

अर्थात या सर्व ऊहापोहामध्ये एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की प्रा. दांडेकरांनी शेतकरी संघटनेस (जाहीर) पाठिंबा देऊनच ही विचारधारा अधिक पक्की करण्यासाठी आपले म्हणणे समोर मांडले.

'शेतमालाला रास्त भाव दिल्याने तो सर्वांनाच मिळेल, अंतिमत: सर्वांनाच फायदा मिळेल याबद्दल श्री. जोशी (आपल्या पुस्तकामध्ये) संदिग्ध असल्याचे सांगून प्रा. दांडेकरांनी असेही प्रतिपादन केले की, यासाठी 'इंडिया'मधील वरच्या गटाकडून (बिगरशेतीतील वरच्या वर्गाकडून) लाभ व क्रयशक्ती 'भारत'मधील (शेतीक्षेत्रातील) तळाच्या गटाकडे फिरणे आवश्यक आहे. (कारण नुसतेच शेतमालाला जादा भाव दिल्याने बिगर शेती क्षेत्रातील तळच्या वर्गाला झळ बसेल आणि शेती क्षेत्रातील वरच्या वर्गाला लाभ मिळेल. शेतकऱ्याला मिळणारा लाभ झिरपून शेतमजुरापर्यंत पोहोचायला वेळ लागेल.)

शेतकरी संघटनेच्या तत्वासंबंधी अर्थशास्त्रज्ञांची मते विचारात घेणे त्यास अर्थशास्त्रीय निकष लावून घासून-पुसून घेऊन ती अधिकाधिक स्वच्छ, स्पष्ट व परिणामकारक बनविणे हे आवश्यक तर खरेच; पण तो यापुढील प्रक्रियेचाच एक भाग आहे. मूळ महत्व आहे ते समाजाच्या एवढ्या मोठ्या घटकाला एकत्र आणणारा, संघटितपणे एका ध्येयाने प्रेरित करणारा विचार मांडण्याचे. ते काम शरद जोशींच्या या तीन पुस्तकांकडून नक्कीच होते आहे. प्रा. दांडेकरांनी उपस्थित केलेल्या मुद्यांना उत्तर देताना शरद जोशी यांनीच म्हटल्याप्रमाणे सर्व ठिकाणी लागणाऱ्या भांडवलाची निर्मीती फक्त शेतीतच होते; (म्हणून) एक आर्थिक निरगाठ सोडविण्याची सोयिस्कर जागा म्हणून हे शेतकरी आंदोलन सुरू केले आहे.


— प्रभाकर खोले

१) शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपद्धती. शेतकरी प्रकाशन, पृष्ठे १७०, मूल्य २५ रु.)

२) प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश शेतकरी प्रकाशन, (पृष्ठे ७५, मूल्य १५ रु.)

३) 'भारतीय शेतीची पराधीनता' शेतकरी प्रकाशन (पृष्ठे ४० : मूल्य ६ रु.)

□



# आजचे कवी

कोळगावकरांची कविता मानवी दु:खाला, वेदनेला, दारिद्र्य, विषमता, शोषण यांच्या ओझ्याखाली दबलेल्या मनाला अभिव्यक्ती देणारी कविता आहे.

□

लेखांक आठ

अविनाश सहस्रबुद्धे

□

**उ**त्तम कोळगावकरांच्या 'जंगलझडी' काव्यसंग्रहात एकूण एकशेसाठ कवितांचा समावेश करण्यात आला आहे. ग्रामीण जीवन आणि ग्रामीण निसर्ग या कोळगावकरांच्या प्रमुख काव्यप्रेरणा आहेत हे त्यांच्या संग्रहातील कविता वाचताना सहजपणे जाणवते. या कवितांमधून आलेल्या अनुभवविश्वाचे चित्रण करणारा हा कवी त्या प्रदेशात जन्मलेला, वाढलेला आहे. त्याचे संस्कारक्षम वय तिथेच व्यतीत झालेले आहे. त्यामळे त्यांच्या अनुभवात आपोआपच अस्सलपणा, सकसपणा आला आहे. ग्रामीण जीवनाचा, तिथल्या मातीचा, शेतीचा, निसर्गाचा रंग आणि गंध घेऊन अवतरलेली ही कविता आहे. या कवितेतील ग्रामीण जीवन कधीकधी विशिष्ट भौगोलिक प्रदेशाशी संबद्ध झालेले आहे. या अर्थाने ते 'प्रादेशिक' ही आहे. तेथील हवा, पाणी, निसर्ग यांच्याशी संवादी होऊन ते अवतरले आहे. कोळगावकरांची कविता 'प्रादेशिक' आहे. कारण ती त्या प्रदेशातील कौटुंबिक व सामाजिक रेखाटनावर भर देते. या जीवनातील विविध प्रसंग ती आत्मीयतेने रंगवते. त्या प्रदेशातील दैन्य, विषमता, माणसाचे पिचलेपण हा त्यांच्या रेखाटनातील केंद्रबिंदू असतो. कोळगावकरांच्या कवितेला निसर्गाचा खास वास असला तरी निसर्गाची ही वर्णनं आपलं गाव सोडून शहरात स्थायिक झालेल्यांच्या रंजनासाठी त्यांच्या कवितेतून वापरली जात नाहीत तर निसर्ग हा तेथील अनुभवविश्वाचा एक अपरिहार्य भाग, घटक म्हणून येतो. या निसर्गवर्णनांनाही चिंतनाचा स्पर्श असतो. कोळगावकर महानोरांसारखे निसर्गाच्या दर्शनाने हरखून जात नाहीत किंवा निसर्ग त्यांना स्त्रीविषयक अथवा प्रेमानुभवातील भावभावना व्यक्त करण्याचे


साधन फक्त वाटत नाही तर तो कवीला अंतर्मुख करतो, खेड्यापाड्यातील खुरटलेल्या मानवी जीवनाकडे घेऊन जातो. निसर्गचित्रांमुळे कवितेतील सामजिक आशयालाही कसे वेगळेच परिमाण लाभू शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे कोळगावकरांची कविता आहे.

कोळगावकरांच्या कवितेतून दिसणारे जीवनच सामान्यांचे आहे. नागर–जीवनापासून दूर असलेली, शहरी सुधारणांचे आणि शिक्षणाचे संस्कार न लाभलेली, दारिद्र्य, अज्ञान, परंपरा आणि रूढी यांच्या गुंतवळ्यात सापडलेली ही बहुसंख्य माणसं शेतमजुरीत आयुष्य कंठणारी आहेत. आपल्या लहानशा विश्वात असहायपणे, सगळे मान-अपमान गिळून जगणारी आहेत. यांच्या पाठीचा कणाच दारिद्र्याने मोडून टाकला आहे. जिवंत रहाणे ही एकच गोष्ट त्यांना माहीत आहे. स्वतःचे अस्तित्व प्रस्थापित करण्यासाठी येथे कोणी धडपडताना आढळत नाही. या माणसांची सारी शारीरिक शक्ती जगण्यासाठी खर्च होते. आहे त्या परिस्थितीत अगतिकपणे जगणे एवढेच त्यांना माहीत आहे. त्यांना कसल्या महत्त्वाकांक्षा नाहीत की, जगण्याच्या कसल्या ऊर्मी नाहीत. 'उन्हाचा वाळका भारा' खांद्यावर घेऊन जगणारी ही माणसं आहेत. 'सर्व बाजूंनी करकर वाजणारं आकाश' त्यांच्या डोक्यावर आहे आणि पायांखाली पडीक जमीन. वर्षभराची कमाई अखेर सावकाराच्या घशात जाते आणि ही माणसं 'फांदी तुटल्यासारखी लोंबकळत' रहातात. इथलं हे भयाण वास्तव पुढील ओळींमधून व्यक्त होतं.

गावातल्या घरापाशी चंद्र थांबला असेल,  
पोटातल्या काळोखाला कवळून  
आईच्या कुशीत भावंडं झोपली असतील,  
त्यांच्या अंगावर हात फिरवून  
शहाण्या माणसासारखा  
चंद्र निघून जात असेल...

खेड्यातलं हे वास्तव सोडून इथली तरणीताठी मुलं 'जगायला' शहरात येतात आणि तिथे त्यांच्या ह्याती काय लागतं हे कोळगावकर पुढील ओळीमधून सांगतात–

हे शहर ओसरू लागलं आहे रात्रीचं,



**उत्तम कोळगावकर**

कोळगाव ( ता. भडगाव, जि : जळगाव ) येथे ३ मार्च १९४९ रोजी जन्म. बी. ए. बी. एड्. पदवीनंतर धरणगाव, ता. एरंडोल, जि. जळगाव इथं माध्यमिक शिक्षक म्हणून सात वर्षे नोकरी. गेली तीन वर्षे आकाशवाणीच्या जळगाव केंद्रात कार्यक्रम अधिकारी म्हणून नोकरी करीत आहेत. १९६९ पासून खऱ्या अर्थानं काव्यलेखनास प्रारंभ. सत्यकथा, प्रतिष्ठान, अनुष्टुभ, युगवाणी, अस्मितादर्श इ. नियतकालिकांतून कवितांना प्रसिद्धी. 'कै. पु. शि. रेगे काव्यस्पर्धे'त द्वितीय पारितोषिक. 'कविता दशकाची' या ग्रंथालीच्या काव्यसंग्रहात समावेश. 'अक्षर दिवाळी ८० आणि ८२' साठी कवितांची निवड. 'जंगलझडी' कवितासंग्रह मौज प्रकाशनातर्फे १९८२ मध्ये प्रकाशित. पत्ता : कार्यक्रम अधिकारी, आकाशवाणी केंद्र, जळगाव ४२५००१.

### छातीत माती घेऊन

छातीच्या मातीतून अगदी पहिल्यांदा  
उपटून काढलं गेलं झाड  
तेव्हा कणाकणातून कळवळलो, विव्हळलो  
रक्तही वाहचलं, पण ते कुणीच पाहचलं  
नाही,

अगदी मीही.  
नंतर खूपदा असं घडल्यावर  
सवयच होत गेली.

आपण कष्ट उपसावेत,  
घाम गाळावा आणि बाग फुलवावी  
छातीभर

आणि वेळीअवेळी कुठंही  
कुणीही उपटून फेकावं झाड  
आपल्या डोळ्यांदेखत  
आपण फक्त कळवळावं  
आणि काहीच करू नाही  
याला आता हजारो वर्षं होतील.

छातीत माती घेऊन  
जन्माला येणं हा माझा काय  
किंवा कुणाचाही गुन्हा आहे ?

### आई

पोतारून पोतारून पांढुरक्या झालेल्या  
पोपडे धरलेल्या भिंतीसारखा  
चेहरा दिसायचा आईचा  
जेव्हा ती उदास व्हायची.  
अगदी लहान होतो तेव्हा  
जेव्हा ती दुपारला दाराशी बसून  
जिवाभावाच्या आईबाईजवळ  
मनातलं काही सांगताना  
डोळ्यांना पदर लावून घ्यायची.  
सायंकाळी अंधार दाटल्यावर  
ढणढणत्या दिव्याच्या उजेडात  
भाकरी थापत बसायची,  
विझलेली ओली लाकडं फुंकताना होणारी  
तिची दमछाक  
मी पाहू नाही शकायचो,  
पुढे व्हायचो आणि फुंकून द्यायचो चूल.  
नंतर मी अंधाऱ्या जागी उभा राहून  
भाकरी थापताना भिंतीवर हलणाऱ्या  
तिच्या सावलीकडे  
एकटक पहात राहयचो,  
तिच्यासाठी मनात  
खूप काही ठरवताना  
हरवून जायचो.

---

दिव्यांच्या खांबांची रांग  
सर्व दिशांना लांबत जाऊन  
जवळजवळ येणाऱ्या  
पुन्हा लांबत जाणाऱ्या

माझ्याच सावल्यांमधून  
मी एकाकी चाललो आहे.  
माझ्याजवळ काहीच नाही आहे  
माझ्याशिवाय.

खिडक्या बंद होताहेत
नंतर एकेक करून दिवे विझताहेत
खिडकी बंद करावी अन्
दिवा विझवून शांतपणं झोपी जावं
असं माझं काहीच नाही या शहरात.

गाव, कुटुंब सोडून शहरात आलेल्या तरुण मनाचे हे दुःख आहे. पोट भरायला शहरात आलेला हा तरुण अधांतरी अवस्थेत जगत आहे. गावी परत जाता येत नाही आणि शहर त्याला स्वीकारायला तयार नाही अशी त्याची अवस्था झाली आहे. शहरात आलेल्या अशा तरुणांच्या मनःस्थितीची 'चंद्र निघून जात असेल' ही प्रातिनिधिक कविताच आहे.

### उध्वस्ततेची चाहूल

कोळगावकरांच्या अनेक कवितांमधून जाणवते, ते प्राधान्याने येथील माणसाचे स्वतःला परिस्थितीच्या स्वाधीन करून जगणे. बाहेर उन्हाचा रखरखाट आणि अंतर्यामी आपल्या परिस्थितीची असह्य जाणीव व आतल्या आत कोंडलेले अश्रू.

नांगरलेल्या शेतावर लोंबलेलं
धगधगणारं उन्हाचं मोहोळ;
आणि माझ्या डोळ्यांच्या आत
कोसळत रहातो
आडदांड पावसाळा

हे इथल्या जीवनाचं बाह्य व आंतरिक ठसठसतं वास्तव आहे. इथे 'मी'चे वैयक्तिक संदर्भच असे सार्वत्रिक होतात याचा प्रत्यय येतो. कोळगावकरांच्या अनेक कवितामधून लोकसमूहाचे चित्रण आले आहे, लोकसमूहाच्या जाणिवा व्यक्त झाल्या आहेत. हे जीवन जगणारा तिथला लोकसमूहच या कवितांचा 'नायक' आहे.

स्वप्नांची प्रेतं वाहून वाहून
डोळे थकून गेले आहेत त्याचे
तरी त्यानं
स्वप्नांना आणायचं थांबवलेलं नाही.

असा हा लोकसमूह आहे. वर्षानुवर्षं तो 'स्वप्नांची प्रेतं' वाहतो आहे. कोळगावकरांच्या कवितांमधून दिसणाऱ्या 'प्रदेशाचं' शब्दचित्र 'याच प्रदेशात' या कवितेत आपल्याला पहायला मिळतं.

इकडे पक्ष्यानी वस्ती केल्याचं
एकही चिन्ह नाही
आणि मी पक्ष्यासाठी आणलेली गाणी
आता पोरक्यांसारखी
मळलेल्या काटेरी झुडुपावर

मिटून बसली आहेत.
मी हिंडतो या प्रदेशातून
अतिशय कोरडाठार
आणि एखादाही पाऊस अंगावरून
झडझडून जात नाही.
मी घातलेली शीळ
काट्याकुट्यात अडकून पडते
किंवा तडकलेल्या मातीवर
तडफडून मरते.
खूप फुलझाडं मी लावून पाहिली;
पण इथल्या मातीला ते मानवतच नाही
आणि सुकून पाचोळा तेवढा होतो.

ठार वठत गेलेला हा प्रदेश आहे. या वठण्यालाही सामाजिक संदर्भ आहे. वेळेवर पाऊसपाणी न पडणे ही या प्रदेशातील लोकांवर कोसळणारी आपत्ती तर आहेच; परंतु त्याशिवाय या वठण्याला, रखरखाटाला शोषणाचे, विषमतेचे, अन्यायाचेही असंख्य संदर्भ आहेत. आयुष्यातले हे पिचलेपण त्यांच्यावर लादले गेले आहे. श्रमिकांच्या शोषणावर उभ्या असलेल्या समाजव्यवस्थेने हे लादले आहे. शोषणाची अव्याहत चाललेली ही प्रक्रिया पाहूनच 'छातीत माती घेऊन' कवितेत कवी प्रश्न विचारतो—

आपण कष्ट उपसावेत,
घाम गाळावा आणि
बाग फुलवावी छातीभर
आणि वेळीअवेळी कुठंही
कुणीही उपटून फेकावं झाड.
आपल्या डोळ्यादेखत,
आपण फक्त कळवळावं
आणि काहीच करू नाही
याला आता हजारो वर्षं होतील
छातीत माती घेऊन
जन्माला येणं हा माझा काय
किंवा कुणाचाही
गुन्हा आहे ?

माणसाच्या जीवनातील निर्मितिशीलता उध्वस्त होत असल्याची जाणीव कोळगावकरांच्या अनेक कवितामधून दिसते. 'पीक नष्ट होतंय' कवितेत विनाशाची चाहूल त्यांना लागते. आडदांड सांडाच्या प्रतीकातून त्यांनी या विनाशाच्या खुणा नोंदवल्या आहेत. काळाकुट्ट आडदांड सांड उभ्या हिरव्या पिकातून जाताना त्यांना दिसतो. त्याच्यामुळं सगळं हाताशी आलेलं पीक नष्ट होतय हे त्यांना दिसते. 'जंगलझडीचा


**विजय एजन्सीज्**
**GEM RIFRIGARATOR**
खास कमी केलेल्या दरात
स्त्रियांजवळ सारखा असणारा
नवऱ्यापेक्षा जास्त आवडणारा
'जेम' फ्रिज नाव ज्याचे
विजय एजन्सीज डीलर त्याचे
**विजय एजन्सीज**
सांगली बँकेजवळ, बंगाला रोड, इचलकरंजी



**महाजन टेक्सटाईल्स**
धोती, मलमल, केंब्रिकचे होलसेल व्यापारी
वॉ. नं. १०, घर नं. १०९२
इचलकरंजी

उच्छाद' या कवितेतही उध्वस्त होणाऱ्या निर्मितिशीलतेची चाहूल व्यक्त झाली आहे. कवीला दिसतो तो 'सर्वदूर दैवी श्वापदानं माडलेला जंगलझडीचा उच्छाद !' जंगलझडीचा हा उच्छाद इतरही काही कवितामधून वेगवेगळ्या तऱ्हानी व्यक्त होत असलेला दिसतो. त्या दृष्टीनं 'एक गाण', 'कापलेली शेते', 'हरवलेल्या गाई' इ कविता उल्लेखनीय आहेत. 'एक गाणं' कवितेत कवी म्हणतो,

पावसाच्या झडीसारखं एक गाणं
माझ्या मनाशी झुजून राह्यलं आहे
बाहेर पडण्यासाठी
आणि
माझ्या अवतीभवतीच्या
तमाम बासऱ्या तर
टिचून पडलेल्या

ज्या जगात हे गाणे गायचे तेच संवेदनाशून्य असल्याने गाणे बाहेर येऊच नये, आतल्या आत रहावे असे कवीला वाटते; पण गाण्याचा धर्मच व्यक्त होणे हा आहे आणि म्हणूनच ते बाहेर पडण्यासाठी धडपडत आहे. 'टिचन पडलेल्या तमाम बासऱ्या' या अवतीभवतीच्या बद्द, कठोर वास्तवाचे प्रतीक होऊन येतात. 'कापलेली शेते' या कवितेतही विनाशाची भीतीच कवीने व्यक्त केली आहे. या विनाशाला, उध्वस्ततेला थोपवायचं असेल तर 'तळहातावरल्या रेषांचं कुरळं गवत जपायला हवं' असंही कवी सागतो.

'आई' ही कोळगावकराची अत्यंत लक्षणीय कविता आहे. आईसारखेच आपल्या वडिलांचे शब्दचित्र त्यांनी 'बाप' या कवितेत रेखाटले आहे. 'फार झालंय आता' कवितेत वर्गसंघर्षाची चाहूल आहे तर 'छातीत माती घेऊन' कवितेत खेड्यातील मानवी अगतिकेला कवीने शब्दबद्ध केले आहे. 'कविताची चिमणी-पाखरं' मध्येही वर्गजाणवेच्या भानामुळेच 'माझ्या कवितांची चिमणी-पाखर काळजाच्या खोपीत दडून बसतात' असे कवी सागतो. शहरी सस्कृतीचे वर्णन कवीने पुढील ओळीमधून केले आहे.

इथ पक्ष्यांची घरं कॉंक्रीटच्या फाद्यांवर
आणि टेलिफोनच्या निष्पर्ण वेलीवर
पक्ष्यांचे झोके.

अशी ही मानवी दुःखाला, वेदनेला, दारिद्र्य, विषमता, शोषण याच्या ओझ्याखाली दबलेल्या मनाला अभिव्यक्ती देणारी कविता आहे. थोडक्यात सांगायचे तर या कवितांमधून कवीने आपलं 'मनाचं जीर्ण गाठुडं' च सोडलं आहे.

कोळगावकरांची कविता चिंतनशील आहे. कोळगावकराच्या कवितेतील साऱ्या निसर्गप्रतिमा माणसाच्या आयुष्याचा खोल अर्थ सागणारी प्रतीके बनतात ती या चिंतनशील अनुभूतीमुळेच. आपल्या भोवतीचं जग या कवीने किती संवेदनशीलतेने न्याहाळलं आहे याच्या खुणा त्याच्या निसर्गप्रतिमामधून जागोजाग उमटलेल्या दिसतात. या प्रतिमासृष्टीत निखळ सच्चेपणा आहे. या प्रतिमा भोवतीच्या जिवंत, खऱ्याखुऱ्या जगातून आलेल्या आहेत. या प्रामाणिकपणामुळेच कोळगावकराची प्रतिमासृष्टी त्याच्या अनुभवविश्वाचाचा अंगभूत भाग होऊन अवतरते– या प्रतिमा वरून लादल्यासारख्या, कलम केल्यासारख्या वाटत नाहीत.

कोळगावकरांनीच कवितेसंबंधी लिहिताना म्हटलं आहे,

कवितेला
शरीरातून
उगवू द्यावं,
हिंडू द्यावं रक्तातून
आणि
कागदाच्या
पाढुरक्या भूमीवर
लावूच नाही
तिच रोपटं

'जंगलझडी' मधली कविता वाचताना कोळगावकरांच्या बाबतीत हे घडलं आहे, त्यांची कविता त्याच्या शरीर–मन–रक्ताच्या मिश्रणातूनच उगवली आहे की काय असे वाटावे इतकी ती समर्थ आहे याची साक्ष मिळते.

थंडगार पेयासाठी अवश्य भेट द्या.
आनंद कोल्ड्रिंक हाउस
गांधीपुतळा, मेनरोड,
इचलकरंजी

पंचशील फॅब्रिक्स
प्रिंटेड साड्यांचे ब्लाऊजपिसेसचे उत्पादक
रा. चि. पंचनदीकर ( B Sc. Hons )
११८/४ ढोरवेस इचलकरंजी ४१६ ११५

नाट्यसंमेलन–पणजी

# संस्मरणीय आनंदसोहळा

वि. भा. देशपांडे

६४ व नाट्यसमेलन गोव्यात होणार अशा बातम्या चार–दोन . महिन्यापासून कानांवर येत होत्या. तेव्हापासून अनेक गोष्टीचे कुतूहल मनात होते. ते सारे यथायोग्यपणे परिपूर्ण झाले. अधूनमधून मनात शका यायची ती साहित्यसमेलनाच्या समारभपूर्व घटनाची. या वर्षी ही दोन संमेलनाची चित्रे अनेक अर्थांनी ध्यानात घेण्यासारखी आहेत. अगदी अध्यक्ष-निवडीपासून ते संमेलनाचे सूप वाजेपर्यंत ! पणजीत भरणारे संमेलन सुरळीत आणि संयमित रीतीने पार पडणार याची नांदी श्रीमती ज्योत्स्नाबाईंच्या अविरोध निवडीनेच झाली होती. आपल्या रंगभूमी-कर्तृत्वाने गेली पन्नास वर्षे त्याचा आदरयुक्त दबदबा नाट्यसृष्टीत आहे. त्याना विरोध करणारा, शत्रुत्व असलेला एकही गट रगभूमीत नाही. त्यामुळे त्यांच्या निवडीचा आनंददायी परिणाम सर्वत्र झाला. त्यातून गोवा ही त्यांची जन्मभूमी !

ज्योत्स्नाबाईंची अविरोध निवड आणि प्रसन्न व्यक्तित्व ही जमेची बाजू. त्यातच लक्षणीय भर टाकणारी गोष्ट म्हणजे गोव्याचा रमणीय परिसर. कविवर्य बा. भ. बोरकरानी आपल्या एका कवितेत म्हटल्याप्रमाणे 'माझ्या गोव्याच्या भूमीत गडद्या नारळ मधाचे ' याचा प्रत्यय सतत येत होता. मांडवीनदीच्या विस्तीर्ण प्रवाहाच्या आणि असख्य सुरूच्या उभ्या रागांच्या पार्श्वभूमीवर गोव्याची कलाअकादमीची वास्तू उभी आहे. (या वास्तूबद्दल स्वतंत्रपणे, सविस्तरपणे लिहायला हवें इतकी महत्त्वाची आहे.) या वास्तूत दिनाक ४, ५, ६ फेब्रुवारी ८४ ला नाट्यसंमेलन सपन्न झाले. इतक्या विलोभनीय गोष्टीचा समन्वय असल्यावर अशा संमेलनाला उद्घाटकही तितकाच तोलामोलाचा हवा. तसा तो लाभलाही. उद्घाटक होते श्री. शंभु मित्र. बंगाली पद्धतीने बोलायचे तर शंभूदा हे केवळ भारतीय स्तरावरचे श्रेष्ठ नाट्यकलाकार नाहीत तर त्याना आतरराष्ट्रीय प्रतिष्ठाही लाभली आहे. मेगॅसिस पारितोषिक, गेल्या वर्षीचा कालीदास पारितोषकाचा सन्मान आणि नुकताच जबलपूर विद्यापीठाने त्याना 'डी. लिट्' पदवी देऊन विभूषित केलेले असे शंभूदा साधारणत. ज्योत्स्नाबाईंच्या व याच्या पिढीतले. त्यानी बालगधर्वांची, ज्योत्स्नाबाईंची नाटके पाहिलेली. बंगाली रंगभूमीच्या या कलामहर्षीने उद्घाटनाच्या छोटयाशा भाषणात मराठी आणि बंगाली रगभूमीबद्दल मार्मिकपणाने सागितले. मराठी रंगभूमीचा यथोचित गौरव केला. तो गौरव ऐकताना साऱ्याच नाट्यप्रेमीचे मन सुखावून गेले !

कला अकादमीच्या अर्धवर्तुळाकार उघड्या प्रेक्षागृहात समेलनाचा उद्घाटनसोहळा संपन्न होत असतानाच सहजपणाने ध्यानात येत होते की, नाट्यसृष्टीतले अनेक मातब्बर लोक या ठिकाणी उपस्थित आहेत. यामध्ये वसंत कानेटकर, मो. ग. रागणेकर, रणजित देसाई, विद्याधर गोखले, पुरुषोत्तम दारव्हेकर, भालचद्र पेंढारकर, चित्तरंजन कोल्हटकर, माधव मनोहर; आशालता वाबगावकर, सुहासिनी मुळगावकर, रजनी जोशी, श्रीधर राजगुरु, राम नगरकर, रघुवीर तळाशिलकर असे किती तरी. अगदी तरुण पिढीपैकी सतीश आळेकर, जयदेव हट्टंगडी, विजय केंकरे आदी होते.

तीन दिवसाच्या कालावधीत पाच परिसंवाद झडले. व्यावसायिक रंगभूमी, प्रायोगिक रंगभूमी, बाल रंगभूमी, मराठी नाटकाच्या मुळाचा शोध आणि गोमंतकीय रंगभूमी असे विषय होते. व्यावसायिक रंगभूमीच्या परिसंवादात एक महत्त्वाचा सूर निघाला तो म्हणजे नाटकाचा सध्या होत असलेला धंदा हा व्यवसाय व्हायला पाहिजे. त्याला कडक शिस्त लागायला हवी. त्यासाठी नाट्यपरिषद ही नियंत्रक आणि निर्णायक शक्ती हवी. या विषयावर वसंत कानेटकर, विद्याधर गोखले, मोहन वाघ, विजया मेहता, चित्तरंजन कोल्हटकर, पुरुषोत्तम दारव्हेकर आदी नाट्यव्यवसायाशी प्रत्यक्ष सबंध असलेले लोक बोलले. त्यामुळे त्याला विशेष अर्थ होता. प्रायोगिक आणि बालरंगभूमी यासंबंधीची भाषणेही गाभीर्याने झाली. 'मराठी नाटकाचे मूळच्या विषयावर काही वक्ते अतिशय अभ्यासपूर्ण बोलले. यातल्या दोन परिसवादात मी सहभागी होतो. तरीही मला वाटते हे परिसवाद कठाळी पद्धतीने करणे बंद होणे आवश्यक आहे. एखादा जाहीर परिसवाद करावा; परंतु बाकीच्या महत्त्वाच्या विषयावरील चर्चा शिस्तबद्ध, नेमक्या स्वरूपात करायला हव्यात. असा प्रयत्न गेल्या वर्षी कोल्हापूरच्या संमेलनात झाला होता. याही वर्षी दामू केंकरे यांच्या मनात ही योजना होती; पण अनेक अडचणीमुळे ती शक्य झाली नाही. अगोदर मान्य करून ऐनवेळी चर्चेला–बोलण्याला न येणे हा एक प्रघातच आहे. त्यामुळे त्याची जागा भरून काढण्यासाठी कोणाला तरी पाचारण करावेच लागते. ती व्यक्ती योग्य मिळाली तर ठीकच असते. तसेच आयत्या वेळी बोलणाऱ्या मंडळीचा एक वर्ग असतो, तो आलेली सधी दवडत नाही. मग त्या चर्चेचे–परिसंवादाचे जे व्हायचे ते होते. यासाठी नियोजित वक्ते आले नाहीत तर ती चर्चा रद्द करावी. ऐनवेळी कोणालाही बोलू देऊ नये. निश्चित विचार करणारा–सांगणारा, अभ्यासपूर्ण बोलणाराच वक्ता आणावा. केवळ त्या व्यक्तीचे नाव मोठे आहे म्हणून आणू नये. ही शिस्त जेव्हा लागेल तो सुदिन ! हे अनेक क्षेत्रांत आहे. नाटकक्षेत्र तरी याला अपवाद कसे राहणार?

## संयोजकांना श्रेय

संमेलनाच्या निमित्ताने मनोरजनाचे काही कार्यक्रम झाले. गोव्यातील लोककलांचे दर्शन घडवणारा एक कार्यक्रम होता. त्यातला पहिला काही भाग चांगला होता; पण शेवटी तो कार्यक्रम अतिशय सुमार, कटाळ-

वाणा झाला. 'शतरंग' हा मराठी संगीत नाटकाच्या वाटचालीचा कार्यक्रम अतिशय परिश्रमपूर्वक सादर झाला. त्याचे सूत्रधार होते भालचंद्र पेंढारकर, सुहासिनी मुळगावकर. अन्य कलावंतांनी त्यांना उत्तम साथ दिली. त्यामध्ये ललिता केंकरे, रजनी जोशी, निर्मला गोगटे, श्रीकांत मोघे, फैय्याज, अरविंद पिळगावकर आदी कलाकार होते. 'शतरंग' हा जसा वेगळा कार्यक्रम पेश झाला (तो यापूर्वी मुंबईच्या संमेलनात झालेला होता) तसाच सर्वस्वी अनोखा कार्यक्रम पेश झाला तो म्हणजे 'क्षण आला भाग्याचा' हा एक. या कार्यक्रमामध्ये स्वत: ज्योत्स्नाबाई, विजया मेहता, दारव्हेकर, चित्तरंजन कोल्हटकर, सतीश आळेकर आदी कलाकारांनी आपल्या आयुष्यातील आनंदाच्या भाग्याच्या क्षणाचा प्रसंग रंगवून सांगितला. याचे सूत्रचालन केले होते सुहासिनी मुळगावकर यांनी. या कार्यक्रमाची कल्पना आणि प्रत्यक्ष सादरीकरण उत्तम होते. एका अर्थाने हा कार्यक्रम म्हणजे एक अनुभव ठरला. शेवटच्या दिवशी रात्री गोव्यातील स्थानिक कलाकारांनी 'अंधारयात्रा' हे नाटक पेश केले.

संमेलन संपवून पुण्याला परतताना संमेलनाच्या फलिताविषयी अनेक विचार मनात आले. हे संमेलन कसे झाले? कसे वाटले? याचे उत्तर सरळच होते की, हे संमेलन आनंददायी वाटले. अनेक अर्थाने स्मरणीय झाले. स्मरणीय अशासाठी की, त्यातल्या अनेक क्षणांचे ठसे मनावर दीर्घकाळ राहतील. प्रत्येक कार्यक्रमाची वेगवेगळी जागा, रम्य परिसर, मोकळे वातावरण, श्रोते–प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद, रंजन–कार्यक्रमांना नाही तर सर्व परिसंवादांना देखील! एकाही मंत्र्याची संमेलनात तुडबूड नाही. संमेलनावर कोणतेही दडपण नाही, ताणतणाव नाहीत, मानापमानाचे प्रसंग नाहीत. वडोदा, नागपूर, सोलापूर, कोल्हापूर मुंबई, पुणे आदी ठिकाणच्या प्रतिनिधींची उपस्थिती अशा अनेक गोष्टी सुखावणाऱ्या होत्या. सत्कारानिमित्ताने गोव्यातील जुन्या कलावंतांचे दर्शन घडले. विशेष म्हणजे कोणत्याही समारंभात किंवा परिसंवादात सहभागी नसलेले आणि प्रत्येक कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित असलेले श्री. लालचंदशेठ आणि त्यांच्या पत्नी यांचे कौतुक वाटत होते. संमेलनाची एकूण व्यवस्था चांगली होती. एवढ्या मोठ्या कार्यात काही किरकोळ उणेदुणे घडलेही असेल; पण ते तेवढ्यापुरतेच! साऱ्यांनी आपले म्हणून त्याकडे दुर्लक्ष केले असणार! संमेलनाच्या यशाचे श्रेय काही प्रमाणात संयोजकांकडे जाते. त्यामध्ये दामू केंकरे, बाबा नाईक, शशिकांत नार्वेकर, गोपाळराव मयेकर, सावळो केणी आदी मंडळींचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

आणखी एक विचार मनात आला की, संमेलन हा एक आनंदसोहळा आहे, उत्सव आहे ही कल्पना एकदा मान्य केल्यावर, संमेलनाचे फलित काय? यातून आम्हाला काय मिळते वगैरे चर्चा निरर्थक आहेत. ज्यांना ही उत्सवाची–आनंदाची आवड आहे त्यांनी आपणहून यावे. या निमित्ताने अनेक माणसे निवांत भेटतात. अनौपचारिक गप्पा होतात. आपल्या असण्याचा, ज्ञानाचा, अनुभवाचा फायदा स्थानिक मंडळींना मिळत असतो. संमेलनातून जे घडणार नाही ते का घडत नाही असे विचारण्यापेक्षा जे घडते ते अधिक चांगले कसे घडेल हे पाहायला हवे. त्यासाठी या क्षेत्रातील व्यक्तींनी प्रत्यक्षात तिथे यायला हवे! आल्याशिवाय कळणार कसे की, संमेलन स्मरणीय होते? पणजीचे संमेलन हे त्याला उत्तम उत्तर आहे. ज्यांनी ते अनुभवले त्यांनाच ते कळणार, किती स्मरणीय होते ते! □




## चार नवी प्रकाशने

### बलसागर

**श्री. ग. माजगावकर**

तीस रुपये

राष्ट्रवादी भूमिकेतून नव्या क्षितिजांचा घेतलेला शोध.

### डॉ. आयडा स्कडर

**सौ. वीणा गवाणकर**

बावीस रुपये

ग्रामीण भागात डॉक्टर्स नेण्याचा प्रयत्न भारतात प्रथम डॉ. आयडांनी केला. त्यांच्या त्यागमय जीवनाची कहाणी.

–एक होता कार्व्हरच्या लेखिकेचे दुसरे पुस्तक.

### पूर्णिया

**अनिल अवचट**

बारा रुपये

अलिप्तपणे तरी भेदकतेने घडवलेले बिहारच्या माणसाचे दर्शन.

आवृत्ती तिसरी

### लेक वालेसा

**डॉ श्रीकांत मुंदरगी**

बावीस रुपये

यंदाचे नोबेल प्राईझ विजेता लेक वालेसा आणि पोलिश जनता यांनी रशियन दडपशाहीविरुद्ध दिलेल्या लढ्याचे चित्रण–मराठीत प्रथमच.

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

चित्रपट

# फेडोरा : एका चेहेऱ्याची शोकांतिका



फेडोरा, हॉलिवुड या मोहनगरीतले एक सदासतेज मोहपुष्प, पश्चिमी चित्रपटसृष्टीची सम्राज्ञी. ४० आणि ५० ही दोन दशके आपल्या सौंदर्याने मंत्रमुग्ध करून टाकणारी जगातील सर्वात सुंदर अभिनेत्री जिच्याबरोबर काम करण्यासाठी मोठमोठे नट, दिग्दर्शक, लेखक धडपडत असतात अशी एक 'लीजंड' फेडोरा.

आता इतक्या टॉप पदावर असल्यामुळे अफाट पैसे मागणे, स्वतंत्र मेकपरूम असणे वगैरे 'स्टारी' नखरे ती करीतच असते. अशी ही साऱ्या जगाला वेड लावणारी रुपसुंदर अभिनेत्री ६० व्या दशकाच्या सुरुवातीला अचानक अदृश्य होते. तिने काय चित्रपट संन्यास घेतला ? पण का म्हणून ? सौंदर्याचा बहर तर तिने अगदी परवापरवापर्यंत छान जोपासला होता. मग ती गेली कुठे ? बघता बघता 'फेडोरा' एक रहस्य बनून जाते.

□

अगदी छोट्या गावाचं एक शांत, निर्मनुष्य 'टिपिकल' रेल्वे स्टेशन. रात्रीचा गडद अंधार. आसपास दिवेही फारसे नाहीत. समोरून एक गाडी येत आहे, संथगतीने, धूर ओकत. अचानक आपल्याला दिसते एक तरुणी. ती पळत पळत त्या ट्रेनच्याच दिशेने चाललीय. तिला कोणी तरी रोखण्याचा प्रयत्न करतय. ती क्षणभरच थांबते. चेहरा गोंधळलेला; पण पुढच्याच क्षणी ती पुन्हा धावत सुटते आणि...आणि...पाहता पाहता त्या इंजिनासमोर उडी घेते. ते अजस्र धूड आपलं काम चोख बजावतं.

ग्रीस मधील टेलेव्हिजनवरून खास बातमी सांगितली जात असते. 'जगविख्यात अभिनेत्री फेडोरा हिनं काल रात्री रेल्वेसमोर उडी घेऊन आत्महत्या केली. कारण मात्र कळलं नाही. तिचं वय ६० ते ७० या दरम्यान किती तरी होतं; पण असं दिसतं, की शेवटपर्यंत तारुण्य आणि सौंदर्य तिच्या बरोबरच राहिलं. तिचा पार्थिव देह अमुक-अमुक राजवाड्यात दर्शनासाठी ठेवला आहे.'

आपल्यासमोर तो भव्य, देखणा आणि ऐसपैस राजवाडा येतो. फेडोराशी संबंधित कोण्या काऊंटेसचा तो महाल असतो. आपल्या प्रिय अभिनेत्रीच्या विरहाग्नीत होरपळणारे हजारो रसिक फुलं आणि पुष्पचक्र घेऊन रांगेत उभे असतात. एका विशाल महालात मोठ्या टेबलावर एक शवपेटी असते आणि त्यात चिरनिद्रा घेत असते 'फेडोरा'.

निःशब्दपणे आपली श्रद्धांजली वाहणाऱ्या या रसिकांमध्ये एकजण असतो, 'बॅरी'- हॉलिवुडमधला एक निर्माता. चेहऱ्यावर अविश्वास आणि दुःख घेऊन तो मृत फेडोराकडे बघतच राहतो. शेवटी मागची एक स्त्री त्याला ढकलते तेव्हा तो भानावर येतो आणि एका पडद्याआड उभा राहतो. समोर वर बघत. कोणी एक पुरुष काऊंटेस फेडोराचा डॉक्टर आणि फेडोराची खास सहाय्यिका उभे असतात. दुसऱ्या एका कमानीत काहीजण व्हॉयलीनवर त्या शोकमय प्रसंगास अनुरुप काही धून वाजवत असतात.

त्या सर्वांकडे बघताना बॅरीच्या मनात येतं, 'या लोकांनी तिला मारलं. हलकट लेकाचे. ती काऊंटेस, तो डॉक्टर, ती सहाय्यिका सगळ्यांनी तिला माणसांपासून दूर ठेवलं, जणू काही ती वेडीच होती आणि शेवटी त्यांनी मारलीच तिला. सगळंच अविश्वसनीय वाटतं. दोन आठवड्यांपूर्वीची तर गोष्ट आहे.'

□

ग्रीसमधल्या त्या छोट्याशा, समुद्रकिनाऱ्यावरच्या खेड्यात बॅरी उतरतो. तो एक स्वतंत्र निर्माता असतो आणि एका चित्रपटासाठीच तो या खेड्यात आलेला असतो. एका रद्दी हॉटेलात तो राहतो; पण आल्या आल्या तो चौकशी करतो फेडोराची. या गावाची समुद्राची जी हद्द असते बरोबर त्याच्यासमोर डोंगर उतरणीवर एका चिरेबंदी वाड्यात फेडोरा रहात असते. बॅरी तिथे जायचे ठरवतो. एक बोट भाड्याने घेऊन तिथे पोचतो. जवळ दुर्बिण असतेच. घराच्या प्रमुख लोखंडी प्रवेशद्वारावर पाटी असते. 'भेटण्याची मनाई आहे.'

पण बॅरी मागे जातो आणि जिथे त्या बंगल्याची हद्द संपते तिथे उभे राहून दुर्बिणीतून बघतो. चाकांच्या खुर्चीवर बसलेली काऊंटेस, शेजारी फेडोराची सहाय्यिका, दाढीवाला डॉक्टर. तेवढ्यात त्याला 'ती' दिसते. उजवीकडे कललेली हॅट, मोठा गॉगल, हातात पांढरे हातमोजे. त्याला ती नीटशी दिसत नाही; पण ती अजूनही एखाद्या तरुणीसारखीच दिसत आहे हे जाणवते. रेकॉर्ड प्लेअरवर लावलेल्या रेकॉर्डवरून काऊंटेस आणि फेडोराचं काहीतरी जोरदार

भांडण होते. काऊंटेस रेकॉर्ड फोडते, फेडोरा चिडून काही तरी 'तुला मी मारून टाकीन' असे बोलते. डॉक्टर तिला धरून आत नेतात.

### तिला त्याचेच आकर्षण का ?

हा काय प्रकार आहे ? बॅरी दार ठोठावून फेडोराबद्दल विचारतो, तर एक गणवेषधारी त्याला इथे कोणी रहात नाही असे उत्तर देऊन फुटवतो. बॅरी अस्वस्थपणे एका सकाळी रस्त्यावरच्या एका खुल्या रेस्तराँमध्ये बसलेला असतो. तेवढ्यात त्याला ती जुनी गाडी दिसते. तीच ती. बॅरी मागे पळत सुटतो. गाडीतून ड्रायव्हरची नजर चुकवून फेडोराही मार्केटमध्ये घुसते. बॅरी तिला एका दुकानात गाठतो. ती त्या दुकानदाराकडे काहीतरी कळकळीने मागते तो देत नाही, ती निराश होऊन निघते. तेवढ्यात बॅरी तिला अडवतो. १९४७ सालची आठवण देतो. तिला बहुतेक विशेष आठवण नाहीसे दिसते. ती एकदम त्याच्याकडे पैसे मागते. ते देऊन दुकानदाराकडून ती हळूच काहीतरी विकत घेते.

मग जरा शांतपणे ती बॅरीशी बोलू लागते; पण सगळंच विसंगतीपूर्ण वाटतं. ४७ साली बॅरी जेव्हा चित्रपटसृष्टीत सहाय्यक होता तेव्हाची फेडोरा बदललेली वाटते चेहरा तोच, तरुण; पण मनानं ती बदलली आहे का ? तेवढ्यात तिची सहाय्यिका आणि ड्रायव्हर येतात. फेडोरा मासिकं विकत घेण्याचं निमित्त करून दोन मासिकं उचलून पळते.

मग बॅरीला तिचा डॉक्टरच भेटतो. त्याच्याशी गोडीनं बोलून तो माहिती मिळवण्याचा प्रयत्न करतो. ती जरा मानसिकदृष्ट्या थोडी आजारी असल्याचे कळते. तिचे वय ? सदुसष्ट वर्षे ! बापरे वाटत नाही. तेवढ्यात काही तरी फोन आल्यामुळे डॉक्टर उठतो. त्याच्या ओव्हरकोटमध्ये बॅरी आपल्या सिनेमाचे स्क्रिप्ट सरकवतो. डॉक्टर फोनवर एवढेच ओरडतो, 'काय ? पण तिला ते मिळाले कुठे ? मी आलोच.' घाईने तो कोट घेऊन जातो.

आणि दुसऱ्या दिवशी संध्याकाळी अनपेक्षितपणे बॅरीला हवं ते घडतं. त्या चिरेबंदी वाड्यातून बोलावणं येतं. बॅरी त्या घराच्या दिवाणखान्यात येतो. दाढीवाला डॉक्टर, सहाय्यिका आणि व्हीलचेअरभोवती वृद्ध काऊंटेस. अॅना कॅरेनिना या जगप्रसिद्ध कादंबरीवर आधारित असे ते स्क्रिप्ट असते. या चित्रपटात फेडोरा काम करणार नाही, कारण 'ती कधीच रिटायर झालीय असही काऊंटेस म्हणते. का पण ? तिने तर एकदा पुनरागमन तेही जोरदार केलंच होतं की. हो होतं; पण आता नाही. ती चित्रपटात कधीच येणार नाही.

तेवढ्यात ती स्वतःच येते. चित्रपटात काम करण्याची इच्छा व्यक्त करते. कारण अॅना कॅरेनिना ही फार सुंदर प्रेमकथा आहे. असंही ती म्हणते; पण तुम्ही माझ्याबरोबर हिरो कोण घेणार ? नको, नको मला इतर कुणी नको. फक्त मायकेल यॉर्कच हवा. मायकेल यॉर्क ? बॅरीला जरा आश्चर्यच वाटतं; पण तो काहीच बोलत नाही. तेवढ्यात बाकीचे सर्वजण तिला आपल्या खोलीत जायला सांगतात. तुझी तब्येत ठीक नाही. तू सिनेमात काम करू शकणार नाहीस. हे ऐकून फेडोरा चिडते, तिचा जणू तोलच जातो. ती आरडाओरडा आदळआपट करत खोलीत जाते.

बॅरीकडून फेडोराने त्या दुकानात घेतलेले पैसे काऊंटेस परत करते. बॅरी उद्विग्न होऊन निघतो. ते स्क्रिप्टही घेऊन जायला सांगायला काऊंटेस विसरत नाही. अस्वस्थपणेच बॅरी आपल्या हॉटेलातल्या खोलीत शिरतो आणि अवाक होऊन पहात राहतो. समोर ती उभी असते. खिडकीतून पहात. कपडे मळलेले, फाटलेले, पायात काहीच नाही. तळहातातून रक्त येतंय; पण तरीही हातमोजे न काढलेली. चिखल वगैरे लागलेला. जगातल्या थोर थोर पुरुषांची आपल्याला आलेली प्रेमपत्रं ती घेऊन बॅरीकडे आलेली असते. त्या लोकांबरोबर, त्या कोंडवाड्यात तिला रहायचं नसतं. ती आपला उजवा हात दाखवते. इंजेक्शनच्या खुणा. 'मला ते मादक द्रव्ये देतात मुद्दाम.' असं ती सांगते. ती पळून कशी आली याचं बॅरीला आश्चर्य वाटतं.

एवढ्यात डॉक्टर आणि ड्रायव्हर आत घुसतात. जरा झटापट होते. ते तिला घेऊन जातात. बॅरी वरून बघतो. ती त्याच्या तावडीतून सुटण्याचा प्रयत्न करते; पण ते तिला ते धरून फरपटत आणून मोटारीत बसवतात. तोंडावर हात दाबून गप्प करतात. 'तू फेडोरा आहेस हे विसरू नकोस' असं तो डॉक्टर बजावून सांगतो. बॅरीला ते पहावत नाही.

सतत डोळ्यावर गॉगल, हातमोजे आणि डोक्यावर हॅट असणाऱ्या वृद्ध तरीही तरुण अन् सुंदर दिसणाऱ्या या चमत्कारिक रहस्यमय फेडोराला बघण्यासाठी बॅरी पुन्हा एकदा त्या चिरेबंदी घरात जातो. पहिलं दार उघडंच, कुत्रेही झोपलेले; पण बाकीची दार बंद. बाहेरच तिचा गॉगल पडलेला. फुटका. बॅरी मागचा दरवाजा फोडून घरात, तिच्या खोलीत जातो. पलंगावर त्याला पट्ट्या दिसतात तिला बांधून ठेवत असावेत. किती क्रूरपणा एका ड्रॉवरमध्ये नुसतेच पांढरे हातमोजे. काही वह्या दिसतात त्यात फक्त 'फेडोरा' एवढेच सगळीकडे लिहीलेले. भितीवर ब्राऊन पेपरच्या आवरणाखाली फोटो कसले ? बॅरी आवरण फाडतो. तिचे फोटो, पुष्कळ आणि मायकेल यॉर्कचे पण. त्याचे हिला एवढे आकर्षण का ? तो विचारात पडतो. तेवढ्यात खाली फोन वाजतो. बॅरी पळत जाऊन कडी तोडून फोन घेतो.

फोन जरा रहस्यमयच वाटतो. डॉक्टरसाठी असतो. बोलणारा म्हणत असतो फेडोराला घेऊन आपण क्लिनिकमध्ये जाऊ. क्लिनिकमध्ये ? कोणाच्या ? म्हणजे काय डॉक्टर तुमच्याच; पण असे का विचारताय कोण आहे ? हे चालू असतानाच फेडोराचा ड्रायव्हर आत येतो. एक फटका मारतो. बॅरी बेशुद्ध पडतो.

### बेढब, जुनाट चेहरा

बॅरी शुद्धीवर येतो तो त्याच्या हॉटेलात. एक आठवड्यानंतर. तेव्हा त्याला कळते की, 'ती' गेली. फेडोरा आता नाही. बॅरी हादरतो. धावत-पळत अंत्यदर्शनासाठी जातो. पड्याआड उभ्या असलेल्या बॅरीच्या मनात हे सगळं आठवून येत असतं.

तेवढ्यात, दर्शनाची वेळ संपली. कृपया बाहेर चला असे सांगत, गणवेषधारी एक अटेंडंट येतो; पण बॅरी जात नाही. कारण वरची सर्व मंडळी त्याच्याकडे येत असतात. काऊंटेस, डॉक्टर, सहाय्यिका आणि एक पुरुष. 'हिचे दिवसातून किती 'शोज'

करणार आहात? एखादा 'स्पेशल शो' पण ठेवणार का? बॅरी कुत्सितपणे विचारतो. सगळेच जण शांत असतात. बॅरी त्यांच्यावरच आरोप करत सुटतो. 'तुमच्या मुळेच ती आत्महत्येला प्रवृत्त झाली. एका आठवड्यात मी सगळं काही ओळखल आहे. मी काही आंधळा नाही.'

'तू आंधळाच आहेस.' काऊंटेस शांतपणे म्हणते. 'फेडोरा शेवटपर्यंत तरुण दिसत होती. कारण ती खरच तरुण होती. तिचे हात पहा. एवढे तरुण हात ६० च्या पुढच्या म्हातारीचे कसे असतील?' बॅरी आणि आपण दोघेही हादरतो. म्हणजे याचा अर्थ ही तरुणी फेडोरा नव्हती? हा अनेक वर्षे आपण बघतोय तो ओळखीचा चेहरा, ही फेडोराच आहे मी हा चेहरा तीन-चार दशकं बघतोय. बॅरी म्हणतो 'आणि जर ही फेडोरा नसेल. तर मग ही कोण? खरी फेडोरा कुठाय? तिचे काय झालं?' आपल्याच मनातले प्रश्न जणू बॅरी धडाधडा विचारतो.

ती काऊंटेस जरा पुढे झुकते. चेहऱ्यावरची जाळी दूर करते. एक बेढब, मोठा डाग असलेला जुनाट असुंदर चेहरा दिसतो. 'फेडोराच हे असं झालय. मी आहे फेडोरा' जगातील सर्वात सर्वात सुंदर स्त्री मी हीच! पण मग जर का गेली २० वर्षे ही अशी आहे तर सिनेमात काम कोण करायचं? 'ती ही मेलेली मुलगी.' फेडोरा म्हणते, 'ही अँटोनिया, माझी मुलगी.' त्या दुसऱ्या पुरुषाकडे बोट दाखवून म्हणते, 'हा माझा पती. याच्यापासून झालेली.'

फेडोरा ऐन तारुण्यात आणि प्रसिद्धीच्या शिखरावर असतानाचा हा तरुण उमदा काऊंट तिला भेटतो. बघता बघता ती प्रेमात पडते, लग्नही करते, एवढेच नव्हे तर आई पण बनते अँटोनिया ही त्याची गोड छत्रकडी; पण दूर ठेवलेली. कारण सौंदर्यसम्राज्ञी फेडोरा ही विवाहित आहे एवढेच नव्हे तर आईपण आहे हे जगाला कळले तर इमेजला धक्का नाही का पोचणार?

अँटोनियाला नेमके हेच आवडत नसते. ही आपली आई आहे हे लोकाना का नाही सांगायचं? इतर मुलांसारखी आपली आई आपल्याला भेटायला का येत नाही? बरोबर फिरायला का नेत नाही? नुसत्याच भारी वस्तू देते त्या काय करायच्या आहेत? त्या दिवशी छोटी अँटोनिया चिडते आणि निघून जाते.

इकडे वर्षे तर उलटतच असतात. तो दाढीवाला डॉक्टर फेडोराच्या तारुण्याची काळजी घेत असतो. आपण सतत एकाच वयाचे दिसायला हवे हा तिचा अट्टाहास असतो. जगाला वेड लावणारा हा चेहरा तितकाच तरुण आणि तेवढाच सुंदर रहायला हवा हा तिचा आग्रह असतो. डॉक्टर आपलं सगळं वैद्यकीय ज्ञान पणाला लावून तिचं तारुण्य जपत असतो. हे बराच काळ चालते; पण १९६२ च्या सुमाराला...

डॉक्टर आपल्या प्रयोगशाळेत गिनी पिग्जवर कसकसले प्रयोग करत असतो तेवढ्यात नर्स पळत येते. फेडोरा खूप अस्वस्थ असल्याचं सागते. तो पळत वर जातो. चेहऱ्याचं बॅंडेज सोडतो प्रयोग फसलेला असतो जगातील सर्वांत सुंदर स्त्री विद्रुप झालेली असते. ती आपला चेहरा आरशात पाहते आणि दु.खातिरेकानं जोरात हुंबरडा फोडते. महान अभिनेत्री, रूपवती फेडोरा संपते.

मग ती ग्रीसमध्ये हे घर विकत घेते. तिथले सगळे आरसे काढून टाकायला लावते. दरम्यानच्या काळात तिची दुरावलेली अँटोनिया तिला परत मिळते. आपली आई विद्रुप झालीय, पांगळी झालीय हे पाहून ती खूप रडते. मग फेडोराचं बंदिस्त जीवन चालू राहतं ती अँटोनियातच स्वत.ला पाहू लागते.

एक दिवस 'ऑस्कर'च्या अॅकॅडमीकडून तिला 'स्पेशल ऑस्कर' दिल्याच आणि ते स्वीकारायला येण्याचं पत्र येतं ती अर्थातच जाणे टाळते; पण अॅकॅडमीचा अध्यक्ष हेन्री फोंडा तिला ते प्रत्यक्षच देण्याचा हट्ट धरतो. काही तरी विचार करून फेडोरा त्याला बोलावते. घरातले सगळेच चकित होतात. हे काय? आपल्या सारख्याच दिसणाऱ्या आपल्या मुलीला ती 'फेडोरा' बनवते.

हेन्री फोंडा येऊन ते स्पेशल ऑस्कर 'फेडोरा'च्या म्हणजेच आपल्या अँटोनियाच्या हाती देऊन निघून जातो. या प्रसंगानंतर फेडोराच्या डोक्यात ही कल्पना पक्की बसते की 'फेडोरा'चा पुनर्जन्म करायचा. तिचा नवरा-काऊंट-विरोध करतो; पण ही एक गमत म्हणूनच करायची, असं फेडोरा म्हणते. ती लिजंड पुन्हा एकदा जगताना, जिवत होताना तिला बघायची असते. तो जगप्रसिद्ध चेहरा नवीन जमान्यातही लोकाना वेडावताना तिला पहायचा असतो अँटोनियाच्या चेहऱ्यात आवश्यक ते बदल केले जातात आणि फेडोरा पुन्हा एकदा चित्रसृष्टीत येते.

## दु:खाचा अतिरेक

अँटोनिया 'फेडोरा' चा म्हणजेच आपल्या आईचा 'पार्ट' बरोबर वठवत असते कारण तिने आईच्या जुन्या फिल्म्सचा (अर्थातच आईच्या सांगण्यावरून) खूप बारीक अभ्यास केलेला असतो. अशाच एका शूटिंगच्या वेळी तिचा हिरो-मायकेल यॉर्क तिच्याबद्दल म्हणजे फेडोराबद्दल आपल्या मनात किती आदर आहे हे रंगवून सांगतो. नकली फेडोरा खूप हसते; पण अँटोनिया त्याच्या प्रेमात पडलेली असते. तोही तिच्याकडे आकर्षित झालेलाच असतो.

अँटोनिया हे आपले गुपित तिच्या किंबहुना आईच्या सहाय्यिकेला सागते ती शातपणे ती कल्पना झिडकारते. ती म्हणते, 'तू त्याला काय सांगणार? की मी फेडोरा नाही तिची मुलगी अँटोनिया आहे म्हणून? माझी आई आता एक विद्रूप पागळी स्त्री झाली आहे असे सांगणार? नाही आता ते शक्य नाही. तू फेडोराच आहेस.' या धक्क्याने अँटोनिया ओक्साबोक्सी रडते.

आपली एक तरुण मुलगी अँटोनिया म्हणून असलेली. या जगतली आयडेंटिटी, आपले अस्तित्वच पुसले गेलंय ही तिला जाणीव होते. आपल्यावर जो चेहरा लादला गेलाय तो एका ख्यातनाम नटीचा आहे. आपण काहीही जरी सांगितले तरी लोक म्हणणार छे तू तर फेडोराच आहेस. याचे कारण तो चेहरा.

या घटनेनतर अँटोनियाच्या मनाचा तोल ढळतो. ती मादक द्रव्याच्या आहारी जाते. तिला विचित्र भास होऊ लागतात. सगळेजण आपल्याविरुद्ध कट करतायत, आपल्याला मुद्दाम मादक इंजेक्शने टोचतात असे तिला वाटू लागते आणि खरे तर तिला यातूनच बाहेर काढण्यासाठी डॉक्टर प्रयत्न करीत असतात.

डॉक्टराच्या क्लिनिकमध्ये असताना

ती वाफाळलेल्या काचेवर 'अँटोनिया' असे नाव लिहीत असते. इतकी तिला 'स्व त्वा'ची ओढ असते. ही खोटी ओळख तिला नको असते.

फेडोरालादेखील हे सगळं नको असते; पण आता तिचा काहीच इलाज नसतो. तसा तिचा उद्देश अगोदर काही वाईट नसतो. मुलीच्या मदतीने पुन्हा एकदा प्रसिद्धी, वैभव भोगायचे, चंदेरी झगमगाटी दुनिया मुलीतून अनुभवायची असते. एक लीजंड पुन्हा साकार करण्याचा आनंद भोगायचा असतो. एक 'चेहरा' पुन्हा परत आणायचा असतो; पण त्यातून हे निष्पन्न होईल हे तिला तरी कुठं माहीत होतं ?

शेवटी अँटोनियाला नर्स सांगते, लंडनहून फोन आहे. फोन खाली बसलेला डॉक्टरच करतो आणि म्हणतो, 'फेडोरा – चुकलो –अँटोनिया, मी कदाचित तुला भेटायला येईन. मी मायकेल यॉर्क.' मनाची अत्यंत नाजूक अवस्था झालेली अँटोनिया आनंदाने वेडावते. नर्सला सोन्याची चेन देऊन टाकते; पण हा प्रसंग 'फेडोरा' या आईला मात्र रडवून जातो.

अँटोनिया स्टेशनवर वेड्यासारखी मायकेलची वाट पहात थांबते. गाडी येऊन जाते. तो येतच नाही. ती सहाय्यिका तिला शोधायला येते आणि म्हणते, 'तू चल पाहू. तो म्हणाला कदाचित मी येईन' चुकून ती बोलून जाते; पण अँटोनिया म्हणते, 'तुला कसे कळले? म्हणजे तुम्ही सगळं चोरून ऐकले तर.'

आता तिला हे लादलेले व्यक्तिमत्त्व असह्य होतं. ती समोर बघते. एक रेल्वे येत असते. बस्स, ती ठरवते आणि शरीर झोकून देते.

पण जगाच्या दृष्टीने संपते ती फेडोरा. चिरतरुण फेडोरा. अँटोनियाचे नावही कुणाला माहीत नसते. किंबहुना ते एक व्यक्तिमत्त्व सुरू होण्याआधीच संपते, मरते. इतके वर्षं फक्त फेडोराच सर्वत्र राज्य करीत असते. तो चेहरा इतर व्यक्तिमत्त्वं झाकोळून टाकत असतो.

ती काऊंटेस किंवा खरी फेडोरासुद्धा बॅरीला हेच सांगते की, हे रहस्य तुझ्यापुरतच. ही लीजंड पुढे सुरूच राहिली पाहिजे.

तरुण फेडोरा आणि अँटोनिया ही दोन कामे 'मार्था केलर'ने केली आहेत आणि अप्रतीम केली आहेत. फेडोराचा डौल, रूपाचा गर्व, चालताना जग आणि इतरांची हृदये तुडवत चालताना होणारा हर्ष हे एकीकडे आणि आपल्या कुरूप झालेल्या आईबद्दल करुणा वाटणं, नंतर गंमत म्हणून तिचा शेवट करणे आणि शेवटी आपली ओळख गेली आहे, आपल्याला आता 'फेडोरा' म्हणूनच जीवन कंठावं लागणार ही असह्य वेदना, असंबद्ध बोलणं; अगतिकता हे सर्व तिनं सुरेख दाखवलं आहे.

खोटी काऊंटेस सोब्रन्स्की (पण काऊंट सोब्रन्स्कीची पत्नी) किंवा खरी म्हातारी फेडोरा रंगवली आहे हिल्डगार्ड क्लोफ या अभिनेत्रीनं. एकांतवासाचं दुःख, मुलीवरचं प्रेम, जुन्या जमान्यातला प्रसिद्धीचा स्रोत अचानक आठवून त्याचा पुन्हा हव्यास आणि अट्टाहास धरणे, ती लीजंड आणि तो चेहरा पुनरुज्जीवीत करण्याचा हट्ट धरणे आणि शेवटी पदरी दुख पत्करण हे तिने झकक दाखवलं.

बिली वाईल्डर हा जुना जाणता मुरब्बी दिग्दर्शक इथे पटकथाही घेऊन उतरला आहे. तारुण्यावाचून जगूदेखील शकणार नाही, इतकी तारुण्याची सवय झालेल्या, झगमगाट, प्रसिद्धी कौतुक यांचा हव्यास असलेल्या आणि त्यासाठी वाटेल ते करू शकणाऱ्या एका स्त्रीची ही कहाणी त्याने दिली आहे

ही अत्यंत अवघड कथा थोड्याशा रहस्यमय पद्धतीने, फ्लॅशबॅकचा वापर करून मांडल्यामुळे संपूर्ण चित्रपट अगदी बंदिस्त आणि प्रेक्षकाची पकड घेणारा आहे. बॅरीला फेडोरा 'डच' म्हणत असते. ४७ साली तो किरकोळ सहाय्यक असतो. तेव्हा अल्पकाळ त्याचे जरासे प्रेमप्रकरण चालते, याची केवळ दोन सीन्समध्ये सूचना आहे. शेवटी सर्व रहस्य उलगडल्यानंतर 'फेडोरा' बॅरीला म्हणते की, तू आता कसा दिसतोस, ते बघण्यासाठीच मी तुला तेव्हा घरी बोलावलं. त्या दोघांनी एका जुनाट मोटारीत काढलेली रात्रही तिला आठवत असते. शेवटी ती त्याला 'डच' म्हणून संबोधते तेव्हा बॅरी म्हणतो, याचा अथ असा की, तू मला खरंच विसरलेली नाहीस. तो त्या मोठ्या रजिस्टरवर सहीसुद्धा 'डच' अशीच करतो आणि जातो. बॅरीच्या रूपात विल्यम होल्डनन, साजेसं असं काम केलंय.

'फेडोरा'चे शव पुन्हा एकदा दर्शनासाठी खुले होते. सगळ्यामध्ये असतो मायकेल यॉर्क, तो येतो, त्या चेहऱ्याकडे निरखून बघतो. एक लालजर्द गुलाब तिच्या छातीवर ठेवून निघून जातो.

पुढे ही काऊंटेस सोब्रन्स्कीदेखील मरते; पण तिचा फोटो स्थानिक पेपरमध्येही येत नाही. कारण तो चेहरा कुणाला दिसावा अशी तिची इच्छा नसते. फक्त एकाच चेहऱ्यावर तिने आयुष्यभर प्रेम केलेलं असतं, तो चेहरा जपण्याची, पुन्हा परत आणण्याची धडपड केलेली असते, त्यापायी स्वतः विद्रूप होते, मुलीच्या आयुष्यात दुःख निर्माण करते, ती वेडसर होऊन आत्महत्या करते, मुलगी गमावल्याचं दुख ती सहन करते, नव्हे ती बातमीही लपवते–केवळ एकाच चेहऱ्यासाठी. तो चेहरा म्हणजेच–फेडोरा !

–निखिल गजेंद्रगडकर


मांडणी, विचार व देखणेपणा या साऱ्यातच 'उत्तम' असे म्हणता येईल असे हे पुस्तक आहे.

–प्र. बा. भोसले
संपादक, बळीराजा मासिक

# योद्धा शेतकरी

**ले. विजय परुळकर**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

**मूल्य : ३६ रुपये**

# नाट्यपंढरी



## □ मानापमान

पंचशरे गद्यवरे वश जी झाली
नाट्यकला कविकृष्णा माला घाली

कांचनगडची मोहना, सवाई माधवराव यांचा मृत्यू, भाऊबंदकी, कीचकवध नि बायकांचे बंड या कृष्णाजी प्रभाकर तथा काकासाहेब खाडिलकरांच्या 'महाराष्ट्र नाटक मंडळी'च्या रंगभूमीवर गाजलेल्या गद्य नाट्यकृती त्यानंतर 'पंचशरे गद्यवरे' त्यांचे 'किर्लोस्कर संगीत मंडळी'च्या रंगभूमीवर आलेले पहिले संगीत नाटक मानापमान !

'मानापमान'चा पहिला प्रयोग, १२ मार्च १९११ ला, मुंबईत सादर झाला. काकासाहेबांचे पहिले संगीत नाटक. गोविंदराव टेंबे यांच्या चाली. नाटकात संगीतदिग्दर्शक आला तो इथेच. जोगळेकर, बालगंधर्व, बोडस असा त्रिवेणीसंगम. प्रयोग दुपारचा होता. नाटकाची तिकिटे केव्हाच संपून गेली होती; पण दुर्दैवाने त्याच दिवशी सकाळी बालगंधर्वांची वर्षा–दीड वर्षाची लाडकी मुलगी अल्पशा आजाराने वारली. कंपनीत सर्वत्र दुःखाची छाया पसरली. श्री. शंकरराव मुजुमदार, नानासाहेब जोगळेकर, स्वतः काकासाहेब खाडिलकर यांनी प्रयोग बंद ठेवण्याचे ठरविले. त्यावर बालगंधर्व म्हणाले, 'नाही नानासाहेब, खेळ रहित नाही करायचा. मी अगदी मनोभावे काम करीन. काकासाहेबांचे हे पहिले संगीत नाटक आहे ! गोविंदरावांनी दिलेल्या पहिल्यावहिल्या चाली मुहूर्ताचा खेळ बंद ठेवला, तर यांचे नाटक अजून नीट बसले नाही. त्यात काही तरी न्यून आहे, असा बभ्रा होईल. काकासाहेबांसारख्या थोर नाटककाराच्या संगीत नाटकाला अपशकून होईल. त्यांचा हिरमोड होईल !' त्यांनी कुणाचेच ऐकले नाही. खेळ झाला. 'टकमक पाही' या मानापमानातल्या पहिल्या पदापासूनच बालगंधर्वांना वन्समोअर मिळून त्यांची भामिनी रंगत गेली. भामिनीबरोबरच जोगळेकरांचा धैर्यधर रंगला. बोडसांचा लक्ष्मीधर यशस्वी झाला. खाडिलकरांचे 'मानापमान' त्यांच्या संगीत नाट्यसृष्टीतल्या प्रवेशाचे नाट्यसोपान ठरले ! संस्थेची, स्नेह्यांची अशी काळजी वहाणारा श्रद्धाळू कलावंत म्हणून बालगंधर्व सहाजिकच सर्वांच्या कौतुकाचा विषय झाला. बालगंधर्वांची कन्या जणू 'मानापमान'वरून 'दृष्टमिष्ट पापी चांडाळाची' म्हणून, ओवाळली गेल्यानेच मानापमानला इतके उदंड यश लाभले नाही ना ?

## □ देवा, ते मोठे आहेत !

एक श्रेष्ठ नट म्हणून, गणपतराव बोडसांचे गुण कुणीच नाकारणार नाही. शकार, लक्ष्मीधर, फाल्गुनराव या भूमिका पहाताना त्यांची आठवण होणे अटळ आहे; पण त्याबरोबरच हेही लक्षात घ्यायला हवे की, त्यांच्या यशाची कर्मभूमी, आधी 'किर्लोस्कर' नि नंतर प्रदीर्घ काळ 'गंधर्व'रंगभूमीच होती. अन्य ठिकाणी ते उभे राहिले; पण साथसंगत जुळली नाही. जीव जडला नाही. गंधर्वांकडच्यासारखे यश लाभले नाही. कौतुक झाले नाही. व्यवहारी विचाराने नि अधिक लाभाच्या हिशेबी अंदाजाने त्यांनी गंधर्व कंपनी काही वेळा सोडली. भागिदारी पुरेपूर वसुलीने तोडली; पण बालगंधर्वांना मात्र गणपतराव आपल्याकडेच हवेत, आपल्याच स्टेजवर दिसावे असे मनोमनी वाटे. असेच ते एकदा पुन्हा कंपनीत आले. नारायणरावांचा आनंद ओसंडू लागला. नाटकांच्या तालमी सुरू झाल्या. खेळ रंगू लागले.

तालमीच्या वेळीसुद्धा, गणपतराव कवीच्या (नाटककाराच्या) मालकांच्या गादीवर बसलेले दिसत. बालगंधर्व मात्र इतर नटवर्गाबरोबर सतरंजीवरच बसत. 'आपले मालक आपल्याबरोबर सतरंजीवर, नि बोडस गादीवर' हे अनेक नामवंत नटांना रुचत नसे एक दिवस धीर करून, त्यांनी बालगंधर्वांना विचारले 'नाना, हे असे काय म्हणून ?' त्यावर आपल्या नेहमीच्या स्वभावानुसार ते आर्जवी शब्दात उत्तरले, 'मायबापा' तेच योग्य आहे. आपले गणपतराव मोठे आहेत. भाऊरावांचा त्यांना सहवास लाभला आहे. देवलमास्तरांचे ते शिष्य आहेत. तालीममास्तर आहेत. ते तिथेच हवेत. शिवाय आता ते जायचे नाहीत !

याचे नाव नारायणराव बालगंधर्व ! दुसरे अन्य नाही.

## □ खाऊ द्या हो थोडे

बालगंधर्व बाहेर पडले की, झालेला खर्च परत आल्यावर कारकुनाला सांगत. मग तो त्यांच्या नावे खर्ची टाकला जात असे. एकदा कारकुनाने लिहिलेला खर्च बरोबर आहे की नाही, हे पहाण्यासाठी कंपनीचे कारभारी दादा काटदरे, यांनी बालगंधर्वांना विचारले, 'नारायणराव, काल तुम्ही तीन वेळा व्हिक्टोरिया (घोडागाडी) केली होती का ? दहा रुपये देवधर्म केला का ?' त्यांच्या विचारण्याचा रोख नि हेतू नारायणरावांच्या लक्षात आला. ते लगेच म्हणाले, 'हे पहा दादा, म्हणजे त्या कारकुनाने, थोडा जास्त खर्च माझ्या नावावर दाखविला आहे असेच ना ? खाऊ दे हो गरिबांनी चार पैसे ! श्रीमंताकडे लोक काय थोडे पैसे खातात ? मग हा बिचारा तर आपलाच आहे !' यावर दादा काय बोलणार दगड !



MANOSOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage—No. 11 ) Regd. No. PNCW–28


या संघर्षातील माझे सर्वोच्च ध्येय ना गुलामी प्रथेला अभय देणे आहे ना तिचे उच्चाटन करणे आहे. ते आहे देशाची अखंडता अबाधित ठेवणे. जर एकाही गुलामाला मुक्त न करता मी देशाची अखंडता राखू शकलो तर ते मी करेन. जर काही गुलामांची मुक्तता केल्याने आणि काहींना तसेच ठेवून देश अखंड ठेवता आला, तर ते मी करेन. मी गुलामी प्रथेबाबत वा काळ्या वंशाच्या लोकांबाबत जे करतो ते देशाची अखंडता कायम रहावी यासाठीच करतो आणि त्याला विरोध करतो तो यासाठी की त्यामुळे देश अखंड रहायला साहाय्य होणार असते – **लिंकन**

**देशाचे विच्छेदन हेच पाप मानणाऱ्या**
**सर्वात महान राजकीय नेत्याची**
**संपूर्ण ओळख करून देणारा ग्रंथ.**

अब्राहम लिंकन

# फाळणी टाळणारा महापुरुष

वि.ग.कानिटकर



फाळणी एकदा झाली
पुनः होणार नाही ह्याची शाश्वती वाटावी
अशी परिस्थिती नाही.
प्रत्येकाने अभ्यासायला हवी अशी
लिंकनची राजकीय कहाणी.

**भरपूर छायाचित्रांसह प्रकाशित होत असलेली**
**पहिली डिलक्स आवृत्ती.**
मोठा क्राऊन आकार
पृष्ठे : सुमारे ४००.
मूळ किंमत : रु. १५०/- किमान
सवलत मूल्य : रु. ९५/- फक्त (ट ख. स्वतंत्र)
पुस्तक १ जूनला प्रकाशित होईल.
आज पासून सर्वत्र नोंदणी सुरू.

राजहंस प्रकाशन १०२५ सदाशिव पेठ, पुणे. ४११ ०३०.

ग्रामश्री पंढरावी कला